**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०९

निर्णय दिनांक ३१-०५-२००७

श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, : अपीलार्थी
व्दारा कनकदंडे यांचा वाडा, सरकारवाडा,
अंबेवेस, परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप कुलसचिव (शै.)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा संचालक (BCUD)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. देशमुख हनुमंत वसंतराव (यापुढे त्यांना

अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (शै.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद श्री. आय. आर. मांझा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे उपस्थित आहेत. तथापि जन अपीलीय अधिकारी तथा संचालक (BCUD) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद हे गैरहजर आहेत. राज्य माहिती आयोगाकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद या विद्यापीठाच्या माहिती अधिकार संदर्भात आतापर्यत ज्या ज्या सुनावण्या झाल्या आहेत त्या त्या सर्व सुनावण्यांना जन अपीलीय अधिकारी तथा संचालक (BCUD) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद हे सातत्याने गैरहजर राहिले आहे याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

अपीलार्थीने सर्वप्रथम जन माहिती अधिकारी यांचेकडे कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी वैजनाथ जिल्हा बीड यांच्या विशेष कक्षाने मान्य केलेल्या सर्व विषया च्या मूळ रोस्टरची सत्यप्रत व त्यामध्ये केलेल्या बदला संदर्भात एकूण ४ मुद्यावर व स्थानिक निवड झालेल्या अधिव्याख्यातांचे प्रश्नासंबंधात नियुक्त केलेल्या कान्हेरे समितीच्या अहवालाच्या सत्यप्रती, त्यांचे दिनांक ३१-१०-२००६ चे पत्रान्वये मागविल्या होत्या. सदर माहिती अपीलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणत्याही प्रकारे माहिती पुरविल्याचे अथवा उपलब्ध करुन दिल्याचे कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयात हजर राहून प्रत्यक्ष घेऊन जाण्याविषयी वेळोवेळी कळविले असल्याचे त्यांना आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपीलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः मागितली असल्याने अपीलार्थीच्या कार्यालयात हजर राहण्याची सूचना जन माहिती अधिकारी यांनी दिली असल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलार्थीस कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील विद्यापीठास २०-१२-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. सदर अपीलाच्या सुनावणी संदर्भात अपीलार्थीस जन अपीलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्या मार्फत यांच्या कार्यालयाकडील पत्र दिनांक १८-०५-२००७ अन्वये कळविले व सुनावणीची तारीख ३०-०५-२००७ अशी ठेवली. ही सुनावणीची तारीख व्दितीय अपीला च्या सुनावणीच्या एक दिवस आधीची आहे याची येथे नोंद घेण्यात येत आहे. सदर सुनावणीचे आयोगास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेले रजिस्टर पाहता ही सुनावणी अपीलार्थीने विद्यापीठाकडे केलेल्या दिनांक १२-०२-२००७ च्या दुस-या विषया संदर्भातील अपीलाप्रित्यर्थ ठेवल्याचे दिसून येते. थोडक्यात अपीलार्थीने विद्यापीठाकडे केलेल्या जन अपीलीय अधिका-याकडे केलेल्या प्रथम अपीलावर कोणतीही सुनावणी झाली नाही असा निष्कर्ष या प्रकरणी काढणे योग्य राहिल.

जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलार्थी याच व इतर अनेक मुद्यांवर वेळोवेळी वेगवेगळ्या स्वरुपाची माहिती त्यांचे कडून मागवित असतात. सदर माहिती अपीलार्थीस व्यक्तीशः हवी असल्यामुळे त्यांनी अपीलार्थीस वेळोवेळी त्यांच्या कार्यालयात बोलावूनही अपीलार्थी त्यांचे कार्यालयात हजर झाले नाहीत तथापि अपीलार्थीचे म्हणणे असे आहे की त्यांना, त्यांनी मागितलीले माहिती देण्या संदर्भात हजर राहूनही जन माहिती अधिकारी व विद्यापीठ एकूणच माहिती देण्यासंदर्भात टाळाटाळ करते. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने वरील प्रमाणे केलेल्या

अर्जातील मुद्या संदर्भातील माहिती आयोगासमोर सादर केली आहे. या माहितीमध्ये अपीलार्थीने ज्या मुद्यावर माहिती मागितली आहे त्या सर्व मुद्यावरील माहिती सर्वसाधारणतः समाविष्ट आहे असे दिसून येते. आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर माहिती उपलब्ध असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ३ दिवसाच्या आत सदर माहिती स्वाक्षांकित करुन, विनामूल्य द्यावी त्याचबरोबर जर अपीलार्थी ही माहिती घेण्यासाठी विद्यापीठात व्यक्तिशः अथवा अधिकार पत्राव्दारे हजर राहिले नाहीत तर ही माहिती अपीलार्थीस चौथ्या दिवशी रजिस्टर्ड पोस्टाने जन माहिती अधिकारी यांनी पाठवावी असे आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी विद्यापीठाकडून माहिती आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेले सुनावणी रजिस्टर व संबंधित कागदपत्राचे अवलोकन करता विद्यापीठाच्या प्रशासकीय कार्यालयाचे व्यवस्थापनामध्ये कुलगुरु यांनी स्वतः लक्ष घालणे अत्यंत आवश्यक आहे असे आयोगास वाटते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलमांचे विद्यापीठातर्फे पदोपदी उल्लंघन केले जात असल्याचे व कार्यालयीन अभिलेखे व्यवस्थित न ठेवल्याचे आयोगास आढळून आले आहे तेव्हा या प्रकरणी कुलगुरुंनी स्वतः लक्ष देऊन हे अभिलेखे व्यवस्थित न ठेवणा-या कर्मचा-यांवर / अधिका-यांवर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल आयोगास दोन महिन्यात सादर करावा व येथून पुढे प्रत्येक नागरिकास त्यांना आवश्यक असलेली माहिती विद्यापीठाकडून विहित मुदतीत दिली जाईल या संदर्भात ठोस उपाययोजना करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. विद्यापीठासारख्या उच्च स्तरीय प्राधिकरणाने आपल्या कार्यालयीन व्यवस्थापनाचा त्यांच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालया समोर एक आदर्श ठेवण्याची सर्व समाजाची व नागरिकांची अपेक्षा असते परंतु आयोगापुढे विद्यापीठाकडून प्राप्त झालेली कागदपत्रे, अपीलांच्या सुनावणीच्या पध्दतीची पाहणी केली असता आदर्श कार्यालयीन व्यवस्थापन, प्रशासन तर सोडाच परंतु विद्यापीठाचे कार्यालयीन

व्यवस्थापन किमान, “समाधानकारक” एवढ्याही दर्जाचे नाही असे येथे खेदपूर्वक नमूद करण्यात येत आहे. कार्यालयीन शिस्तीचा अभाव, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणी बद्दल असलेली कर्मचा-यांची अनास्था व त्यांचे ज्ञान पाहता त्यांना कार्यालयीन व्यवस्थापनाचे धडे देण्यासंदर्भात कुलगुरुंनी वेळोवेळी कार्यशाळा व शिबीरे आयोजित करावीत अशा सूचना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (A) (IV) व (V) या कलमाअन्वये कुलगुरु यांना देण्यात येत आहेत व अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली पूर्ण माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाचे आत स्वाक्षांकित करुन व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, व्दारा कनकदंडे यांचा वाडा,सरकारवाडा, अंबेवेस, परळी वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (शै.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (BCUD) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कुलगुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना वरील निकालपत्रातील नोंद घेऊन संचालक (BCUD) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना या आयोगातर्फे ज्या ज्या वेळी सुनावण्या होतील त्या त्या वेळी हजर राहण्यास सक्त सूचना आपल्या पातळीवरुन निर्गमित करण्यासंदर्भात व वरील निकालपत्रातील सूचना संदर्भात.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १७२/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक ०४ मे, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.धोतरे माधव यादवराव द्वारा/- नवाबची बिल्डींग डॉ. साजीदच्या समोर मोदीखाना, जालना. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, जालना. | .. | प्रतिवादी |
| २. | जन अपिलिय अधिकारी तथा सचिव समता शिक्षण समिती, द्वारा/- धम्मदीप संघ, जालना. | .. | |

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-०४ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.धोतरे माधव यादवराव (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) व जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, जालना श्री. सरोदे विक्रम रावण ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हजर आहेत. तर जन अपिलिय अधिकारी तथा सचिव, समता शिक्षण समिती द्वारा धम्मदीप संघ, जालना ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. त्यांच्या नावावर पाठविलेले पत्र अपूर्ण पत्ता असा शेरा लिहून परत आहे. तथापि या पत्यावर अपिलार्थीने केलेले

प्रथम अपिला संदर्भात  संस्थेच्या सचिवाना त्याच पत्यावर सदरचे अपिल पोंहचल्याची पावती आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक- १८-११-२००६ रोजी संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्याकडे तीन वेगवेगळ्या अर्जाव्दारे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" **प्रथम अर्ज-**

सन २००१ ते ३० एप्रिल, २००५ पर्यंतच्या कालावधीची सेवापुस्तिकेची छायांकितप्रत

**व्दितीय अर्ज-**

सावित्रीबाई फले मागास वर्गीय मुलीची शिष्यवृत्ती २००४ ते २००६ पर्यंतची शिष्यवृत्ती वाटप व मुलीची नांवे व रक्कम इत्यादी.

**तृतीय अर्ज-**

१९९३ ते २००५ या कालावधीतील  वेतनेतर अनुदानाच्या हिशोबाची माहिती व १९८५ नंतर शाळेवर प्रशासक देण्याचा निर्णय व शाळेची मान्यता काढण्याचे कारण."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षीली होती.

वरील तीन अर्जापैकी तृतीय अर्जामध्ये जनमाहिती अधिकारी यांचेकडे शाळा मान्यता काढून घेण्याचे कारण  विचारले आहे व वेतनेतर अनुदानाच्या हिशोबाची माहिती विचारली आहे. यावरुन अपिलार्थीस नक्की कोणती माहिती हवी आहे. याचा स्पष्ट बोध होत नाही.

अपिलार्थीच्या दिनांक- १८-११-२००६ रोजीच्या अर्जावर अपिलार्थी यास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- २६-१२-२००६ रोजी प्रथम उत्तर दिले आहे. यामध्ये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्या ऐवजी ही माहिती पाहवयाची असल्यास आपण पाहू शकता व त्यास माझी कसलीही हरकत केंव्हाही राहणार नाही, असे उत्तर दिले आहे.

या उत्तरावर समाधन न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी दिनंक- २७-१२-२००६ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलाचे कारण म्हणजे मुख्याध्यापक यांनी दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी व असमाधानकारक असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अपिलावर संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीहि सुनावणी न घेता दिनांक- २३-०१-२००७ रोजीच्या पत्रा अन्वये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना जी माहिती हवी आहे. त्या संदर्भात उपलब्ध असलेल्या माहितीचा खर्च त्यांचेकडून घेवून सर्व माहितीची छायांकित प्रती पुरविण्या संदर्भात मुख्याध्यापक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, जालना यांना आदेश दिले.

जनअपिलिय अधिकारी यांची अपिल ठरविण्याची ही कृती बरोबर नाही. जनअपिलिय अधिकारी यांनी अपिलामध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये विहित केलेल्या मुदतीत सुनावणीची तारीख ठेवून जनमाहिती अधिकारी व अपिलार्थी यांना एकत्र बोलावून त्या दोघांचे म्हणणे ऐकून घेवून त्यावर अपिलिय अधिकारी यांनी निर्णय देणे अपेक्षित आहे. जनअपिलिय अधिकारी यांच्या या कृतीची शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, जालना यांनी नोंद घ्यावी.

जनअपिलिय अधिकारी यांच्या या निर्णया नंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती न मिळाल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १२-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये अपिलार्थीने त्यांची मुळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस सावीत्रीबाई फुले शिष्यवृत्ती संबंधित व सदर संस्थेला प्राप्त झालेल्या अनुदाना संदर्भात सर्व माहिती दिनांक- १४-०२-२००७ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी दिली. तथापि अपिलार्थी यांच्या सेवापुस्तिकेची प्रत व शाळेवर  प्रशासक नेमणूकीचे कारण ही माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडून आज पावेतो उपलबध होवू शकली नाही. शाळाची मान्यता काढून घेवून शाळेवर प्रशासक नेमण्या संदर्भात अपिलार्थी यांने संबंधित शिक्षणाधिकारी यांच्याकडे किंवा शिक्षण खात्यातील संबंधीत प्राधिकरणाकडे सदर नस्ती पहाण्यासाठी अर्ज करावा व त्यातून अपिलार्थीस हवी ती माहिती त्यांनी मिळवावी, अशी अपिलार्थी यांना सूचना देण्यात आली.

अपिलार्थीच्या सेवापुस्तिकाबाबत मुख्याध्यापक डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, जालना यांना विचारले असता त्यांनी सदर सेवापुस्तिका अपिलार्थी यांनी तयार करुन दिल्या नंतर त्याच्या दोन प्रती करुन घेवून एक प्रत अपिलार्थी यास देण्यात येईल, असे सांगितले. मुख्याध्यापक यांनी सुनावणीमध्ये दिलेले हे उत्तर अत्यंत अयोग्य व चुकीचे आहे.  प्रत्येक  कर्मचा-यांची सेवापुसितका ही अद्यावत तयार ठेवण्याची जबाबदारी ही संबंधित  शिक्षण संस्थेची आहे. सेवापुस्तिका नियमितपणे

भरणे हे संबंधित शिक्षण संस्थेचे आस्थाविषयक प्रथम कर्तव्य आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेला पत्रव्यवहार पाहता या शिक्षण संस्थेमध्ये इतर कर्मचा-यांची व शिक्षकांची सेवा पुस्तिका अद्यावत ठेवली आहे किंवा कसे या बाबत सभ्रम निर्माण होण्यासारखी स्थिती आजमितीस या शाळेचा कारभारा संदर्भात आहे, असे येथे म्हटल्यास वावगे होणार नाही.

शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, जालना यांना सुचीत करण्यात येते की, या शाळेच्या संदर्भात तसेच त्यांच्या कार्यक्षेत्रात येणा-या इतर सर्व संस्थेच्या शाळामध्ये कर्मचारी व शिक्षक यांच्या सेवापुस्तिका संबंधित संस्थेने अद्यावत ठेवल्या आहेत किंवा नाही हे पहाण्याची एक धडक मोहिम हाती घ्यावी. जेणेकरुन शिक्षण संस्थेतील कर्मचारी व शिक्षक यांच्या सेवापुस्तिका बाबतचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल.

दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकला असता अपिलार्थी यांच्या सेवापुस्तिकेच्या प्रती सदर संस्थेने अपिलार्थीस विनामुल्य देण्यास काहीच हरकत नाही. परंतू अपिलार्थीने कोरे सेवापुस्तक बाजारातून विकत घेवून ते सेवापुस्तक शाळेमध्ये द्यावे, अशी अपेक्षा मुख्याध्यापक यांनी व्यक्त केली. सर्व कर्मचा-याचे व शिक्षकांचे सेवापुस्तीका अद्यावत नोंदी घेवून तयार करणे हे सबंधित शिक्षण संस्थेचे आस्थापना विषयक बाबींमध्ये प्रथम कर्तव्य असल्यामूळे सदर शिक्षण संस्थेने स्वखर्चाने अपिलार्थीची सेवापुस्तिका पूर्णतः तयार करुन त्याची स्वाक्षांकित प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी. असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

तसेच माहिती अधिकार कायदा २००५ च्या अमंलबजावणी संदर्भात शिक्षण संस्थेतील कर्मचारी व शिक्षक यांच्या पातळीवर अद्यापही अनभिज्ञता दिसून येत आहे. तेंव्हा शिक्षण संचालक, संचानालय पुणे यांनी या कामी वेगवेगळया प्रकरणी आयोगास

आढळून येणारा विलंब पहाता सर्व शासकीय/खाजगी शिक्षण संस्थेतील कर्मचारी व शिक्षक यांच्या माहिती अधिकार कायदा २००५च्या अमंलबजावणीच्या संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा/ शिबीरे आयोजित करुन कर्मचारी व शिक्षक यांना मार्गदर्शन करण्याची व्यवस्था करावी. असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. शिक्षण संचालक यांनी सर्व शासकीय व खाजगी शिक्षण संस्थेतील कर्मचारी व शिक्षक यांच्या माहिती अधिकार कायदा २००५ अमंलबजावणीच्या संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा/ शिबीरे आयोजित करुन कर्मचारी व शिक्षक यांना मार्गदर्शन करण्याची व्यवस्था करावी.

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

औरंगाबाद
दिनांक ४ मे,२००७
प्रति,

१ श्री.धोतरे माधव यादवराव, व्दारा/- नवाबची बिल्डींग डॉ.साजीदच्या समोर मोदीखाना, जालना.

२ जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, जालना, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी सचिव, समता शिक्षण समिती व्दारा धम्मदीप संघ, जालना यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७४/२००७

निर्णय दिनांक ०४-०५-२००७

सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, व्दारा : अपीलार्थी
बुद्रुककर निवास, माध्यमिक शाळेमागे,
विद्यानगर, परळी वैजनाथ जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य कै. :
लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी
वैजनाथ जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव कै. : प्रतिवादी
लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी
वैजनाथ जिल्हा बीड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी सौ. आसेगावकर संध्या सखारामपंत (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी वैजनाथ जिल्हा बीड डॉ. रेखा जनार्धनराव परळीकर

(यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी वैजनाथ जिल्हा बीड श्री. रविंद्र शामराव देशमुख हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक ०३-१०-२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी वैजनाथ जिल्हा यांचेकडून खालील प्रमाणे १५ मुद्यावर माहिती मागविली होती.

> ‘‘ आपल्या वरिष्ठ महाविद्यालयातील पीएचडी प्रबंध विद्यापीठाकडे सादर केलेल्या पण पीएचडी पदवी नोटीफिकेशन प्राप्त न झालेल्या अधिव्याख्यात्यांची संपूर्ण नावे व विद्यापीठ मान्यता प्रत २) पीएचडी पदवी नोटीफिकेशन प्राप्त नसलेल्या अधिव्याख्यात्यांना कोणत्या शासन नियमानुसार वेतन देण्यात येते त्या शासन नियमांची प्रत व पीएचडी प्रबंध विद्यापीठाकडे सादर केला पण पीएचडी पदवी प्राप्त नाही अशा अधिव्याख्यात्यांचे वेतन व त्यांना सेवा सातत्य कोणत्या नियमा नुसार देता येते त्या शासन व विद्यापीठ नियमाची प्रत ३) दिनांक ०९-०९-२००६ रोजी दै. मराठवाडा साथी मधील ‘कनिष्ठ लिपीक’ पदासाठी दिलेल्या जाहिराती ची सत्यप्रत ४) ‘कनिष्ठ लिपीक’ पदासाठी आलेल्या अर्जाची एकूण संख्या व अर्जाच्या सत्यप्रती द्याव्या ५) ‘कनिष्ठ लिपीक’ पदासाठी एकूण अर्जापैकी अपंग उमेदवाराच्या अर्जाच्या सत्यप्रती व संख्या द्यावी ६) वरिष्ठ महाविद्यालयात एकूण मान्य कर्मचारी संख्या व अनुदानित पदे व विना अनुदानित पदे याबाबत मा. सह संचालकाच्या मान्यतेच्या सत्यप्रती ७) मा. शिक्षण संचालक पुणे यांचे दिनांक ०८-

०९-२००६ चे वय क्षमापित रद्द करणेबाबतच्या पत्राची सत्यप्रत ८) मा. शिक्षण संचालक पुणे यांच्या दिनांक ०८-०९-२००६ च्या पत्रानुसार आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या सत्यप्रती द्याव्या ९) वरिष्ठ महाविद्यालयातील कर्मचारी (शिक्षकेत्तर) बिंदुनामावलीनुसार रोस्टरच्या सत्यप्रती १०) शिक्षकेत्तर मान्य पदाच्या संख्येनुसार अनुदानित पदावर अपंग आरक्षणा नुसार भरती केलेल्या अपंग उमेदवाराची यादीची सत्यप्रत ११) दिनांक ०९-०९-२००६ रोजी दै. मराठवाडा साथी मधील कनिष्ठ लिपीक पदासाठी सेवायोजन कार्यालयाची घेतलेल्या यादीची व पत्राची सत्यप्रत १२) सेवायोजन कार्यालयाची यादी घेऊनच उमेदवाराची निवड करण्यात यावी याबाबत शासन नियमाची सत्यप्रत १३) वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा-याच्या सेवापुस्तकाच्या सत्यप्रती १४) गणित विभागातील प्राध्यापकांनी संख्याशास्त्र विषयातुन पीएचडी प्राप्त केली आहे अशा प्राध्यपकांनी विद्यापीठातील गणित विभागाकडून संख्याशास्त्रातील पीएचडी गणित विषयाच्या पीएचडीशी समकक्ष आहे याबाबत विद्यापीठाकडून समकक्षता पत्रघेतले असल्यास त्या पत्राची सत्यप्रत द्यावी १५) मा. सह संचालक / शासनाने अपंगाच्याच जागा भरण्यासंबंधी आपणास पत्र दिले असल्यास त्या पत्राची सत्यप्रत द्यावी व सदर पत्राचे अनुपालन आपण किती कालावधीमध्ये करणार व नसल्यास कारणे.''

अपीलार्थीच्या वरील अर्जास अनुसरुन संबंधित महाविद्यालयाचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक २०-११-२००६ रोजी प्रथम माहिती दिली.

जन माहिती अधिकारी यांचे वरील उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलार्थी यांनी जन अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २४-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. वरील अपीलाचे कारण म्हणजे जन माहिती अधिका-याने दिनांक ०३-१०-२००६ च्या अर्जाप्रमाणे

माहिती न देता त्रोटक, चुकीची व खोटी माहिती देऊन कायद्याची पायमल्ली केली असे दर्शविले आहे.

सदर अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेतल्यामुळे अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी मुळ माहितीची मागणी कायम ठेऊन संस्थेच्या प्रशासनावर सत्य माहिती लपविण्याचा आरोप केला आहे. (या प्रथम अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०५-२००७ रोजी म्हणजे व्दितीय अपिल सुनावणीच्या अदल्या दिवशी घेऊन अपीलार्थीचे अपील निकाली काढले आहे.)

आज झालेल्या युक्तीवादामध्ये आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या व संबंधित कागदपत्राची पाहणी करता जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ब-याच मुद्यांची स्पष्ट उत्तरे दिलेली दिसत नाहीत. मुद्दा क्रमांक ४, ५ व १३ या संदर्भात ही बाब त्रयस्त पक्षाशी संबंधित असल्यामुळे माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी पत्रात नमूद केले आहे. अपीलार्थीच्या मुद्दा क्रमांक ४, ५ व १३ या प्रश्नाचे अपेक्षित उत्तराचे स्वरुप पाहता त्यामध्ये कोणाच्याही वैयक्तीक स्वातंत्र्यास बाधा पोहोचेल अशा स्वरुपाची माहिती असल्याचे दिसून येत नाही. त्याच बरोबर अपीलार्थीच्या प्रथम अर्जाच्या इतर मुद्दयावर 'पत्रावर कारवाई चालू आहे,' 'माहिती नंतर देण्यात येईल ' अशा प्रकारची उत्तरे दिली आहे.

याच बरोबर संस्थेतर्फे आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले गेले आहे की, संबंधित अपिलार्थी त्यांच्या संस्थेत तासिका तत्वावर कार्यरत होत्या व त्यांना आता या संस्थेमध्ये पूर्णवेळ नोकरी हवी आहे. त्यांची मागणी संबंधित कॉलेज पूर्ण करु शकत नसल्याने अपिलार्थी केवळ संस्थेस त्रास देण्याच्या उदिष्टाने वेळोवेळी निराधार आरोप करुन कॉलेज प्रशासनास त्रास देत आहेत. त्याच बरोबर अपीलार्थी हे वारंवार वेगवेगळ्या प्रकारच्या व्यापक

स्वरुपाची माहिती विचारतात व माहिती दिली असता ती घेण्याचे नाकारतात किंवा त्यास लागणारे शुल्क भरत नाहीत. अपीलार्थीच्या या वर्तनाची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे.

सर्वप्रथम माहिती वेळेत दिली नाही, जी दिली तीही त्रोटक स्वरुपात या अपिलार्थीच्या म्हणण्यामध्ये, आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्राची छाननी करता, बराचसा तथ्यांश आढळून आला आहे. तथापि आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती अधिक स्पष्ट स्वरुपात व स्वाक्षांकित करुन १० दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने मागितलेली सर्व माहिती स्पष्टपणे व स्वाक्षांकित करुन जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसात माहिती विनामुल्य पुरवावी असे आदेशित करण्यात येत आहे. त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी माहिती देण्यास लावलेल्या विलंबाबाबत त्यांना आयोगा तर्फे ताकीद देण्यात येत आहे याची नोंद सदर शिक्षण संस्थेने घ्यावी.

**निर्णय**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्याने मागविलेली संपूर्ण माहिती स्वाक्षांकित करुन व स्पष्ट स्वरुपात हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आत विनामुल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, व्दारा बुद्रुककर निवास, माध्यमिक शाळेमागे, विद्यानगर, परळी वैजनाथ जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी वैजनाथ जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी वैजनाथ जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८१/२००७

निर्णय दिनांक ०४-०५-२००७

| | | |
|---|---|---|
| सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, व्दारा<br>बुद्रुककर निवास, माध्यमिक शाळेमागे,<br>विद्यानगर, परळी वैजनाथ जिल्हा बीड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव<br>(शैक्षणिक) डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक<br>(BCUD) डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी सौ. आसेगावकर संध्या सखारामपंत (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (शैक्षणिक) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद श्री. इश्वरसिंग

रायभान मंझा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (BCUD) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक २५-१०-२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (शैक्षणिक) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांचेकडे कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी वैजनाथ जिल्हा बीड यांचे संदर्भात व या महाविद्यालयात अधिव्याख्यातापदी भरती केलेल्या विषया संदर्भात खालील ७ मुद्यावर माहिती मागितली होती.

> "१) कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी वैजनाथने विद्यापीठा कडे पत्र क्र. १३१/२००३-०४ दिनांक २५-०८-२००३ नुसार कोणकोणत्या विषयाची जाहिरातीसाठी परवानगी मागितली त्या पत्राची सत्यप्रत २) विद्यापीठाने पत्र क्र. २४८३६-३८ दिनांक १-३/०१/२००४ व पत्र क्र. २६२४०-४२ दिनांक ०४-०२-२००४ व पत्र क्र. २५२७६ दिनांक १५-१२-२००५ नुसार सदर महाविद्यालयातील अधिव्याख्यातांना मान्यता देण्यासाठी तयार केलेल्या कार्यालयीन टिप्पणीच्या सत्यप्रती ३) मा. कुलगुरुकडे दिनांक ०९-१०-२००३ रोजी मी दिलेल्या इतिहास विषयाच्या पूर्णवेळ जाहीरात रद्द करणे संबंधी दिलेल्या निवेदनाची सत्यप्रत व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवालाच्या सत्यप्रती ४) मा. कुलगुरु व मा. संचालक बी. सी. यु. डी. यांच्याकडे स्थानिक निवडीसंबंधी माहिती व न्याय मिळणेसंबंधी मी दिलेल्या सन २००३ ते २००६ पर्यत दिलेल्या निवेदनाच्या सत्यप्रती व त्यावर केलेल्या कार्यवाही अहवालाच्या सत्यप्रती ५) मा. कुलगुरुकडे इतिहास विषयाचे रोस्टर बदलून दिलेली जाहीरात रद्द करणेबाबत मी दिलेल्या निवेदनाच्या सत्यप्रती व त्यावर केलेल्या

कार्यवाही अहवालाच्या सत्यप्रती ६) प्रा. विद्या व्यंकट देशपांडे यांच्या सन ९९-२००० च्या मान्यतेबाबत मा. संचालक बी. सी. यु. डी. यांच्याकडे दिलेल्या तक्रारीची व त्यावर केलेल्या कार्यवाही अहवालाची सत्यप्रत ७) दप्तर दिरंगाई कायद्यानुसार विद्यापीठाकडे दिलेल्या निवेदनावर किती दिवसात कारवाई करणे बंधनकारक आहे व दिलेल्या निवेदनावर विद्यापीठाने केलेल्या कारवाई अहवालाच्या सत्यप्रती व दिलेल्या निवेदनावर कारवाई केली नसल्यास संबंधीत अधिकारी दोषी आहेत काय, असल्यास त्यांची संपूर्ण नांवे व पदनाम इ. माहिती द्यावी."

अपीलार्थीच्या माहितीच्या वरील अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे दखल न घेता आजतागायत कोणतीही कारवाई केली नसल्याचे आज आयोगास आढळले. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्या नुसार अपीलार्थीने वरील मुद्दयावर इतर वेगवेगळ्या अर्जाव्दारे यापुर्वी माहिती मागितली होती ती अपीलार्थीस पुरविण्यात आली असल्यामुळे अपीलार्थीच्या या अर्जावर कोणतीही कारवाई केली नाही. जन माहिती अधिकारी यांची ही भूमिका आयोगास मान्य नाही. अपीलार्थीच्या प्रत्येक अर्जावर, जरी माहितीची मागणी वारंवार समाविष्ट झाली असली तरी प्रत्येक अर्जनिहाय अपीलार्थीस जेवढी माहिती देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अभिप्रेत आहे तेवढी माहिती अपिलार्थीस विहित कालावधीत देणे अनिवार्य आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताच प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपीलार्थीने दिनांक १३-१२-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपीलीय अधिकारी यांनी देखील या प्रकरणी आजतागायत कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही व याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर कबूली दिली आहे.

जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीने केलेल्या माहिती व अपील अर्जावर विहित मुदतीत करवाई केली नाही त्याबद्दल आयोग नापसंती व्यक्त करत आहे. याच बरोबर या प्रकरणी जन अपीलीय अधिकारी यांनी दर्शविलेल्या बेफिकीरीची व त्यांच्यातील कर्तव्य परायणतेच्या अभावाची नोंद यथायोग्यरित्या कुलगुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांनी घ्यावी अशी आयोगाची शिफारस आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये अपीलार्थीने त्यांची मूळ अर्जाव्दारे केलेली माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती विहित मुदतीत का पुरविली गेली नाही असे विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी विद्यापीठाकडे त्याच त्या विषयावर वेगवेगळ्या अर्जाव्दारे तेच तेच ते मुद्दे उपस्थित करुन वारंवार माहिती विचारत असतात. अपीलार्थीने या प्रकरणी मागितलेली माहिती यापुर्वीच त्यांना वेळोवेळी पुरविली आहे. तसेच काही प्रकरणा मध्ये अपीलार्थीने ही मागणी नाकारली आहे व पोस्टाने पाठविल्यावर ती माहिती सोडवूनही घेतली नाही अशी उदाहरणे त्यांनी आयोगा समोर दिली. यावर अपीलार्थी यांनी सदर रक्कम भरुन त्यांना फक्त माहितीच्या सुरुवातीचे (फॉरवर्डींग लेटर) पत्र मिळाले परंतु त्या बरोबर जोडलेली माहिती प्राप्त झाली नाही असे आयोगा च्या निदर्शनास आणले.

वरील समर्थन हे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती न देण्याचे सबळ कारण होऊ शकत नाही. या अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी आजतागायत पुरविली नाही हे वास्तव आहे. या वास्तवाचे भान लक्षात घेतल्यास जन माहिती अधिकारी यांची, अपिलार्थी यांना माहिती न देण्याची कृती, त्यांचा माहिती अधिकार

अधिनियम २००५ प्रती असलेला अनादरच स्पष्ट करीत आहे. पुर्वी वेगवेगळ्या माहितीव्दारे ही माहिती अपिलार्थीस पुरविली आहे म्हणून या अर्जाची दखल घेतली गेली नाही हा एकच युक्तीवाद जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये केला. त्यांचा युक्तीवाद, अर्थातच प्रत्येक अर्जाचे वेगळे अस्तित्व लक्षात घेता पटण्यासारखा नाही. जन माहिती अधिकारी यांचे अपीलार्थीस पुर्वीच्या दुस-या अर्जाच्या संदर्भात ही माहिती पुरविली आहे असे गृहीतक आयोगास मान्य नाही. सबब या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यापोटी झालेल्या असमर्थनीय विलंबाप्रित्यर्थ प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण २५००० रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी एकाच हप्त्यात, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाचे आत शासकीय कोषागारात भरावी असे आदेशित करण्यात येत आहे.

आज सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांना या अर्जाव्दारे जी माहिती अपेक्षित आहे ती माहिती दोन दिवसात विनामुल्य देण्याचे कबूल केले आहे. त्याच बरोबर या माहिती संदर्भात अपीलार्थीस काही शंका असल्यास विद्यापीठाच्या या विषयावरील संदर्भिय नस्त्या कार्यालयीन टिप्पणीसह अपीलार्थीस या आठवड्यात उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले आहे. तेव्हा असे आदेशित करण्यात येते की जन माहिती अधिकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांनी अपीलार्थीने मागितलेल्या मूळ अर्जातील माहिती स्पष्ट स्वरुपात, स्वाक्षांकीत करुन, हे आदेश प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसाचे आत पुरवावी. त्याच बरोबर अपीलार्थीने या विषयावरील विद्यापीठाकडील सर्व उपलब्ध नस्त्या पाहण्यासाठी लेखी मागणी केल्यानंतर त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीचे पालन करुन या विषयाशी सर्व संबंधित नस्त्या सात दिवसाचे आत उपलब्ध करुन द्याव्यात असे आदेशित करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांनी अपीलार्थीने मागितलेल्या मूळ अर्जातील माहिती स्पष्ट स्वरुपात, स्वाक्षांकीत करुन, हे आदेश प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसाचे आत पुरवावी.

३. अपीलार्थीने विद्यापीठाच्या नस्त्या पाहण्यासाठी लेखी मागणी केल्यानंतर त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीचे पालन करुन या विषयाशी सर्व संबंधित नस्त्या सात दिवसाचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

४. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यापोटी झालेल्या असमर्थनीय विलंबाप्रित्यर्थ प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण २५००० रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी एकाच हप्त्यात, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाचे आत शासकीय कोषागारात भरावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, व्दारा बुद्रुककर निवास, माध्यमिक शाळेमागे, विद्यानगर, परळी वैजनाथ जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (शैक्षणिक) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (BCUD) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कुलगुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १८२/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक ०५ मे, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.देहरे उत्तम रामनाथ<br>कुतूबपूरा, विद्यापीठगेट जवळ,<br>औरंगाबाद. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक,<br>पी.ई.एस.अभियांत्रिकी महाविद्यालय,<br>औरंगाबाद. | .. | प्रतिवादी |
| २. | जन अपिलिय अधिकारी तथा प्राचार्य,<br>पी.ई.एस.अभियांत्रिकी महाविद्यालय,<br>औरंगाबाद. | .. | |

## <u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-०५मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.उत्तम रामनाथ देहरे (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक, पी.ई.एस.अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद, श्री.सोनटक्के मोहन दिंगबर ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा प्राचार्य,

पी.ई.एस.अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद श्री. मिलींद मनोहरराव देशपांडे ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हजर आहेत.

सदर प्रकरणी अर्जदाराने दिनांक-२७-११-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे पी. ई. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद मधील वर्ग-४ च्या कर्मचा-यांनी खालील मुद्यावर माहिती मागविली होती.

> “ मुद्दे- कर्मचा-याचे नाव, जन्मतारीख, प्रथम नियुक्ती दिनांक, अस्थायी पद व दिनांक, स्थायी होते वेळेस पद व दिनांक, पदनाम, शैक्षणिक अर्हता, भरलेले पद स्थानिक जाहिराती नुसार असल्यास वर्तमानपत्राचे नाव व दिनांक, वेतनश्रेणी, अस्थायी, स्थायी, इतर माहिती अस्थायी, स्थायी कर्मचा-यांची नियुक्ती आदेशाची छायांकित प्रत देणे, कामावर कोणा मार्फत घेतले त्या नियुक्ती पत्राची छायांकित प्रति देण्यात याव्या, या मुद्यावर माहिती मागविली होती .”

अपिलार्थीच्या हया अर्जाची दखल जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम दिनांक- ०५-०१-२००७ रोजी घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक- ०५-०१-२००७ रोजी प्रथम उत्तर दिले. या पत्रामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीना दिनांक- २७-११-२००६ रोजी माहिती मिळविण्या संदर्भात केलेल्या अर्जातील माहिती त्यांना दुस-या संदर्भाव्दारे दिनांक-२४-१०-२००५ रोजी च्या पत्रान्वये पुरविली आहे. व त्याचबरोबर अपिलार्थीची याचिका मा.उच्चन्यायालयाने दिनांक- ०५-०७-२००६ रोजी निकाली काढली आहे. तेंव्हा या पुढे अशा

प्रकारचे अर्ज करु नये व महाविद्यालयास त्रास देवू नये, असे अर्जदारास या पत्रामध्ये पुढे सूचित केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपिलार्थीने केलेल्या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी अशा प्रकारचा प्रतिसाद देणे बरोबर नाही. अपिलार्थीस जरी ती माहिती दुस-या कोणत्याहि संदर्भान्वये दिली असली तरीही ती माहिती अपिलार्थीने परत मागितल्यास त्याला ती माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलमाचा योग्य तो वापर करुन विहित मुदतीत देणे माहिती अधिकारी यांना भाग आहे. त्याचबरोबर अपिलार्थीस अशा प्रकारचे अर्ज करु नये असे सूचित करणे म्हणजे अपिलार्थीच्या माहिती मागण्याच्या मूलभूत हक्कावर एक प्रकारे गदा आणण्याचा या संस्थेचा प्रयत्न आहे, असे आयोगाचे मत आहे.

अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- २४-१०-२००५ रोजी दिलेली माहिती व अपिलार्थीने दिनांक- २७-११-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे दिलेली माहिती काही प्रमाणात एकाच स्वरुपाची आहे. तथापि अपिलार्थीने त्यांचे दिनांक- २७-११-२००६ रोजीच्या अर्जामध्ये एकूण तीन जादा मुद्यावर माहिती मागीतली आहे. ते तीन मुद्दे म्हणजे वेतनश्रेणी, स्थाई, अस्थाई कर्मचा-यांच्या नियुक्ती आदेशाची प्रत व भरलेली पदे ही स्थानिक वृत्तमानपत्रातील जाहिरतीनूसार भरली असल्यास त्या वृत्तमानपत्राचे नाव व दिनांक हे होत.

अपिलार्थीस प्रथमतः जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये, कोणा मार्फत कामावर घेतले व पदे भरतांना वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती काय, या

महत्वाच्या मुद्यावर संस्थेने कोणतेही भाष्य केले नाही. त्यामूळे संस्थेच्या कारभारामध्ये पारदर्शकता नाही, असे अनुमान काढण्यास हरकत नाही.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत उत्तर प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (१) अन्वये जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दिनांक- ०५-०१-२००७ रोजी दाखल केले.

सदर अपिलाची प्रत अपिलार्थीने खाजगी टपाल सेवेमार्फत अपिलिय अधिकारी यांचेकडे पाठविली होती, तथापि सदर अपिल स्विकारण्यास जनअपिलिय अधिकारी यांनी नकार दिल्याचे अपिलार्थी यांनी आज झालेल्या सुनावणीमध्ये आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. जनअपिलिय अधिकारी यांनी त्यांच्याकडे हे अपिल प्राप्त झाले नाही असे आज सुनावणीमध्ये कबुल केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व अपिलिय अधिकारी यांनी अपिलार्थीचे कार्यालयाने अपिल स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १२-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल दाखल केले आहे. त्यामध्ये अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी हे माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे कारण दर्शवून त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे दिनांक- २७-११-२००६ रोजीच्या माहिती मागण्याच्या अर्जातील मुद्यांची शहानिशा न करता सदर माहिती अपिलार्थीस दिल्याचे कळवून या उपर अपिलार्थीने अशा

प्रकारची माहिती मागवू नये, असे त्यांचे कार्यालयाचे पत्र दिनांक- ०५-०१-२००७ रोजी अपिलार्थीस सूचित केले आहे. अपिलार्थीने या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची जरी काही मुद्यांच्या बाबतीत पुनरावृत्ती झाली तरी एकूण तीन मुद्दे नव्याने समाविष्ट केलेली आहेत व अपिलार्थीला दिलेल्या कथित माहितीमध्ये दोन मुद्यांवर जन माहिती अधिका-यांने कोणतेही भाष्य न करता ते रिकामे ठेवले आहेत.या बाबी जनमाहिती अधिकारी यांनी लक्षात घेतल्या नसल्याचे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांची ही कृती म्हणजे अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांनी दुर्लक्ष व टाळाटाळ केल्याचा पुरावा आहे. त्याच बरोबर अपिलार्थीने जनअपिलिय अधिकारी यांचेकडे अपिल केल्यानंतर सदर अपिलाची-प्रत खाजगी कोरिअर मार्फत लिफाफयामध्ये जनअपिलिय अधिकारी यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आले असता, सदर पाकीट घेण्यास संस्थेतील संबंधित कर्मचा-यांने नकार दिल्याने अपिलार्थीने पाठविलेले प्रथम अपिल जनअपिलिय अधिकारी यांच्यापर्यंत पोंहचले नाही, ही बाब देखील गंभीरस्वरुपाची व माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीला मूळ हेतूला बाधीत करणारी आहे. त्यामूळे या प्रकरणी अपिलार्थीचे प्रथम अपिल घेण्यास ज्या कर्मचा-यांनी नकार दिला. त्या कर्मचा-यांवर सदर संस्थने तात्काळ योग्यती प्रशासकीय कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा, असे आदेशीत करण्यात येत आहे. त्याचबरोबर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणीच्या संदर्भात अपिलिय अधिकारी यांनी सतर्क रहाण्याची आवश्यकता आहे. असे अपिलिय अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यांच्या संदर्भात जी बेपर्वाइ दाखविली आहे ती पाहता त्यांच्या कार्यपध्दतीमध्ये कर्तव्यपरायणतेचा अभाव आहे. असे म्हटल्यास वावगे होणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती संदर्भात मूळात

जनमाहिती अधिकारी यांनी, त्याची प्रथम दखल घेण्यासच मूळात १० दिवसाचा विलंब लावला आहे.या विलंबा प्रित्यर्थ जनमाहिती अधिकारी यांचेकडे कोणतेही समर्थन नाही, असे आयोगास सुनावणीमध्ये आढळल्यामुळे या विलंबापोटी त्यांना प्रतिदिनी रुपये २५०/- प्रमाणे एकूण २५००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाचे आत, एकाच हप्त्यात शासकीय कोषागारामध्ये जमा करावी.

आज अंतिमतः अपिलार्थीने दिनांक- २७-११-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागिलेली सर्व मुद्यावरील  स्पष्ट माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये कबुल केले आहे. तेंव्हा जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याने मागितलेली संपूर्ण व स्पष्ट स्वरुपात माहिती हे आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून सात दिवसाच्या आत विनामुल्य द्यावी, असे आदेशीत करण्यात येत आहे. प्रसंगावशात आयोगास असे आढळून आले आहे की, या संस्थेमध्ये वर्ग-३ व वर्ग-४ च्या भरती प्रकरणी संस्थेने पुरेशी पारदर्शकता ठेवली नाही. तेंव्हा संचालक, तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी या संस्थेमध्ये वेळोवेळी झालेल्या कर्मचारी भरती प्रकरणाचा आढावा घेवून विहीत नियमांचे पालन केले आहे किंवा कसे या संदर्भात आयोगाकडे दोन महिन्याच्या आत खुलासा सादर करावा. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती स्पष्ट स्वरुपात जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३.	अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी एकूण दहा दिवसांचा विलंब लावला असल्यामूळे प्रतिदिन २५०/- रु.प्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांना एकुण २५००/- रुपये शास्ती लावण्यात येत असून त्यांनी सदर शास्तीची रक्कम हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाचे आत, एकाच हप्त्यात शासकीय कोषगारामध्ये जमा करावी व त्याप्रमाणे आयोगास कळविण्यात यावे.

औरंगाबाद	**(वि. बा. बोरगे)**
दिनांक ५ मे,२००७	**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१	श्री. उत्तम रामनाथ देहारे, रा.कुतूबपूरा, विद्यापीठ गेटजवळ, औरंगाबाद.

२	जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक, पी.ई.एस.अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३	जनअपिलिय अधिकारी तथा प्राचार्य, पी.ई.एस.अभियांत्रिकी महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४	संचालक, तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, चर्चगेट जवळ, मुंबई यांना वरील अभिप्रायाची नोंद घेवून त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी निर्णयातील शास्तीची रक्कम शासकीय कोषागारामध्ये जमा केल्याबाबतचा अहवाल आयोगाकडे सादर करावा.

५	श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८३/२००७

निर्णय दिनांक ०५-०५-२००७

श्री. वाल्मीक विठ्ठलराव सिरसाठ, गुरुप्रसाद, लासूर रोड, गंगापूर जिल्हा औरंगाबाद : अपीलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग औरंगाबाद :

२ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद : प्रतिवादी

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी वाल्मीक विठ्ठलराव सिरसाठ (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग श्री. के. बी. गायकवाड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता

सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद श्री. सी. बी. पाटील (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक ०६-०२-२००६ रोजी जन माहिती अधिका-याच्या विभागीय कार्यालया अंतर्गत रोजगार हमी योजना अंतर्गत गंगापूर, वैजापूर, कन्नड व खुलाताबाद तालुक्यात झालेल्या रस्ता रुंदीकरणाच्या कामासंदर्भात खालील १४ मुद्यांवर माहिती मागितली होती.

> " १. रस्त्याच्या कामाचे नांव, २. तालुका पॉकेट, ३. कामाचा मंजुरी क्रमांक, ४. कामासाठी मंजूर निधी अ) कुशल ब) अकुशल ५. काम प्रत्यक्ष सुरु झाल्याचा दिनांक ६. कामासाठी प्रत्यक्ष खर्च झालेला निधी अ) कुशल ब ) अकुशल, ७. मातीकाम पूर्ण झालेले अंतर ८. खडीकरण पूर्ण झालेले अंतर ९. मातीकामासाठी भरण्यात आलेल्या हजेरी पत्रकांचा कालावधी व क्रमांक १०. खडीकरण मजबुतीकरण कालावधीत भरण्यात आलेल्या हजेरी पत्रकांचा कालावधी व क्रमांक ११. काम करणा-या एजन्सीचे नांव व पत्ता १२. कामाची सध्यस्थिती काय आहे १३. काम अपूर्ण असल्यास त्याचे कारण काय १४. त्या त्या कामा विषयी काही तक्रारी प्राप्त आहेत काय असल्यास त्या तक्रारींच्या प्रमाणित छायांकीत प्रती. "

अपीलार्थीच्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०२-२००६ रोजी प्रथम उत्तर दिले. या उत्तरामध्ये अपीलार्थीने मागितलेली कोणतीही माहिती न देता माहिती विस्तृत व मोघम स्वरुपाची आहे असे नमूद करुन आपणास माहिती कशी पाहिजे आहे हे अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विचारले आहे. त्याच बरोबर नेमक्या कोणत्या कामासंदर्भात अपीलार्थीस माहिती अपेक्षित आहे हे जन माहिती अधिकारी यांनी या पत्रामध्ये अपीलार्थीस विचारले आहे.

वरील अर्जाव्दारे मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीने परत दिनांक २७-०४-२००६ रोजी त्या माहितीसाठी प्रथम अपील केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि या अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आढळून आले आहे. जन अपीलीय अधिकारी यांचे या मुद्यावर असे म्हणणे आहे की त्यांनी सदर सुनावणी गुरुवार दिनांक २९-०६-२००६ रोजी ११-०० वाजता त्यांचे कार्यालयात ठेवली होती. सदर सुनावणीचे निमंत्रण त्यांनी अपीलार्थीस दूरध्वनीव्दारे दिले होते तथापि अशा प्रकारचा कोणताही दूरध्वनी अपीलार्थीस प्राप्त न झाल्याचे अपीलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये आयोगाचे निदर्शनास आणून दिले आहे. जन अपिलीय अधिका-यांची अपिल ठरविण्याची ही कृती चुकीची आहे. त्यांनी अपिल सुनावणी घेतली किंवा नाही याबाबत संशय वाटावा असे त्यांचे वर्तन आहे. त्यांच्या वर्तनाची दखल सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांनी यथायोग्य घ्यावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

अपीलार्थीस जन माहिती अधिकारी तव्दतच जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपीलार्थीने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगा कडे दिनांक २४-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले.

आज रोजी आयोगापुढे झालेल्या सुनावणीमध्ये अपीलार्थी यांना अद्यापही आवश्यक ती माहिती संबंधित जन माहिती अधिका-याकडून मिळाली नसल्याचे ते सांगत आहेत. सदर माहिती पैकी बहुतांश माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी तयार असून ती माहिती अपीलार्थीस देण्याची त्यांनी तयारी दर्शविली आहे. अपीलार्थीने मागितलेली माहिती एवढ्या विलंबाने तयार करण्याची कारणे विचारली असता सदर माहिती विस्तृत स्वरुपाची होती असे जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे सांगण्यात आले. त्याच बरोबर व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या तारखेपर्यत देखील वैजापूर, कन्नड या दोन उपविभागाची माहिती

जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाली नसल्याचेही त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

या संपूर्ण प्रकरणात अपीलार्थीने माहितीची मागणी केल्यानंतर एवढा प्रदीर्घ कालावधी (१ वर्षे ५ महिने) लोटूनही अद्यापी माहिती तयार नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. म्हणजेच ही माहिती अपीलार्थीस देण्यास त्यांनी टाळाटाळ किंवा हेतुपुरस्सर विलंब लावल्याचे अप्रत्यक्षरित्या सिध्द होत आहे. या रस्त्याच्या कामात बरेच गैरप्रकार घडून या कामासंबंधी विधानसभेत प्रश्नोउत्तरे ही झाली असल्याचे अपीलार्थीने आयोगासमोर सांगितले. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचे गांभीर्य सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांनी लक्षात न घेता अपीलार्थीस माहिती देण्यासाठी अनाकलनीय व असमर्थनीय असा विलंब लावला आहे व आज देखील ही माहिती संपूर्णतः त्यांच्याकडे तयार नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांचे हे म्हणणे म्हणजे आपले कर्तव्य पाळण्यात त्यांनी केलेला अक्षम्य कसूर आहे असे आयोगाचे मत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात दाखविलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी क्रमांक २० (१) च्या आधीन राहून प्रतिदिन रुपये २५० या प्रमाणे एकूण रुपये २५००० ची शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाचे आत एका हप्त्यात शासकीय कोषागारात जमा करावी. अंतिमतः अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती सात दिवसात देण्याचे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी आयोगासमोर कबूल केले आहे तेव्हा अपिलार्थीस त्याने मुळ अर्जाव्दारे (दिनांक ०६-०२-२००६) मागितलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिका-याने हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाचे आत विनामुल्य पुरवावी असे आदेशित करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती सात दिवसात देण्याचे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी आयोगासमोर कबूल केले आहे तेव्हा अपिलार्थीस त्याने मुळ अर्जाव्दारे (दिनांक ०६-०२-२००६) मागितलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाचे आत विनामुल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात दाखविलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम क्रमांक २० (१) च्या तरतुदीप्रमाणे प्रतिदिन रुपये २५० या प्रमाणे एकूण रुपये २५००० ची शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाचे आत एका हप्त्यात शासकीय कोषागारात जमा करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वाल्मीक विठ्ठलराव सिरसाठ, गुरुप्रसाद, लासूर रोड, गंगापूर जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग औरंगाबाद निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १५५/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ७ मे, २००७.

१. श्री. रविंद्र भानुदासराव बडसल, .. अपिलार्थी.
तारुगल्ली बडसले लेन, पैठण
जिल्हा- औरंगाबाद.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

२. जन अपिलिय अधिकारी तथा ..
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद.

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०७ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.रविंद्र भानुदासराव बडसल (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) व जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ), जन अपिलिय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थी यांनी दिनांक- २२-०३-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या नोकरी संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१) मी दिनांक- ०६-११-२००० व ३१-१२-२००२ रोजी आरोग्य सेवक म्हणून दोन वेळा अर्ज दिले आहेत. त्याचप्रमाणे औरंगाबाद खंडपिठाने रिटपिटीशन नं. ५३१९/२००१ प्रमाणे.

२) मी आपणाकडे दिनांक- ०६-११-२००० व ३१-१२-२००२ रोजी आरोग्य सेवक म्हणून (धरणग्रस्त) नोकरी देणे बाबत अर्ज केले आहेत. अद्याप पावेतो हायकोर्ट औरंगाबाद याचीका क्र.५३१९/२००१ दाखल केली आहे. या कोर्टने आपणास आदेश देऊनही ५ वर्ष होवून केले तरी मला नोकरी दिलेली नाही. तेंव्हा आपणा विरुध्द व शासना विरुध्द हायकोर्टाचा याचीका क्र ५३१९/२००१ च्या आदेशाचा आपण व शासनाने अवमान केलेला आहे. त्या विरुध्द मला हायकोर्टामध्ये अवमान याचीका दाखल करावयांची आहे. तरी मला १५ दिवसांुचे आत आपण माझे नोकरी संबंधी काय कार्यवाही करणार आहोत याचा खुलासा करावा, ही विनंती.

३) त्याचप्रमाणे मला आण ०५-०५-२००६ पर्यंत आरोग्य रक्षक म्हणून नोकरी न दिल्यास मी आपले कार्यालया समोर माझे मुलाबाळासह दिनांक- ०६-०५-२००६ पासून मी उपोषणास बसेल. त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, हयांची नोंद घ्यावी.

४) सोबत मी दिनांक-०६-११-२००० व ३१-१२-२००२ अर्जाची याचीका क्र.५३१९/२००१ ची झेराक्स प्रत आपले माहितीसाठी जोडली आहे.- म.कळावे.

सदर माहिती अपिलार्थीने शीर्घ टपालाव्दारे  मागितली होती.

अपिलार्थीने मा.उच्च न्यायालयातील याचिका क्रमांक-५३१९/२००१ च्या संदर्भात जनमाहिती अधिकारी हे काय कार्यवाही करीत आहे, याचा खुलासा मागविला आहे. त्याच बरोबर दिनंाक- ०५ मे, २००६ पर्यंत आरोग्य रक्षक म्हणून अपिलार्थीस नोकरी न मिळाल्यास जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालया समोर उपोषणास बसण्याचे जिल्हा परिषदेस कळविले आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये खुलासा वजा स्पष्टीकरण देणे जनमाहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही याची जाणीव अपिलार्थीस सुनावणीच्या वेळी करुन दिली आहे.

अपिलार्थी यांच्या माहितीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक जिपऔ/आरोग्य/ अस्था-३-ब/८७२०/०६, दिनांक- २९-०३-२००६ रोजीच्या पत्रा अन्वये  स्वयंस्पष्ट अशी माहिती अपिलार्थीस दिली आहे. त्याच बरोबर अपिलार्थीने मागितलेली माहिती महाराष्ट्र माहिती अधिकार २००२ अन्वये मागितली असल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आणून दिले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने जन अपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २४-०४-२००६ रोजी प्रथम अपिल केले. या प्रथम अपिलामध्ये अपिलार्थीने जनअपिलिय अधिकारी यांचे नाव श्री.एम.व्ही.नेटके (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या नावाने अपिल केले आहे. परंतू श्री.नेटके या नावाचे कोणीही अधिकारी भाप्रसे संवर्गा मध्ये औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत नाहीत. म्हणून हे अपिल विचारात घेण्या योग्य नव्हते. तरी ही जनअपिलिय अधिकारी यांनी सुनावणी दिनांक- २६-०५-२००६ व १२-०६-२००६ या दोन दिवशी घेतली दिनांक- २६-०५-२००६ व १२-०६-२००६ हया दोन्हीहि दिवशी अपिलार्थी हे सुनावणीच्या वेळी गैरहजर राहीले, असे दिसून येते. याचे कारण अपिलार्थीने सुनावणीचे पत्र त्यांना उशिराने मिळाल्यामूळे सुनावणीसाठी ते हजर राहू शकले नाहीत, असे आज झालेल्या सुनावणीमध्ये त्यांनी कबुल केले आहे.

जनअपिलिय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिलावर दिनंक-१२-०६-२००६ रोजी सुनावणी घेवून, अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी नोंदणीकृत्त टपालाने अपिलार्थीस पाठविली असल्यामूळे अपिलार्थीचे अपिल निकाली काढले.

जनअपिलिय अधिकारी यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीवर समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपिल केले आहे. अपिलार्थीने माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलाची कारणे, अपिलार्थीस सुनावणीचे पत्र उशिरा मिळाले, अपिलार्थीस सुनावणीस हजर राहता आले नाही,त्यामुळे अपिलार्थीस

त्यांची बाजू मांडता आली नाही, अशी दर्शविली आहेत. म्हणून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे जनमाहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांच्यावर दंडात्मक , शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची आयोगाकडे विनंती केली आहे. याच बरोबर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाची छाननी केली असता अपिलार्थीस मा.उच्च न्यायालया कडील रिटपिटीशन क्रमांक ५३१९/२००१ नूसार अपिलार्थीच्या अर्जावर काय कार्यवाही झाली आहे. त्याचबरोबर जिल्हा परिषद औरंगाबाद येथे बहुउद्देशिय आरोग्यसेवक (पुरुष) या संवर्गातील रिक्त पदावर अपिलार्थीस प्रकल्प बाधीत व्यक्तीच्या कोटयातून जिल्हा परिषदेच्या आरोग्य खात्यामध्ये नियुक्ती हवी आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे असे सांगण्यात आले की, बहुउद्देशीय आरोग्य सेवक पुरुष या पदा करिता शासनाच्या आरोग्य विभागाने काही नियम निश्चीत केले आहेत. या नियमामध्ये एकूण ४० टक्के पदे जिल्हापरिषदेस सरळ सेवाभरतीने भरती करता येतात. तथापि या प्रवर्गामध्ये आधिच जादा प्रमाणात भरती झाल्यामूळे आता या प्रवर्गात त्यांच्याकडे जागा शिल्लक नाही.

दोन्ही बाजूच्या युक्तिवाद ऐकून व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राची तपासणी करता प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता नाही. तथापि अपिलार्थीच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करता जनमाहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस बहुउद्देशिय आरोग्य सेवक (पुरुष) या पदा करिता येथून पुढे ज्यावेळी रिक्त पदे उपलब्ध होतील त्यावेळी अपिलार्थीस या पदावर नेमणूक देण्या करिता प्राथम्याने व गुणवत्तेवर विचार करावा व त्याच बरोबर मा.उच्च न्यायालयातील

रिटपिटीशन क्रमांक-५३१९/२००१ च्या आदेशाचे पुढे काय झाले. या शंकेच्या निरसनार्थ अपिलार्थीस या संदर्भातील सर्व नस्त्या जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनूसार अपिलार्थीकडून त्याप्रमाणे लेखी अर्ज प्राप्त झाल्यानंतर तीन दिवसाच्या आत अपिलार्थीस पहाणीसाठी उपलब्ध करुन द्याव्यात, जनमाहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती दिल्याने त्यांचेवर कार्यवाही आदेशीत करण्यात येत नाही. सबब खालील प्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल फेटाळण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे या विषयावरील नस्त्या पहाण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांचेकडे त्याप्रमाणे लेखी विनंती अर्ज केल्यास माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनूसार अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्याव्यात.

औरंगाबाद
दिनांक ०७ मे ,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.रविंद्र भानुदासराव बडसल, तारुगल्ली बडन्सले लेन, पैठण, जिल्हा-औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७३/२००७

निर्णय दिनांक ०७-०५-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. माने आण्णा दिगंबर व्दारा श्री टेलर, क्रांती चौक तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. आण्णा दिगंबर माने (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद श्री. संभाजी शिवाजी माने (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक

अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ उस्मानाबाद श्री. एस. के. नऊटाके (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१०-२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, लोहरा येथील एकूण किती कामांचे तुकडे २००५-२००६ मध्ये पाडले आहे, २५ लाख रुपयाच्या आतील २००५-०६ मध्ये उमरगा, तुळजापूर, उस्मानाबाद, लोहरा येथील पाडलेले तुकडे किती आणि त्याची कारणे काय आहेत हे अवश्य देणे."

थोडक्यात २००५ ते २००६ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर, उमरगा, लोहरा येथील उपविभागामध्ये एकूण किती कामांचे व किती तुकडे पडले आहेत, आणि त्याची कारणे अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असल्याचे दिसते. सदर माहिती अपीलार्थीने टपालाव्दारे मागितली होती.

अपीलार्थीच्या या अर्जास अनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस प्रथम दिनांक ०३-११-२००६ रोजी ही माहिती पुरविण्यासाठी लागणारे शुल्क रुपये २ जन माहिती अधिकारी कार्यालयात भरण्यासाठी कळविले. दिनांक ०३-११-२००६ रोजी सदर सूचना प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०७-११-२००६ रोजी अपीलार्थीने रुपये २ ही रक्कम जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात भरली. याप्रमाणे अपीलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्या कडून पोहोच पावती देण्यात आली. त्या पोहोच पावतीचा क्रमांक २७८७०१८ असा आहे. सदर रक्कम प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिका-याने अपीलार्थीस त्याच दिवशी माहिती दिल्याचे आयोगापुढे सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

तथापि जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल

करणारी असल्याची कारणे देऊन जन अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०८-११-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता एका साध्या पत्राव्दारे दिनांक ०८-१२-२००६ रोजी अपीलार्थीस त्यांचे अपील निकाली काढण्यात आले असल्याचे कळविले व याच पत्रामध्ये जन अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांनी अपीलार्थीस पुर्वी कळविलेली माहिती स्वाक्षांकित करुन देण्याची सूचना दिली. यावर अपीलार्थीचे समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपीलार्थीने दिनांक १७-०१-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस एकूण किती कामाचे तुकडे केले व त्याची कारणे अपीलार्थीस विहित मुदतीत पुरविली आहे तथापि एकूण किती तुकडे पडले याच्या संख्येचा उल्लेख सदर माहिती मध्ये नाही. याच बरोबर अपीलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलाची पाहणी करता जन माहिती अधिकारी यांनी कामाचे तुकडे पाडण्याची जी कारणे त्यांनी कळविली आहे त्या कारणाने अपीलार्थी समाधानी नाही असे दिसून येते. अपीलार्थीस अद्यापही जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी हे त्यांच्यापासून काही माहिती लपवीत असल्याचा त्यांच्या मनात संशय असावा असे दिसते. अपीलार्थीच्या मनातील संशय दूर करण्याच्या दृष्टीने अपीलार्थीने जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात जाऊन २००५ ते २००६ या आर्थिक वर्षातील कामाच्या निविदा संदर्भातील सर्व नस्त्या पाहाव्यात म्हणजे कामाचे तुकडे पाडण्याची कारणे व तुकडे पाडण्यास मंजूरी कोणी दिली या संदर्भात माहिती सहज प्राप्त होऊ शकेल त्यामुळे असे आदेशित करण्यात येते की अपीलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी अद्यापही जी माहिती अपीलार्थीस देणे आवश्यक आहे ती माहिती

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तीन दिवसात विनामुल्य द्यावी व त्याच बरोबर अपीलार्थीने लेखी विनंती अर्ज केल्या नंतर ३ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील २००५-२००६ या कालावधीतील निविदा संदर्भातील सर्व नस्त्या अपीलार्थीस पाहण्या साठी उपलब्ध करुन द्याव्यात.

याच बरोबर जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी न घेता एका साध्या पत्राव्दारे अपील निकाली काढले त्यांचे हे वर्तन त्यांच्यातील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करते, याची यथायोग्य नोंद सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी घ्यावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. माने आण्णा दिगंबर व्दारा श्री टेलर, क्रांती चौक तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ

उस्मानाबाद यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक १२५-२००७-रामाआ-औ'बाद.

निर्णय दिनांक १२ एप्रिल २००७

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गोपाळ तुकारामपंत देव,<br>केळी बाजार, सुपारी हनुमान रोड,<br>कामधेनू कॉर्नर समोर,<br>औरंगाबाद. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय<br>अधिकारी, औरंगाबाद. | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणात आज दिनांक १२-०४-२००७ रोजी औरंगाबाद येथे सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गोपाळ तुकारामपंत देव, (यापुढे त्यांना अपीलार्थी संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद, श्रीमती अपर्णा सोमाणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी संबोधण्यात येईल), आणि जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद श्री.अे.एम.शिंदे (यापुढे त्यांना अपिलिय अधिकारी संबोधण्यात येईल), हे हजर होते.

वरील प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक- ०७-१२-२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती मागितली होती व त्याच बरोबर जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेले काही अहवाल पहाणीसाठीची मागणी खालील प्रमाणे केली होती.

" १) सर्वे नंबर ८३ व ९१ चा सिटी सर्वे झाला की नाही व झालेला असल्यास किती क्षेत्राचा या बाबत खुलासा आपण नगर भुमापन अधिकारी यांना दिनांक- १२-१-०६ रोजी जा.क्र. ०६/जमा/२/ कावि या पत्रानुसार मागवलेला आहे. नगर भुमापन कार्यालयाने क.प.भु-२/ बा.क्र./३३७/०६, दिनांक- २७-४-०६ ला पाठविलेल्या उत्तरा सोबत सिटी सर्वे नंबर, शिटनंबर व पी.आर.कार्ड सादर केले आहेत. सिटी सर्वे झालेले क्षेत्र वजा जाता शिल्लक राहीलेल्या जमीनीचे क्षेत्र व नकाशा दाखवण्यात यावा व त्यानुसार तयार केलेले ७/१२ मला देण्यात यावा.

२) दिनांक २९-५-०६ रोजी क्र. २००६/जमा/२/कावी- या पत्राव्दारे नगर भुमापन अधिकारी यांना सर्वे नंबर ८३ व ९१ मधिल किती क्षेत्राचे हद्दीपर्यंत सी. टी. एस. झालेला आहे. त्याबाबत नकाशाच्या प्रतीसह आपणास अहवाल सादर करावा असे म्हटले आहे. त्यानुसार नगर भुमापन कार्यालयाने पाठविलेला अहवाल व नकाशा आणी त्यावर आपण केलेली कारवाई मला वाचण्यासाठी दाखवण्यात यावा. तसेच नगर भुमापन कार्यालयाच्या अहवालाची झेरॉक्स प्रत व आपण त्यावर केलेल्या कारवाईची झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

३) नगर भुमापन कार्यालयाच्या २७-४-०६ च्या पत्रानुसार सवे नंबर ९१ पैकीचा भाग न.भु.क्र. १७८४९ व सर्वे नं. ८३ पैकी १७८५० या दोन सिटी सर्वे नंबरच्या

पी.आर.कार्डवर " शेतीकडे " असे लिहीले आहे. बोकीच्या २६ पी.आर.कार्डवर ' अ 'म्हणजे अकृषी असे लिहीले आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा. "

अर्जदाराने मागणी केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता काही माहिती अर्जदार यांनी प्रश्नार्थक स्वरुपात विचारली असून काही मुद्यावर त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचा खुलासा विचारल्याचे दिसून येते. अशा प्रकरणाचे खुलासे अपेक्षित करणारी माहिती अपिलार्थीने करणे या कायद्या अन्वये अभिप्रेत नाही, असे अपिलार्थीना सांगण्यात आले.

अपिलार्थीच्या वरील अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनाक- ०४ जानेवारी, २००७ रोजी प्रथम उत्तर दिले.

तथापि या उत्तरावर अपिलार्थीचे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी दिनांक- १० जानेवारी, २००७ रोजी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार प्रथम अपिलिय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल केले. या अपिलाची अपिलिय अधिकारी यांनी दिनांक- १७ जानेवारी २००७ रोजी सुनावणी घेवून अपिल अंतिम केले व त्यामध्ये अपिलार्थीस प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती सोडून इतर उपलब्ध सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्सप्रती अपिलार्थीस आठ दिवसात देण्याचे सूचीत केले. तद्नंतर जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांचे कार्यालयातील पत्र दिनांक- २५-०१-२००७ व्दारे अपिलार्थीस आवश्यक असणारी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येवून घेवून जाण्याचे सूचीत केले. या पत्राच्या सूचनांच्या अनुषंगाने अपिलार्थी हे जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वारंवार गेले असतांना देखील त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. असे अपिलार्थीने आज सुनावणीत सांगितले.

कोणत्याहि प्रकारे माहिती प्राप्त न झाल्याने व्यथीत होवून अपिलार्थी यांनी दिनांक- ०८-०२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल केले. आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी अपिला मध्ये प्रथम केलेल्या अर्जाव्दारे केलेली मागणी कायम ठेवली असल्याचे स्पष्ट केले.

अपिलाचे कारण म्हणून अपिलार्थी यांनी अपूर्ण व असमाधानकारक उत्तर व माहिती अप्राप्त असे दिले आहे. या प्रकरणाच्या संदर्भात आज रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये औरंगाबाद येथील सर्वे नंबर ८३ व ९१ मधील १७८४९ व १७८५० या दोन भुखंडाच्या पीआर कार्डावरती शेतीकडे असा उल्लेख केला आहे हे दोन भूखंड सोडून इतर सर्व भूखंडाच्या उता-यावर अकृषी व सारामाफी असा उल्लेख आहे. फक्त या दोन भूखंडाचा शेतीकडे असे लिहीण्या मागचा महसूल यंत्रणेचा हेतू जाणण्याची अपिलार्थीची इच्छा आहे. तव्दतच या क्षेत्रामध्ये असलेले अंतर सर्व भूखंडाचे क्षेत्र वजा करुन अर्जदारास १७८४९ व १७८५० या भुखंडाच्या ७/१२ चा उतारा हवा असल्याचे दिसून येते. अर्जदाराने केलेली मागणी ही कायदेशीर आहे. तथापि ही मागणी नगर भुमापन कार्यालयाशी संबंधीत आहे. असे अपिलिय अधिकारी यांच्या तर्फे प्रतिपादन करण्यात आले. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती महसूल विभाग व नगर भुमापन विभाग या दोन्हीहि विभागाशी संबंधित ही माहिती असल्यामूळे या प्रकरणाची जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी स्वतः तपासणी करुन अपिलार्थी यांना माहिती न मिळण्याची कारणे शोधून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी व अपिलार्थी यांनी मागणी केलेली आवश्यक ती कागदपत्रे पुढील तीस दिवसाच्या आत त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास त्यानंतर आठ दिवसाच्या आत सादर करावा व त्याच बरोबर या प्रकरणातील सर्व नस्त्या अपिलार्थी यांना, ज्या वेळी सदर नस्ती अपिलार्थी हे पहाणीसाठी लेखी मागणी करतील, त्यावेळी प्राथम्याने माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनूसार

अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्याव्यात. असे आदेशित करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१ अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२ जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी या प्रकरणाची स्वतः तपासणी करुन अपिलार्थी यांनी मागणी केलेले आवश्यक ती कागदपत्रे तीस दिवसाच्या आत त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत व त्याच बरोबर अर्जदारास माहिती वेळेत न मिळण्याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी.

औरंगाबाद
दिनांक १२ एप्रिल, २००७

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

प्रत-

१ श्री. गोपाळ तुकारामपंत देव, केळीबाजार, सुपारी हनुमान रोड, कामधेनु कॉर्नर समोर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८६/२००७

निर्णय दिनांक १६ मे २००७

श्री. मुदखेडकर महमद एकबाल महमद युसूफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बस स्टँड रोड, नांदेड : अपीलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय हदगाव तालुका हदगाव :

२ अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार हदगाव तहसील कार्यालय हदगाव तालुका हदगाव : प्रतिवादी

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय हदगाव तालुका हदगाव श्री. गायकवाड डी. एन. (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल) हे उपस्थित आहेत. अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार हदगाव तहसील कार्यालय हदगाव तालुका हदगाव या पदाचा कार्यभार नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय हदगाव यांच्याकडेच आहे.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम दिनांक ३१-०३-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" हदगाव तालुक्यातील एकूण ५ अर्धघाऊक रॉकेल विक्रेते १) राजेश्वर नामदेवराव पत्तेवार, २) गणेश ट्रेडिंग कंपनी, ३) ओमप्रकाश नथमल काबरा, ४) गोविंद रघुनाथ यम्मेवार, ५) दिगांबर दमकोंडवार यांना शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेलचे नियतन तसेच त्यांना सलग्न असलेले किरकोळ रॉकेल परवानेधारक यांना वितरण केलेल्या रॉकेच्या वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती मिळणेबाबत तसेच त्यांच्या बिलांची सत्यप्रत मिळणेबाबत. "

अपीलार्थीस सदर माहिती २००४-०५ व २००५ ते मार्च २००६ या दोन वर्षातील हवी होती. अपीलार्थीने ही माहिती साधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपीलार्थीने त्यांच्या माहितीच्या अर्जावर जरी दिनांक ३१-०३-२००६ अशी तारीख दर्शविली होती तरी प्रत्यक्षात हा अर्ज माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०४-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

जन माहिती अधिका-याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थीने दिनांक ०२-०५-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. ह्या अपीलामध्ये अपीलार्थीने त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. यानंतर दिनांक ०९-०५-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्यापोटी येणा-या खर्चाचा प्रती पृष्ठ दर कळवून ही माहिती घेऊन जावी असे अपीलार्थीस सुचविले.

तथापि अपीलार्थीच्या या प्रथम अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की त्यांनी अर्जदारास दिनांक ०९-०५-२००६ रोजी माहिती तयार असून ती आवश्यक त्या रकमेचा भरणा करुन घेऊन जाण्यासंदर्भात कळविले होते. तथापि जन

माहिती अधिकारी यांच्या या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी फक्त सदर माहिती देण्यापोटी येणा-या खर्चाचा प्रती पृष्ठ दर रुपये दोन इतका अपीलार्थीस कळविला आहे व त्याच बरोबर अपीलार्थीस ही माहिती त्यांचे कार्यालयातून घेऊन जाण्याविषयी सुचित केले आहे. जर अपीलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असती तर त्यांनी अपीलार्थीस शासकीय कोषागारात एकूण किती रक्कम भरावयाची हे कळविले असते तथापि या ठिकाणी अपीलार्थीने एकूण किती रक्कम भरणे आवश्यक आहे हे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले नाही. त्याच बरोबर अपीलार्थीस ही माहिती पोस्टाने अपेक्षित असतांना अपीलार्थीस स्वतःच्या कार्यालयात बोलावून माहिती घेऊन जाण्याचे सुचित करणे हे जन माहिती अधिका-याचे वर्तन अयोग्य आहे. त्याच बरोबर अपीलाची सुनावणी न घेण्याची कारणे विचारली असता जन अपीलीय अधिकारी यांनी अपील अर्जावरच निर्णय दिला आहे असे जन अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यांच्या या कथित निर्णयाची पाहणी केली असता त्यांनी अपीलार्थीच्या अपील अर्जावर " ना. त. (पुरवठा) यांनी माहितीच्या अधिकाराखाली संबंधितास माहिती देण्यासारखी असल्यास द्यावी " असा शेरा दिनांक ०४-०५ रोजी अर्जावर दिलेला आहे. वस्तुतः अपीलार्थीने मागणी केलेली माहिती अपीलार्थीस जन माहिती अधिकारी अथवा जन अपीलीय अधिकारी यांनी सहज देणे शक्य होते तथापि जन माहिती अधिका-याने येनकेन प्रकारण माहिती देण्याचे नाकारले असे आयोगाचे स्पष्ट मत आहे. त्याचबरोबर अपीलार्थी ने मागणी केलेली "माहिती देण्यासारखी असल्यास द्यावी " हा अपीलीय अधिकारी यांचा कथित निर्णय न पटण्यासारखा आहे कारण त्यांना जर ही माहिती खरोखरच द्यावयाची इच्छा असती तर त्यांनी त्याप्रमाणे स्पष्ट अभिप्राय या पत्रावर दिले असते.

थोडक्यात या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांनी आपल्या कृतीमध्ये कर्तव्य परायणतेचा अभाव असल्याचे पुरेपूर सिध्द केले आहे असे आयोगाचे मत आहे. ही माहिती देण्यासंदर्भात पुढील चौकशी करता अपीलार्थीने मागितलेली माहिती अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०७-२००६ रोजी दिल्याचे जन माहिती अधिकारी व

जन अपीलीय अधिकारी सांगत आहेत व त्याप्रमाणे ती माहिती मिळाल्याचे अपीलार्थीची पोच त्यांनी आयोगा समोर सादर केली आहे. ही माहिती देण्याकरिता अपीलार्थीस शुल्क आकारले किंवा नाही यासंबंधीचा कोणताही उल्लेख सदर कागदपत्र नस्तीमध्ये उपलब्ध नाही. थोडक्यात या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय ही माहिती अपिलार्थीस देण्यापोटी ५२ दिवसांचा विलंब झाल्याचे सिध्द होत आहे. त्यांनी माहिती पुरविण्या पोटी लावलेल्या या असमर्थनीय विलंबाकरिता त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिवशी रुपये २५० याप्रमाणे १३००० रुपयांची शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीची रक्कम त्यांनी शासकीय कोषागारात हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत व एका हप्त्यात भरावी व सदर रक्कम शासकीय कोषागारात विहित मुदतीत भरल्याची खात्री जिल्हाधिकारी नांदेड यांनी करुन त्याप्रमाणे त्यांनी आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सादर करावा. याच बरोबर अपीलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपील ठरवितांना दाखविलेल्या वर्तनाची यथायोग्य नोंद जिल्हाधिकारी नांदेड यांनी घ्यावी असेही पूढे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती पुरविण्यासाठी लावलेल्या एकूण ५२ दिवसांच्या असमर्थनीय विलंबाकरिता त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये १३००० ची शास्ती लावण्यात येत आहे. सदर रक्कम त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत व एका हप्त्यात शासकीय कोषागारात भरावी.

औरंगाबाद

दिनांक १६ मे २००७ ( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

<u>प्रत,</u>

१ श्री. मुदखेडकर महमद एकबाल महमद युसूफ, संपादक सत्यवृत्त, मिल कॉर्नर, एस. टी. स्टॅंड रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय हदगाव तालुका हदगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार हदगाव तहसील कार्यालय हदगाव तालुका हदगाव

४ जिल्हाधिकारी नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १८७/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १६ मे, २००७.

१. श्री.मनोहर पिल्लाप्पा भवानकर .. अपिलार्थी.
(माजी दप्तर कारकुन)
साखर कारखाना रोड, वसमतनगर
तालूका- वसमत, जिल्हा-हिंगोली.
विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
पुर्णा पाटबंधारे विभाग,
वसमतनगर.

२. जन अपिलिय अधिकारी तथा ..
अधिक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे
मंडळ, नांदेड.

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-१६ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे विभाग वसमतनगर तालूका- वसमत, जिल्हा- हिंगोली, श्री.ग.श्री.शेंद्रे ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत तर

अपिलार्थी श्री.मनोहर पिलप्पा भवानकर ( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल ) जन अपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे दोघेही गैरहजर आहेत. अपिलार्थीने जरी आयोगाकडे १९ (३) कलमान्वये अपिल दाखल केले असले तरी अपिलार्थीच्या मागणीचे स्वरुप पाहता आजची सुनावणी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम (१८) खाली घेण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातील फरकाची रक्कम अदा करण्या विषयी माहिती अधिकार अधिनियम २००५ चा आधार घेतला आहे.

अपिलार्थी श्री.मनोहर पिलप्पा भवानकर हे पूर्णा पाटबंधारे विभाग वसमतनगर या जलसंपदा खात्या अतर्गत असलेल्या विभागामध्ये दप्तर कारकून या पदावर कार्यरत होते. ते दिनांक ३१-०७-१९९६ रोजी नियत वयोमानानूसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्ती नंतर त्यांना मिळणा-या सेवानिवृत्ती वेतना संदर्भात अपिलार्थी यांनी कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे मंडळ वसमतनगर यांच्याकडे अर्ज केला व दिनाक- ०१-०१-१९९६ ते ३०-०६-१९९९ पर्यंतची पेन्शनची थकीत रकम मिळणे बाबत विनंती केली होती. सेवानिवृत्ती वेतन देण्या संदर्भात विलंब का झाला, असे जनमाहिती अधिकारी यांना सुनावणीच्या वेळी विचारले असता त्यांनी संबंधित कर्मचा-यांच्या सेवापुस्तकातील त्रुटी, या त्रुटीमूळे वेतनपडताळणी पथकाकडून लागणारा विलंब तद्नंतर महालेखापाल नागपूर यांच्या कार्यालयाकडून लागलेला विलंब, अशी कारणे सांगितले. अपिलार्थी यांना देय असलेली सर्व थकीत रक्कम अपिलार्थीस दिनांक- १७-०७-२००६ रोजी चुकती करण्यात आली आहे. तथापि सदर रक्कम अपिलार्थीस मिळाल्याचा पुरावा जनमाहिती अधिकारी आज आयोगा समोर दाखल करु शकले नाही. अपिलार्थीस देय

असलेली संपूर्ण रक्कम वरील दिनांकास दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आज शपथपत्रावर कबुल करीत आहेत.

अपिलार्थीने त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असा उल्लेख केला आहे. या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांना आज झालेल्या सुनावणीच्या वेळी विचारले असता त्यांनी अपिलार्थीच्या देयकामध्ये महागाई भत्याची रक्कम प्रथम चुकीची भरली होती तथापि त्यावर कोषागार कार्यालयाने हरकत घेतल्या नंतर सदर महागाई भत्याची रक्कम दुरुस्त करण्यात आली व अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण रक्कम रुपये ४,१४८/- त्यांना देण्यात आली आहे. अपिलार्थीस माहिती देतांना चुकीची महागाई भत्याची रक्कम भरुन त्यांना माहिती देण्यात आली होती. तथापि तद्‌नंतर ही चुक दुरुस्त करुन अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण रक्कम त्यांना चुकती करण्यात आली आहे, असे सांगितले.

आजच्या सुनावणीस अपिलार्थीची असलेली अनुपस्थिती पहाता व जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेली माहिती पहाता अपिलार्थीस त्यांच्या सेवानिवृत्ती फरकाची रक्कम संपूर्णपणे मिळाली असल्याचे दिसत आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिला नंतर (दिनांक- ०५-०६-०६) अपिलार्थीस त्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखे पर्यंतची देय असलेली फरकाची रक्कम दिनांक-१०-०७-२००६ रोजी मिळालेली असल्याने अपिलार्थी हे सुनावणीच्या वेळी हजर राहीले नाहीत असे अनुमान काढण्यास हरकत नाही. सबब अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे. करिता खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

# निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १६ मे,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.मनोहर पिल्लाप्पा भवानकर(माजी दप्तर कारकुन)साखर कारखाना रोड, वसमतनगर,तालूका- वसमत, जिल्हा-हिंगोली.

२ जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे मंडळ, वसमतनगर तालूका वसमत जिल्हा हिंगोली.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, अधिक्षक अभियंता,नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड.

४ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २१५/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १६ मे, २००७.

१. श्रीकृष्ण एल.देशपांडे, .. अपिलार्थी.
सोनी महाल,
३८ महावीर हाऊसींग सोसायटी,
नांदेड- ४३१६०२.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर. .. प्रतिवादी

२. जन अपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद. ..

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-१६ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.श्रीकृष्ण एल.देशपांडे (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर श्री.अ.तु.नवटाके ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद श्री.विकास नारायण पाटील ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०७-०६-००६ रोजी सार्वजनिक बांधकाम उपविभाग वैजापूर या उपविभागातंर्गत केलेल्या व करण्यात येत असलेल्या रोहयो अंतर्गत कामांची माहिती मागविली होती. याच बरोबर या उपविभागात कार्यरत असलेल्या शाखा अभियंत्याची संख्या व शाखा अभियंता निहाय कामांची सविस्तर माहिती मागविली आहे. सदर माहिती अर्जदाराने २००० ते २००६ या आर्थीक वर्षाच्या कालावधीतील मागविली होती. या माहितीमध्ये एकूण ११ मुद्दे समाविष्ट असल्याचे दिसून येते. यातील अकराव्या मुद्यांमध्ये त्यांनी कांही भागात प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली आहे. तथापि या प्रश्नाचे स्वरुप पहाता ही माहिती देणे सोपे असल्याचे दिसून येते. याच बरोबर अपिलार्थीने मस्टर क्रमांक २२८८४ या क्रमांकाच्या मस्टरची सत्यप्रत मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीने टपाला व्दारे अपेक्षिली आहे. प्रस्तूतच्या माहितीचा कालावधी दिनांक- ०१-०४-२००० ते ३१-०३-२००६ हा दर्शविलेला आहे.

अपिलार्थीच्या वरील अर्जास उत्तर म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २४-०७-२००६ रोजी, ''आपण मागितलेली माहिती मोघम स्वरुपाची व तसेच नेमकी कोणती माहिती आवश्यकक आहे. याचा खुलासा करावा, म्हणजे यावर कार्यवाही करणे सोयीस्कर होईल'', असे उत्तर दिले. अपिलार्थीच्या मूळ

अर्जातील मागणीचे स्वरुप पहाता, अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यकक्षातील सर्व कामांची माहिती विचारली व त्याच बरोबर मस्टर क्रमांक-२८८८४ ची सत्यप्रत देखील मागविली आहे. अपिलार्थीने विचारलेल्या माहितीचे स्वरुप पहाता, जनमाहिती अधिकारी यांचे "ही मागणी मोघम स्वरुपाची आहे," असे म्हणणे या ठिकाणी गैरलागू होते. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिका-यास अपिलार्थीने दिनांक-१४-०८-२००६ रोजी परत एक पत्र लिहून त्यांचे म्हणणे जन माहिती अधिका-यास कळविले आहे. यामध्ये अपिलार्थीने संबंधित शाखा अभियंत्यांस सुलभ संपर्क व्हावा म्हणून संबंधित शाखा अभियंत्यांचे दुरध्वनि क्रमांक मागितले आहेत. तथापि तेही जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून काहीही उत्तर प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १०-०९-२००६ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपिलाची सुनावणी जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- ३१-१०-२००६ रोजी घेतली व वरील सुनावणीमध्ये अपिलार्थीस दिनांक- १३-११-२००६ पूर्वी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिका-यांस आदेशीत केले. तथापि अपिलार्थीस अपिलिय अधिकारी यांनी निर्णय देवूनही जनमाहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून

राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १६-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल केले. सदर व्दितीय अपिल आयोगास दिनांक- १९-०२-२००७ रोजी प्राप्त झाले आहे.

आज झालेल्या सुनावाणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची होती व ती विहीत मुदतीत, नेहमीची कामे सांभाळून, देणे अवघड होते. यावर अपिलार्थीने जर विस्तृत स्वरुपाची माहिती विचारली होती व ती देणे जन माहिती अधिका-यांस शक्य नव्हते तर  ती माहिती देण्या संदर्भातील त्यांचा निर्णय जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ७ (९) अन्वये  अपिलार्थीस कळविणे अभिप्रेत आहे. तथापि जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- १३-११-२००६ पर्यंत माहिती देण्याचे आदेशित केल्या नंतरही जनमाहिती अधिकारी दिनांक- २४-०४-२००७ पर्यंत अपिलार्थीस माहिती देवू शकले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप जरी विस्तृत असले तरी ही माहिती याही पेक्षा कमी कालावधीत अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे जनमाहिती अधिका-यास सहज शक्य होते.  कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातून त्यांचे वरिष्ठ कार्यालयांस, जिल्हाधिकारी, तहसीलदार यांचे कार्यालयांस नियमितपणे पाठविली जात असते. तथापि जनमाहिती अधिकारी यांनी माहिती त्यांच्या कनिष्ठ अधिका-यांकडून मिळविण्यांच्या दृष्टीने काहीही प्रयत्न केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. आता ही माहिती तयार असल्याचे व अपिलार्थीस माहिती देण्यांची तयारी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविली आहे. हे जरी खरे असले तरी माहिती देण्यांस विलंब लावला हे वास्तव कायम राहाते. सबब अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी लावलेल्या या असमर्थनिय

विलंबा बाबत जनमाहिती अधिकारी यांना २५०/-रुपये प्रतिदिन या प्रमाणे एकुण रुपये २५,०००/- एवढी शास्ती लावण्यात यावी, असे आदेशित करण्यांत येत आहे.

त्याच बरोबर सदर माहिती संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याकडून गोळा करुन अपिलार्थीस द्यावयाची असल्यामूळे व संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी जनमाहिती अधिका-यास सदर माहिती वेळेवर न दिल्यामूळे हा विलंब लागला आहे. असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये अपिलार्थीस अशा प्रकरणामध्ये माहिती देण्यासाठीची प्रचलित पध्दत पहाता, सदर शास्तीची रक्कम जनमाहिती अधिकारी आणि सर्व संबंधित कनिष्ठ अभियंते यांच्यामध्ये विभागणी करुन सदर शास्तीची रकम सर्व संबंधितांनी एकाच हप्त्यात शासकीय कोषागारामध्ये हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाचे आत भरावी. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी या शास्तीची रक्कम, त्यांना आवश्यक वाटल्यांस, सर्व संबंधितामध्ये विभागणी करुन द्यावी. शास्तीची संपूर्ण रक्कम शासकीय कोषागारात भरल्या बाबत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक मंडळ, औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमीत झाल्या पासून ४५ दिवसाचे आत आयोगास अनुपालन अहवाल पाठवावा. त्याच बरोबर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मुळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती स्पष्ट स्वरुपात सात दिवसाचे आत विनामुल्य पुरवावी, असेही आदेशित करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित केल्यापासून सात दिवसांचे आंत स्पष्ट स्वरुपात व विनामुल्य अपिलार्थीस पुरवावी.

३. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी लावलेल्या असमर्थनिय विलंबा बाबत जनमाहिती अधिकारी यांना २५०/-रुपये प्रतिदिन या प्रमाणे एकुण रुपये २५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत असून त्यांनी सदर शास्तीची रक्कम योग्य त्या शिर्षाखाली जिल्हाकोषागारात तीस दिवसाच्या आत जमा करावी.

४. वरील आदेश क्र.३ च्या अनुपालनाचा अहवाल अधिक्षक अभियंता सा.बा.मंडळ औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसांचे आंत आयोगांस सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १६ मे,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्रीकृष्ण एल.देशपांडे, सोनी महाल, ३८ महावीर हाऊसींग सोसायटी, नांदेड- ४३१६०२

२ जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बांधकाम भवन, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५९/२००७

निर्णय दिनांक  १७-०५-२००७

श्री. बाळकृष्ण बापुराव शिंदे, मातोश्री, म्हाडा : अपीलार्थी
आर-२८, एच. आय. जी. १७३१, एन-७,
सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, :
आस्थापना, कुलसचिव कार्यालय मराठवाडा
कृषि विद्यापीठ, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा कुलगुरु, : प्रतिवादी
मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. बाळकृष्ण बापुराव शिंदे हे गैरहजर आहेत. तर जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी श्री. एस. एन. काकडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय

अधिकारी तथा कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. के. एम. लव्हाडे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथमतः जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २२-०३-२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ १) विद्यापीठ पत्र क्रमांक एपीआर-३२, दिनांक २५-०८-२००५, २) शासन पत्र क्रमांक मकृवि ११०५/२७१९७/प्र.क्र.५०७/६-ए, दिनांक मार्च २००६ वरील पत्राच्या प्रमाणित प्रती व निलंबनाच्या दिरंगाईची कारणे ३) शासनाकडे प्रकरण पाठविण्याच्या निर्देशाची नक्कल, ”

सदर माहिती अपीलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती. माहितीचा संबंधित कालावधी एप्रिल २००५ ते मार्च २००६ असा अपीलार्थीने दर्शविला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून या पत्राच्या विहित मुदतीत माहिती अपीलार्थीस कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा वरुन दिसून येते. अपेक्षित माहिती विहित मुदतीत न मिळाल्यामुळे अपीलार्थीने दिनांक १५-०४-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. तथापि या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणताच निर्णय घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नाही असे त्यांचे उपस्थित प्रतिनिधी यांनी मान्य केले. यावर व्यथित होऊन अपीलार्थी यांनी दिनांक १०-०७-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले होते. राज्य माहिती आयोगाकडे

केलेल्या या अपीलात त्यांनी आपली मूळ मागणी कायम ठेवली आहे. त्याच बरोबर संबंधित पत्राच्या प्रमाणित प्रती वर्षभर निलंबीत ठेवण्याची कारणे मागितली होती.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, त्यांनी अपीलार्थीस हवी असलेली माहिती त्यांचे पत्र क्रमांक एए/०१/४१/ए-३६, दिनांक १०-०८-२००६ चे पत्रान्वये दिली आहे. अपीलार्थीस पाठविलेली माहिती पाहता अपीलार्थीने प्रथम अर्जाव्दारे केलेली माहिती हीच असल्याचे दिसून येते. अपीलार्थीस आता संपूर्ण माहिती मिळाली आहे. तथापी ती एकूण ०३ महिने २१ दिवस इतक्या विलंबाने पुरविली गेली असल्याचे दिसते. सदर विलंबाची कोणतीही ठोस कारणे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाहीत. या प्रकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करतांना, अपीलार्थी सध्या मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथे “सहयोगी प्राध्यापक” या पदावर कार्यरत असून त्यांनी औरंगाबाद येथे केलेल्या कथित प्रमादाबाबत त्यांना पोलीसांनी २१ दिवस पोलीस कोठडीत अटकेत ठेवले होते. (०४-०४ ते २६-०४ असे २२ दिवस) त्यामुळे विद्यापीठाने त्यांना त्यांच्या सेवेतून निलंबीत केले होते. तदनंतर त्यांची दिनांक १८-०३-२००६ रोजी पुनर्स्थापना करण्यात आली असे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. त्याच बरोबर अपीलार्थी हे वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या स्तरावर त्यांच्या निलंबन कालावधीतील त्यांचे वेतना करिता अर्ज करत असतात. तथापि हे प्रकरण सध्या न्यायालयाकडे चालू असल्यामुळे या प्रकरणी विद्यापीठास काही कारवाई करता येत नाही असेही त्यांनी पुढे आयोगाच्या निदर्शनास आणले.

या प्रकरणी अपीलार्थीस जरी संपूर्ण माहिती मिळाली असली तरी जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीस ही माहिती देण्याकरिता एकूण ३ महिने २१ दिवस इतका विलंब

लागला हे वास्तव नजरेआड करता येणार नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ चा मूळ गाभा, कोणत्याही नागरीकाने कोणत्याही शासकीय प्राधिकरणाकडे माहिती मागितल्यास विहीत मुदतीत माहिती पुरविणे, हा आहे. या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिका-याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरूप पाहता अपिलार्थीस फक्त ३ पत्रांच्या प्रती हव्या होत्या. या प्रती जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध होत्या. (अपिलार्थीस एखाद्या कृती संदर्भात कारणे देणे या ठिकाणी अभिप्रेत नाही.) त्यामुळे या प्रती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिका-यांस सहज शक्य होते. तथापि या प्रती देण्यांस विहित मुदतीपेक्षा देखिल ३ महिने २१ दिवस एवढा जास्त कालावधी कां लागावा याचे कोणतेही कारण आयोगास उपलब्ध करून देण्यांत आलेल्या कागदपत्रावरून दिसुन येत नाही. या मागे फक्त माहिती देण्यांस टाळाटाळ करणे किंवा व्यक्तिगत लहरीपणा हेच एकमेव कारण असु शकते. माहिती विहीत कालावधीपेक्षा अक्षम्य विलंबाने देणे, अपिलाची सुनावणी न घेणे, हे विद्यापिठातील अधिका-यांचे वर्तन, त्यांची या प्रकरणी बेपर्वाई व एकूणच माहिती अधिकार अधिनियम २००५ विषयी असलेला अनादर स्पष्ट करते. त्यांचे हे वर्तन म्हणजे "माहिती नाकारणे" याचा दुसरा प्रकार आहे असे येथे म्हटल्यांस फारसे वावगे होणार नाही. यास्तव जन माहिती अधिकारी यांना या असमर्थनीय विलंबाबाबत प्रतिदिन रुपये २५० प्रमाणे एकूण २५००० रुपये शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्तीची रक्कम त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासुन ३० दिवसांचे आंत भरावयाची आहे. या प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी आता त्या जागी कार्यरत नसुन आता कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी या प्रकरणाशी संबंधीत नाही, असाही युक्तिवाद विद्यापिठाच्या वरील दोन प्रतिनिधींनी केला, तथापि हा निर्णय पदसापेक्ष असल्याने शास्ती कोणाकडुन किती प्रमाणांत वसूल करावयाची हा निर्णय कुलगुरूंनी घ्यावा असेही येथे सूचित करण्यांत येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणात अपीलार्थीस माहिती देण्यासाठी एकूण ३ महिने २१ दिवस इतका अवैध विलंब लागला. या असमर्थनीय विलंबाबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार प्रतिदिन रुपये २५० या प्रमाणे एकूण रुपये २५००० ची शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाचे आत एका हप्त्यात शासकीय कोषागारात जमा करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाळकृष्ण बापुराव शिंदे, मातोश्री, म्हाडा आर-२८, एच. आय. जी. १७३१, एन-७, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, आस्थापना, कुलसचिव कार्यालय मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १६०/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १७ मे, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ॲड.अजीत एम.देशमूख<br>व्दारा/- गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड तालूका जिल्हा-बीड. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड. | .. | प्रतिवादी |
| २. | जन अपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बीड. | .. | |

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-१७ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी ॲड.अजित एम.देशमुख (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत तर जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड, श्री.व्ही.के.बावीस्कर ( येथून पुढे त्यांना

जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,बीड श्री.एस.के.नवटाके ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०४-०५-२००६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग बीड या कार्यालयाच्या संदर्भात माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम ४ (बी) मध्ये दर्शविलेल्या एकूण सतरा अभिलेखा संदर्भातील माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या हया अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ३१-०५-२००६ रोजी अपिलार्थीस सार्वजनिक बांधकामा विभागाच्या संकेतस्थळावर जावून ही माहिती मिळवावी, असे सूचीत केले. या संकेतस्थळावर बीड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भात माहिती नूसन ती मंत्रालयीन विभागाची आहे असे अपिलार्थीस वाटल्यावरुन अपिलार्थीने माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्वये अपिलिय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दिनांक- ०५-०६-२००६ रोजी केले. या अपिलामध्ये अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २० (१) अन्वये कार्यवाही करावी, अशी विनंती केली आहे.

तद्नंतर जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- २६-०६-२००७ रोजी सुनावणी घेतली व जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यां बाबत सूचीत केले. या अपिल निर्णया मध्ये जनअपिलिय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही वेळेचे बंधन घातल्याचे दिसून येत नाही व त्याच

बरोबर त्यांच्या अपिलामध्ये अपिलार्थीने कोणत्या प्राधिकरणाकडे व्दितीय अपिल करावे, याचा उल्लेख केला नाही.

तथापि तद्नंतरही अपिलार्थीने माहिती न मिळाल्यामूळे व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १७-०७-२००६ रोजी व्दितीय अपिल केले. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) नुसार कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामूळे व तसेच जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संगणकाचा मोडेम नादुरुस्त असल्यामूळे ही माहिती अपिलार्थीस विहीत मुदतीत देता आली नाही, असे त्यांनी अपिलार्थीस सांगितले. तथापि त्यांचा हा मुद्दा आयोग गृहीत धरत नाही. कारण ही माहिती त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुस-या कार्यालयामधून घेता येणे सहज शक्य होते. त्याचबरोबर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बेबसाईटवर या माहिती करिता लागणारे सर्व नमूने तयार असून त्यामध्ये जिल्हा पातळीवरील अधिका-यासह सर्व अधिका-यांची माहिती पुरविलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांची नांवे, त्यांचा पगार अर्थसंकल्पिय तरतूद इत्यादी  माहिती त्यांनी कार्यालयाच्या हजेरीपटावरुन व वेतनपटावरुन तसेच त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीचे आदेशावरुन देणे सहज शक्य होते. तथापि त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही.

याच बरोबर जनअपिलिय अधिकारी यांनी सूचीत केल्या नंतर देखील जनमाहिती अधिकारी यांनी योग्य त्या कालावधीत माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांनी अपिलार्थीस सर्व माहिती एकूण दोन टप्यात अनुक्रमे दिनांक- १६ ऑगस्ट २००६ व २२ ऑगस्ट, २००६ रोजी पुरविली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी माहिती देण्यास एकूण ७३ दिवस इतका विलंब लावला आहे. ही माहिती दुष्ट हेतुने नाकारली नाही, हे माहिती अधिका-याचे म्हणणे जरी खरे असले तरी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अवाजवी विलंब लागला आहे, हे तेवढेच वास्तव आहे. माहिती वेळेत देणे हा माहिती अधिकार अधिनियम २००५ चा मूळ गाभा आहे. माहिती अधिकाराच्या या मूळ उद्दीष्टालाच जनमाहिती अधिकारी यांनी आपल्या वर्तनाने छेद दिला आहे. सबब या असमर्थनिय विलंबा बाबत प्रतिदिनी रुपये २५०/- या प्रमाणे एकूण रुपये १८,२५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

प्रसंगावशात सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांना असे सूचीत करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या विभागातील विविध पातळी वरील सर्व क्षेत्रीय कार्यालयानी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (ब) मधील तरतूदी प्रमाणे अपेक्षित असलेली स्वयंप्रेरित माहिती प्रसिध्द केली आहे किंवा कसे, याची खातरजमा करुन घ्यावी व त्यांच्या विभागाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालया संबंधीत अशा प्रकारची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बेबसाईटवर हे आदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्याच्या आत उपलबध होईल, असे पहावे. या सूचनेचा अनुपालन अहवाल ७५ दिवसाच्या आत सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी आयोगास सादर

करावा, असेहि पुढे आदेशित करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी लावलेल्या असमर्थनिय विलंबा बाबत जनमाहिती अधिकारी यांना २५०/-रुपये प्रतिदिन या प्रमाणे एकुण रुपये १८,२५०/- इतकी शास्ती लावण्यात येत असून त्यांनी सदर शास्तीची रक्कम योग्य त्या शिर्षाखाली जिल्हाकोषागारात तीस दिवसाच्या आत जमा करावी.

३. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी त्यांच्या विभागातील सर्व क्षेत्रीय कार्यालयानी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (ब) मधील तरतूदी प्रमाणे माहिती केली आहे किंवा कसे, याची खातरजमा करुन घ्यावी व त्यांच्या विभागाच्या विविध पातळी वरील सर्व क्षेत्रीय कार्यालया संबंधीत अशा प्रकारची स्वयंप्रेरित माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वेबसाईटवर दोन महिन्याच्या आत उपलब्ध करावी व आयोगास या सूचनांचा अनुपालन अहवाल ७५ दिवसाच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १७ मे,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ ॲड.अजित एम.देशमुख, व्दारा/- गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड, तालूका जिल्हा- बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय मुंबई, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १८८/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १७ मे, २००७.

१. सौ.पुष्पाबाई सुभाषराव मोरे .. अपिलार्थी.
जिल्हा परिषद, सदस्य,
अमरदिप-समर्थ नगर,
मु.पो. परंडा, जिल्हा- उस्मानाबाद.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा तालुका .. प्रतिवादी
कृषि अधिकारी, परंडा.

२. जन अपिलिय अधिकारी तथा ..
उपविभागीय कृषि अधिकारी, भूम.

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-१७ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सौ.पुष्पाबाई सुभाषराव मोरे (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत, अपिलार्थी यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी ॲडव्होकेट सुभाषराव मोरे हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी, पंरडा, श्री.एस.के.आसलकर ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय

कृषी अधिकारी, भुम, श्री. शिवाजी अप्पाराव माळी ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेली सर्व माहिती दिनांक- २३-०८-२००६ रोजी मिळाल्याने हे अपिल पुढे चालवू नये, अशी लेखी विनंती आयोगास केली आहे.

जनमाहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांनी अपिलार्थीस हवी असलेली माहिती पुरविली किंवा कसे या बाबत विचारणा केली असता त्यांनी अपिलार्थीस तीन गावा संदर्भात त्यांच्या विभागाची माहिती हवी होती. ती संपूर्ण माहिती दिनांक- २३-०८-२००६ रोजी दिल्याचे सांगितले आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मार्च, २००३ ते २००५ मध्ये परंडा तालुक्यातील प्रत्येक गावातील माती नालाबंधारे विषयक माहिती विचारली होती. या माहितीमध्ये प्रशासकिय मंजूर, कामावर झालेला खर्च, मजूराला वाटप केलेल्या रक्कमेची मस्टरची प्रत, अशा प्रकारची मागणी केली होती. ही माहिती एकूण ७८,०००/-इतक्या पृष्ठांची होती. असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तथापि अपिलार्थीस आवश्यक असलेली गावातील माहिती आता अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी पुरविली असल्यामूळे अपिलार्थीने आयोगाकडे आज केलेल्या अर्जातील अपिलार्थीची विनंती पहाता अपिलार्थीनी आयोगाकडे दाखल केलेले अपिल खारीज करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपिल खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक १७ मे,२००७

**(वि. बा. बोरगे)**<br>
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ सौ.पुष्पाताई सुभाषराव मोरे, जिल्हा परिषद, सदस्य, अमरदिप- समर्थनगर, मु.पो.ता.परंडा, जिल्हा- उस्मानाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, परंडा, ता.परंडा, जिल्हा- उस्मानाबाद , यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, भूम ता.भूम, जिल्हा- उस्मानाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १९२/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक १८ मे, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.श्यामते शंकर पोश्ट्टी<br>रा.कोटग्याळ, पो. माचनुर ता.बिलोली<br>जिल्हा- नांदेड. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार<br>बिलोली. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, नांदेड. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १८ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.श्यामते शंकर पोश्ट्टी, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली श्री.बी.एम.मकरंद ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणात प्रथमतः अपिलार्थी  यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- २७-१२-२००५ रोजीच्या  माहितीच्या अर्जा अन्वये  सन २००४-२००५ च्या रबी हंगामातील गारपीट वाटपा संदर्भात  खालील मुद्यावर  माहिती मागविली होती.

"१. इ.स. २००४-०५ रब्बी हंगामातील गारपिट ग्रस्त संपूर्ण तालूक्याचे वाटपाची यादी.

२. गारपिट वाटपा बाबत पीका सहित शासनाचे जि.आर.प्रत.

३. शासनास पाठवलेले अहवाल व कोणत्या पिका विषयी शासनातर्फे मदत दिले. याची माहिती.

४. मौजे- कोटग्याळ, दौलापूर, ममदापूर, व कुंडळवाडी या संपूर्ण गावांचा ७/१२ उतारा मिळणे बाबत."

अपिलार्थी हे दारिद्रय रेषेखाली असून त्यांनी ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती. अपिलार्थीस सन २००४-२००५ च्या रब्बी हंगामाच्या कालावधीतील माहिती हवी होती.

अपिलार्थीचा माहितीचा सदर अर्ज प्राप्त झाल्या नंतर  एकूण माहितीचे स्वरुप व्याप्ती  पहाता अपिलार्थीस सदर माहिती देण्यास एकूण १५,०००/- रुपये खर्च लागत असल्याचे  अनुमान जनमाहिती अधिकारी यांनी काढले. तथापि या खर्चापोटी लागणारा निधी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडे, म्हणजे जिल्हाधिकारी, नांदेड कार्यालयाकडे दिनांक- ०३-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन मागितले आहे. तथापि विहीत मुदतीत

जिल्हाधिकारी नांदेड यांच्या कार्यालयाकडून जनमाहिती अधिकारी यांना मार्गदर्शन प्राप्त झाले नाही.

तद्नंतर विहीत मुदतीत माहिती न मिळाल्यामूळे, अपिलार्थीने जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे दिनांक- १४-०२-२००६ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसते.

अपिलार्थीच्या या अपिलावर अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दिनांक- २८-०३-२००६ रोजी सुनावणी घेवून दिनांक- १०-०४-२००६ रोजी अपिलार्थीचे सदर अपिल फेटाळले व पुढे जनमाहिती अधिकारी यांनी, बिलोली तालुक्यात सन २००४-२००५ या रब्बी हंगामातील गारपिट ग्रस्ताची यादी, त्यांचे वाटप करण्यात आलेली शासनाची मदत, या बाबतची यादी नोटीस बोर्डावर लावावी व अपिलार्थीस जी.आर.ची प्रत व ७/१२ ची प्रत नियमाप्रमाणे देण्यात यावी, असे सूचीत केले.

तथापि या प्रमाणे कोणतीच कार्यवाही न झाल्यामूळे दिनांक- ०३-०७-२००६ रोजी व्यथीत होवून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे. सदर अपिल राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयास दिनांक- १५-०७-२००६ रोजी प्राप्त झाले असल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये उपस्थित असलेले जनअपिलिय अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीने ज्या स्वरुपात माहितीची मागणी केली ते स्वरुप पहाता ती माहिती देण्यापोटी एकूण १०,००० ते १५,०००/- रुपये इतका खर्च

जनमाहिती अधिकारी यांना लागणार होता. तथापि ही माहिती देण्यापोटी लागणा-या खर्चाची अर्थसंकल्पिय तरतूद त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. म्हणून त्यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे मार्गदर्शन मागितले. तसेच अशा प्रकरणात येणा-या खर्चा बाबत शासनाकडून आज पावेतो कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही व अपिलार्थी हे दारिद्रय रेषेखाली मोडत असल्याचा याचा फायदा घेवून विस्तृत स्वरुपात माहितीची मागणी करतात व ही माहिती देण्यापोटी, माहितीच्या संदर्भातील छायाकिंत प्रती काढण्या करिता मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो, असेहि त्यांनी आयोगापुढे प्रतिपादन केले.  याच बरोबर अपिलार्थी हे जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसही गैरहजर राहिले तव्दतच राज्य माहिती आयोगाच्या आजच्या झालेल्या सुनावणीस त्यांना सुनावणीची नोटीस पाठवून सुध्दा गैरहजर राहिले आहेत. हे ही त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

जनअपिलिय अधिकारी यांच्या युक्तीवादामध्ये आयोगास तथ्यांश दिसून येतो. तथापि याच बरोबर जनअपिलिय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे अनुपालन आजपावेतो जनमाहिती अधिकारी यांनी केले नसल्याचे आजच्या सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे कबूल केले आहे. तथापि अपिलार्थीस माहिती विहीत मुदतीत न पुरविण्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांचा असद्हेतू आयोगास आढळून आला नाही. कारण त्यांनी अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जास तात्काळ प्रतिसाद देवून एक अपरिहार्यता म्हणून त्यांच्या वरिष्ठांकडे म्हणजे जिल्हाधिकारी नांदेड कार्यालयाकडे या संदर्भात मार्गदर्शन मागितले आहे.

वरील विवेचन लक्षात घेवून असे आदेशीत करण्यात येते की, जनअपिलिय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशात नमूद केल्या प्रमाणे अपिलार्थीने मागीतलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील नोटीस-बोर्डावर लावावी व शासनाच्या संबंधीत आदेशाची प्रत व ७/१२चे उतारे अपिलार्थीना हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावे व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास पंधरा दिवसाच्या आत पाठवावा. याच बरोबर अपिलिय अधिकारी यांच्या उर्वरित आदेशाचे पालन न केल्या बद्दल जनमाहिती अधिकारी यांना आयोगा तर्फे ताकीद देण्यात येत आहे.

प्रसंगावशात येथे असे नमूद करण्यात येते की, सार्वजनिक हिताच्या ज्या योजना शासनाने अंमलात आणण्याचे योजिले आहे किंवा ज्या योजनांची महसूल विभागातर्फे अंमलबजावणी चालू आहे अशा सर्व योजना संदर्भातील विस्तृत माहिती महसूल विभागाने त्यांच्या बेबसाईटवर प्रसिध्द करावी. म्हणजे अशा प्रकारचे प्रसंग सहज टाळता येणे शक्य होईल. सचिव, महसूल मंत्रालय, मुंबई यांनी यांची नोंद घेवून या संदर्भातील अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्या पासून ४५ दिवसाच्या आत पाठवावा. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, ७/१२ चे उतारे व शासन आदेशाच्या प्रती हे आदेश निर्गमित झाल्यापासून अपिलार्थीस सात दिवसाच्या आत

विनामूल्य पुरविण्यात यावी व उर्वरित माहिती त्यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावावी.

३. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये त्यांचेकडे दाखल होणा-या माहिती मागणीच्या अर्जावर यापुढे विहित मुदतीत माहिती देण्याबाबत यापुढे दक्ष राहावे, अशी त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

४. सार्वजनिक हिताच्या ज्या योजनाची शासनाने अंमलबजावणी करण्याचे योजिले आहे किंवा ज्या योजनांची अंमलबजावणी शासनामार्फत चालू आहे अशा महसूल विभागातील सर्व योजनासंदर्भातील माहिती, स्वयंप्रेरित माहिती म्हणून महसूल विभागाने त्यांच्या बेबसाईटवर प्रसिध्द करावी. या बाबतचा अनुपालन अहवाल सचिव, (महसूल) मंत्रालय, मुंबई यांनी हे आदेश निर्गमीत झाल्याच्या तारखेपासून ४५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक-१८ मे ,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.श्यामते शंकर पोश्ट्टी, रा.कोटग्याळ, पो.माचपुर, ता.बिलाली, जि. नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, बिलाली,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. सचिव, महसूल विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९५/२००७

निर्णय दिनांक १८-०५-२००७

परवीज अहमद सिध्दीकी पि. अब्दुल रऊफ, : अपीलार्थी
सबना मीरा सॉ मिल नाळवंडी रोड, बीड
तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक :
ग्रामपंचायत नाळवंडी तालुका जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास : प्रतिवादी
अधिकारी पंचायत समिती बीड

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. परवीज अहेमद सिध्दीकी पिता अब्दुल रऊफ (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत नाळवंडी तालुका बीड श्री. शिवाजी तुकाराम काटे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती बीड यांचे प्रतिनिधी श्री. केकान सी. एस. विस्तार अधिकारी (यापुढे त्यांना

जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. गट विकास अधिकारी पंचायत समिती बीड यांच्या गैर हजेरीची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती बीड यांच्या सुनावणीच्या वेळी गैरहजर राहण्याच्या प्रकरणाचा खुलासा त्यांच्या अभिप्रायासह आयोगास १५ दिवसाचे आत पाठवावा.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक ०६-०५-२००६ रोजी जन माहिती अधिकारी नाळवंडी तालुका जिल्हा बीड या गावातील घर नंबर ३०६ (जुना) व नवा ३२४ व ३२५ बद्दलची माहिती व ग्रामपंचायत ठराव क्रमांक १३ याबाबतची माहिती मागितली होती.

अपीलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये एकूण ७ मुद्दे उपस्थित केले आहे. ७ पैकी एकूण ६ मुदयामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी खुलासा व स्पष्टीकरण मागितले आहे व एका मुदयावर त्यांनी या मालमत्तेच्या मालकी नावामध्ये बदल ज्या कागदपत्रा आधारे अथवा पुराव्या आधारे केला आहे त्या पुराव्यांच्या प्रती मागितल्या आहे.

अपीलार्थी यांच्या वरील माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०५-२००६ रोजी माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जन अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०५-०६-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसते. जन अपीलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिनांक १९-०६-२००६ रोजी सुनावणी घेऊन, अर्जदाराचा अर्ज हा "प्रशासकीय तक्रार स्वरुपाचा असल्याने माहितीच्या

अधिकारातील अर्ज निकाली काढण्यात येतो" असे आदेश देऊन अपीलार्थीचे अपील निकाली काढले.

तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दिनांक २६-०६-२००६ रोजी केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांना प्रतीदिन रुपये २५० इतकी शास्ती लावण्यात यावी व जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची मागणी केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता खालील बाबी दृष्टोत्पत्तीस येतात.

बीड तालुक्यातील नाळवंडी या गावामध्ये घर क्रमांक ३२४ व ३२५ हे क्रमांक धारण करणारी मालमत्ता सध्या आस्तित्वात आहे. सदर मालमत्ता म्हणजे मशीद आहे. ग्रामपंचायत च्या पीटीआर (प्रॉपर्टी टॅक्स रजिस्टर) मध्ये ८८-८९ चे रेकॉर्ड पाहिले असता मालमत्ता क्रमांक ३६२/३६३ वर या मालमत्तेची नोंद असून या मालमत्तेचे वर्णन सौदीवाली - मस्जीद असे वर्णन केले आहे. तथापि या रजिस्टरचा अपीलार्थी यांनी सादर केलेला सन २००१ ते २००२ या कालावधीतील प्रॉपर्टी टॅक्स उतारा पाहिला असता सदर मालमत्तेचा क्रमांक ३२७ व ३२८ असे असून यावर अपीलार्थीचे असलेले नाव वगळून मुस्लीम समाज असे नाव लावले आहे. अपीलार्थीस ग्रामपंचायतच्या पीटीआरमध्ये या मिळकतीच्या मालकी हक्कामध्ये झालेला बदल कोणत्या अधिकारान्वये व कोणत्या कागद पत्राच्या आधारे संबंधित ग्रामसेवकाने केला आहे त्या कागदपत्राच्या प्रती अपीलार्थीस हव्या आहेत. यावर जन माहिती अधिकारी यांचे

असे म्हणणे आहे की हे बदल तत्कालीन ग्राम सेवक यांनी ग्रामपंचायतच्या ठरावाप्रमाणे केले असून या ठरावाची प्रत त्यांनी अपीलार्थीस दिनांक २९-०३-२००६ रोजी पाठविली आहे तथापि या ठरावाच्या प्रतीने अपीलार्थी यांचे समाधान झाले नसून त्यांनी माहितीचा अधिकार कायद्याचा आधार घेऊन त्याच प्रतीची परत मागणी केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी पुढे सांगितले की मंदिर/मशीद इ. इनामाच्या जागाबाबत वैयक्तीक नोंदी करता येत नाही. या प्रकरणी सन १९९१ मध्ये अपीलार्थी यांचे नाव तत्कालीन ग्रामसेवकांनी लावले असल्याचे आढळल्यानंतर गावक-यांनी घेतलेले आक्षेप संबंधित कार्यालयांनी केलेल्या पहाणीचे पंचनामे व गावातील तणावाचे वातावरण लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने ठराव घेऊन पीटीआर मध्ये पुर्वी चुकीने केलेला बदल सन २००१ मध्ये दुरुस्त केला आहे व तो ग्रामपंचायत ठरावाच्या आधारे केला आहे. चुकीची नोंद रद्द करतांना नविन मुस्लीम समाजाच्या नावाची नोंद का केली आहे याबाबत कोणतेही स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी कागदपत्राचे आधारे देवू शकले नाहीत. कोणती कारवाई का केली किंवा केली नाही याची कारणे देणे, केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांचेवर बंधनकारक नाही तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या मुद्दयांची माहिती दिली असल्याचे आढळले.

दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकता व आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांनी जाणुन बुजून आपल्या कर्तव्यात कसूर केल्याचे आयोगास आढळून आलेले नाही, त्यामुळे अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची केलेली विनंती फेटाळून लावण्यात येत आहे. जर अपीलार्थीस मालकी हक्काबाबत काही शंका असल्यास अथवा या संदर्भात त्यांची काही तक्रार असल्यास त्यांनी त्याचे निवारण

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्याकडून करुन घ्यावे. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी अशा प्रकारचा विनंती अर्ज अपीलार्थी यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर त्यावर ३० दिवसाच्या आत आपला निर्णय द्यावा असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. परवीज अहमद सिध्दीकी पि. अब्दुल रऊन, सबना मीरा सॉ मिल नाळवंडी रोड, बीड तालुका जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत नाळवंडी तालुका जिल्हा बीड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती बीड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९६/२००७

निर्णय दिनांक १८-०५-२००७

| | | |
|---|---|---|
| ॲड अजित एम. देशमुख, व्दारा गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड बीड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय विप्र नगर बीड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती बीड | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. अजित मुरलीधरराव देशमुख हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय विप्र नगर बीड श्री. कोकणे एम. जी. (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती बीड श्री.

पाखरे एस. बी. (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक १८-०४-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“ १) आपल्या शाळेतील कर्मचारी (क्लॉर्क) व सह शिक्षक असलेले श्री. झवर आर. के. व सौ. तोतला एस. एस. हे दोघे पतीपत्नी आहे याबाबतची माहिती आपल्या शालेय अहवालाप्रमाणे द्यावी.

२) एकाच छताखाली / घरात राहणा-या पती पत्नींना वेगवेगळे घरभाडे देण्याची तरतूद कोणत्या नियमात आहे त्या नियमाची / शासन आदेशाची प्रत द्यावी.

३) हे दोघे वेगवेगळा घरभाडे भत्ता केव्हापासून व किती उचलतात याची माहिती आपल्या रेकॉर्डप्रमाणे द्यावी.“

अपीलार्थीने ही माहिती टपालाने अपेक्षिली असून माहितीचा संबंधित कालावधी त्यांनी चालू / असा उल्लेख केला आहे.

अपीलार्थीच्या या माहितीच्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक २६-०४-२००६ रोजी त्यांचेकडील पत्र क्रमांक रा.वि./बीड/७५/०५-०६ या पत्र क्रमांकान्वये अपीलार्थीने विचारलेल्या ३ मुद्यापैकी २ (मुद्दा क्रमांक १ व ३ ) मुद्दयाची माहिती पुरविली आहे. तथापि एकाच घरात राहणा-या पती-पत्नीना वेगवेगळा घरभाडे भत्ता पती-पत्नी असणा-यांना देण्याबाबत शासन आदेशाची प्रत देऊ शकले नाहीत. अपीलार्थीस वरील माहिती अपुरी वाटल्यावरुन अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०५-२००६ रोजी सुनावणी घेऊन माहिती अधिका-याने वाजवी कारणाशिवाय जाणुनबुजून

चुकीची अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती दिली नाही असा निष्कर्ष काढला. जन अपीलीय अधिकारी यांनी काढलेल्या सुनावणी आदेशाचे अवलोकन करता सुनावणीच्या दिवसापर्यत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपीलार्थीस उर्वरीत माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्याप्रित्यर्थ "त्यावर अपीलार्थीचे समाधान झाले" असा उल्लेख या सुनावणी आदेशामध्ये जन अपीलीय अधिकारी यांनी केला आहे.

तथापि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशावर समाधान न झाल्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम १९ (३) अन्वये दिनांक २६-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक २४-०४-२००६ पासून ते ३१-०५-२००६ पर्यत (अपिलार्थीस उर्वरीत माहिती मिळाल्याचा दिनांक) प्रतिदिन रुपये २५० इतकी शास्ती लावण्यात यावी व जन माहिती अधिका-याने जाणुनबुजून कर्तव्यात कसूर केल्या मुळे कलम २० (२) प्रमाणे त्यांच्यावर शिस्त भंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात यावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे दिसून आले आहे की, अपीलार्थी यांच्या दिनांक १८-०४-२००६ च्या अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०४-२००६ रोजी म्हणजे आठ दिवसांनी दखल घेऊन त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. ती दखल पुरेशा वेळात घेतली आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्याच बरोबर अपीलार्थीस आवश्यक असलेली उर्वरीत माहिती दिनांक ३१-०५-२००६ रोजी अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात आली व या माहितीमुळे अपीलार्थीचे समाधान झाल्याचे अपीलार्थीने लेखी कळवून दिले आहे तथापि यानंतर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करतांना अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्यापोटी शास्ती लावावी अशी आग्रही मागणी आयोगा कडे केली आहे. सदर माहिती

दिनांक २६-०४-२००६ रोजी न देण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली असता त्यांनी अपीलार्थीने त्यांचेकडे मागणी केलेल्या शासकीय आदेशाची प्रत (महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : घभाभ-१००१/ प्र.क्र.२८/सेवा-५, मंत्रालय मुंबई दिनांक ०९ सप्टेंबर २००४ नुसार खाजगी निवासस्थानात राहणा-या शासकीय व इतर कर्मचा-यांच्या कुटूंबातील ज्या कर्मचा-यांचे मूळ वेतन जास्त असेल फक्त अशाच कर्मचा-यास घरभाडे भत्ता अनुज्ञेय करण्याबाबत. अंतरिम स्थगितीच्या परिणामी घरभाडे भत्त्याचे प्रदान) त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती व ती उपलब्ध झाल्यानंतर त्यांनी उर्वरीत माहिती म्हणजेच या आदेशाची प्रत दिनांक ३१-०५-२००६ रोजी अपिलार्थीस दिली असल्या चे त्यांनी आज आयोगापुढे सांगितले. अपीलार्थीस दिनांक ३१-०५-२००६ रोजी संपूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी यांचा या प्रकरणात माहिती जाणुन बुजून दडविण्याचा असा कोणताही असद्हेतु आढळून येत नाही अशाच प्रकारचा निष्कर्ष जन अपीलीय अधिकारी यांनीही त्यांच्या प्रथम अपील ठरवितांना काढला आहे. अपिलार्थीने मागितलेल्या शासनाच्या आदेशाची प्रत मिळविण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, शासकीय कोषागार कार्यालय इ. शासकीय कार्यालयात जाऊन सर्व प्रयत्न केले. या सर्व शासकीय कार्यालयाकडे जाण्यामुळे त्यांना हा १२ दिवसांचा विलंब झाला आहे. अपीलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप, विशेषतः ही माहिती अपिलार्थीशी प्रत्यक्ष संबंधित नसून ती त्रयस्त पक्षाशी संबंधित आहे ही बाब लक्षात घेता तसेच प्रश्नाधिन माहिती देण्या करिता जन माहिती अधिकारी यांनी केलेले प्रयत्न व अपीलार्थीच्या अर्जास दिलेला त्वरीत प्रतिसाद पाहता अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेली विनंती अमान्य करुन जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावू नये या निर्णयाप्रत राज्य माहिती आयोग आला आहे. तद्वतच अपीलार्थीस संपूर्ण माहिती मिळाली असतांना देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांना

केवळ त्रास द्यावा या उद्देशाने हे व्दितीय अपील केल्याचे अनुमान काढून हे अपील फेटाळण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ ॲड अजित एम. देशमुख, व्दारा गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय विप्र नगर बीड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती बीड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६२/२००७

निर्णय दिनांक १९-०५-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रदिप मधुकरराव सराफ, परिमल शाळे जवळ, विवेकानंदपूरम, लातूर तालुका जिल्हा लातूर | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, एम. आय. डी. सी. कॉर्नर, लातूर तालुका जिल्हा लातूर | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा सचिव सेवा भरती, व्दारा सरकार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, तालुका जिल्हा लातूर | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. प्रदिप मधुकरराव सराफ हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक संस्कार वर्धिनी माध्यामिक विद्यालय लातूर श्री.

मुंढे बालाजी मारोतराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.  जन अपिलीय अधिकारी तथा सचिव सेवा भरती, व्दारा सरकार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, तालुका जिल्हा लातूर यांचे प्रतिनिधीत्व देखील जन माहिती अधिकारी हेच करत आहेत.  जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांचा लेखी खुलासा आयोगास सादर केला आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथमतः जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २६-०४-२००६ रोजी संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय लातूरच्या आस्थापना विषयक बाबी संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय लातूरच्या लिपिकाच्या प्रथम वैयक्तीक मान्यतेपासून आजतागायत वैयक्तीक मान्यतेच्या सत्यप्रती (Attested Copy) मिळणे बाबत."

सदर माहिती अपीलार्थीने २००४ ते २००६ या काळातील मागितली असून ही माहिती त्यांनी व्यक्तीशः पुरविण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या वरील विनंतीस अनुसरुन अपीलार्थीस त्यांचे कडील पत्र क्रमांक सं.व.मा.वि./४५५/०५-०६, दिनांक २३-०५-२००६ रोजी अपीलार्थीने मागणी केलेली सदरील माहिती त्यांनी स्वतः येऊन हस्तगत करावी असे अपीलार्थीस सुचित केले.

तथापि अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे व्यक्तीशः माहिती न घेऊन जाता दिनांक ०६-०६-२००६ रोजी माध्यमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद लातूर

यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली माहितीची मूळ मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते. याच विषयावर अपीलार्थीने तदनंतर त्यांची पत्रे दिनांक १३-०६-२००६, २७-०६-२००६, १२-०७-२००६ अन्वये शिक्षणाधिकारी यांचेकडे संबंधित शिक्षण संस्थेचे जन माहिती अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहे अशा अर्थाचे अर्ज केल्याचे दिसून येते. शिक्षणाधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०६-२००६ रोजी प्रथम अपील केल्यानंतर शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद लातूर यांनी दिनांक १९-०१-२००७ रोजी अपीलार्थीस, संस्थेचे सचिव हे अपीलीय अधिकारी असल्यामुळे त्यांच्या कडे प्रथम अपील करण्यास सुचित केले. तदनंतर अपीलार्थीने संस्थेच्या सचिवाकडे प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०२-२००७ रोजी सरळ व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये अपीलार्थीने त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपीलार्थीने दिनांक ०६-०६-२००६ रोजी अपील करुनही त्याची दखल शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद लातूर यांनी दिनांक १९-०१-२००७ रोजी म्हणजे सहा महिन्याहून जास्त विलंबाने घ्यावी हे येथे प्रकर्षाने, नमूद करावे वाटते. माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदी नुसार अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतर त्या अपीलाचा अंतीम निर्णय जास्तीत जास्त ४५ दिवसात द्यावयाचा असतो तथापि या प्रकरणी शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी जन अपीलीय अधिकारी कोण याचा साधा प्रथम खुलासा देखील अपीलार्थीस इतक्या विलंबाने केला आहे की तो विलंब पाहता शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्याप्रती माहिती अधिकार अधिनियम २००५ करिता असलेला अनादर स्पष्ट करतो. यांच्या या वर्तनाची दखल मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

आज झालेल्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन तद्वतच संबंधित सस्थेचे जन अपीलीय अधिकारी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या शपथपत्रावरुन असे दिसून येते की, अपीलार्थीस हवी असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असून त्यांनी त्याप्रमाणे अर्जदारास त्याच्या मूळ अर्जातील विनंतीनुसार व्यक्तीशः घेऊन जाण्यासाठी सांगितले आहे. त्याच बरोबर ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद लातूर यांच्याकडे सुपुर्द केल्याचे अपीलार्थीस दिनांक ०६-०७-२००६ रोजी कळविले आहे. अपीलार्थीने मागणी केलेली माहिती तयार असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आज परत स्पष्ट केले व जी माहिती तयार आहे ती माहिती आयोगास दाखविली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेली माहिती पाहता ही माहिती अपीलार्थीस अपेक्षित असल्याचे दिसून येते. अपीलार्थीने संस्थेचे सचिव, जे या प्रकरणात जन अपीलीय अधिकारी आहेत त्यांच्या कडे अपील न करणे व आयोगा कडे सरळ अपील करणे व अपील सुनावणीस गैरहजर राहणे व त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतरही ती स्वीकृत न करणे या त्यांच्या वर्तनावरुन जन अपीलीय अधिकारी यांच्या सदर अपीलार्थी संस्थेस व मुख्याध्यापकास त्रास देण्याच्या उद्देशाने अशा प्रकारची मागणी करतात या म्हणण्यात तथ्यांश असल्याचे सिध्द होत आहे. सबब अपीलार्थीने आयोगा कडे केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रदिप मधुकरराव सराफ, परिमल शाळे जवळ, विवेकानंदपूरम, लातूर तालुका जिल्हा लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, एम. आय. डी. सी. कॉर्नर, लातूर तालुका जिल्हा लातूर यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव सेवा भरती, व्दारा सरकार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, तालुका जिल्हा लातूर यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२२/२००७

निर्णय दिनांक २१-०५-२००७

श्री. रामराव दिगंबरराव कामटीकर, भाग्यनगर : अपीलार्थी
को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी मर्यादित, रा.
भाग्यनगर, नांदेड तालुका जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा सचिव भाग्यनगर :
गृहनिर्माण सहकारी संस्था नांदेड तालुका
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक : प्रतिवादी
सहकारी संस्था नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थीच्या वतीने ॲडव्होकेट बी. जी. देशमुख (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर मूळ अर्जदार श्री. गंगाधर पांडुरंग देशपांडे यांच्या वतीने ॲडव्होकेट प्रशांत देशमुख (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी मूळ अर्जदार श्री. गंगाधर पांडुरंग देशपांडे नांदेड यांनी सचिव भाग्यनगर गृहनिर्माण संस्था मर्यादित यांच्याकडे दिनांक २३-०७-२००६ रोजी काही माहिती मागविली होती. अर्जदार हे या गृहनिर्माण संस्थेचे सभासद आहेत. सदर सहकारी गृहनिर्माण संस्थेने श्री. गंगाधर पांडुरंग देशपांडे यांनी मागणी केलेली माहिती दिनांक २८-०९-२००६ रोजी पुरविली आहे. ही माहिती मूळ अर्जदार यांना देण्यास एकूण ३५ दिवसाचा विलंब झाल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप निबंधक सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी सचिव भाग्यनगर सहकारी गृहनिर्माण संस्था यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) नुसार त्यांचे ०४-१०-२००६ चे आदेशाप्रमाणे प्रतिदिन रुपये २५० प्रमाणे ८७५० इतकी शास्ती लावली आहे.

ही शास्ती लावण्याचे अधिकार तालुका उप निबंधक सहकारी संस्था यांना नाहीत. यावरुन संस्थेचे सचिवांनी राज्य माहिती आयोग आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार अपील करुन जन अपीलीय अधिका-यांचे आदेश रद्द करण्याची विनंती आयोगाकडे केली आहे.

माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ मधील तरतुदीनुसार मूळ अर्जदार हेच अपील करु शकत असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील अपील हे कायदेशीर ठरत नाही. तथापी या प्रकरणातील जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांना कायद्याच्या कलम २० अन्वये शास्ती लावण्याचे अधिकार नसतांना लावलेली शास्ती लक्षात घेता, कलम १९ (३) खाली दाखल केलेले अपील हे कलम १८ खालील तक्रार म्हणून दाखल करुन घेण्यात येत आहे व त्या संदर्भात आयोगाने मूळ माहिती मिळण्या संदर्भातील अर्जाच्या गुणवत्तेबाबत विचार करण्याची आवश्यकता दिसत नाही.

मूळ अर्जदारास आवश्यक माहिती देण्यात आली आहे.  आता त्यांची माहिती बाबत कोणतीही तक्रार नाही. या परिस्थितीत जन अपीलीय अधिकारी यांनी कलम २० मधील तरतुदी नुसार अधिकार नसतांना, जन माहिती अधिकारी यांना लावलेल्या शास्तीचा आदेश अवैध ठरत असल्याने जन अपीलीय अधिकारी यांचे दिनांक ०४-१०-२००६ चे शास्तीसंबंधी चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

## निर्णय

१. जन अपीलीय अधिकारी यांनी जारी केलेले दिनांक ०४-१०-२००६ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामराव दिगंबरराव कामटीकर, भाग्यनगर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी मर्यादित, रा. भाग्यनगर, नांदेड तालुका जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव भाग्यनगर गृहनिर्माण सहकारी संस्था नांदेड तालुका जिल्हा नांदेड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था नांदेड यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५५/२००७

निर्णय दिनांक २१-०५-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. रामनारायण मयारामजी बंग, पहिला माळा, दै. प्रजावाणी कार्यालय, औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, सा. प्र. नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड तालुका जिल्हा नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड तालका जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. रामनारायण मयारामजी बंग (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) यांच्या वतीने ॲडव्होकेट एम. डी. नरवाडकर हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्रमांक

१ नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड श्री. बाशेट्टी माधव शंकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता नांदेड वाघाळा महा नगरपालिका नांदेड श्री. वाघमारे मोहन धोंडीबा (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १३-११-२००६ रोजीच्या अर्जानुसार नांदेड महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १९ मध्ये सन २००२-०६ या कालावधीतील सर्व कामासंदर्भातील विविध मुद्यावर माहिती मागविली होती. तथापि ही माहिती जन माहिती अधिका-यांकडून प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी जन अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २६-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले, तथापि या अपिलावरही वेळेत सुनावणी न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले होते.

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सुरुवातीस, अपीलार्थी यांच्या वतीने त्यांचे ॲडव्होकेट एम. डी. नरवाडकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०२-२००७ चे व्दितीय अपील मागे घेण्यासाठी आयोगासमोर निवेदन सादर केले आहे. या निवेदनामध्ये अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना पुर्णतः मिळाली असल्याने व जी माहिती मिळाली नाही तिची आता आवश्यकता नसल्याने हे व्दितीय अपिल विनाअट परत घेण्यासाठी त्यांनी आयोगाकडे परवानगी मागितली आहे.

अपीलार्थीस आता माहितीची आवश्यकता नसल्याने व अपीलार्थीने आयोगास दुसरे अपील विनाअट मागे घेण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे व त्यास जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांची हरकत नसल्याने अपीलार्थीस त्यांनी दिनांक ०७-०२-२००७ रोजी आयोगाकडे केलेले व्दितीय अपील विनाअट मागे घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामनारायण मयारामजी बंग, पहिला माळा, दै. प्रजावाणी कार्यालय, औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, सा. प्र. नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड तालुका जिल्हा नांदेड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड तालका जिल्हा नांदेड यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२६/२००७

निर्णय दिनांक २२-०५-२००७

श्री. सय्यद इसाक सय्यद गुलाम, : अपीलार्थी
संपादक आपला नवा माणुस, देशमुख मंजिल,
करीमनगर, कन्नड तालुका कन्नड जिल्हा
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार कन्नड
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी सिल्लोड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. सय्यद इसाक सय्यद गुलाम (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार प्रभोदय मुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी

तथा उपविभागीय अधिकारी सिल्लोड श्री. भारत खंडू कदम (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी प्रथमतः अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०९-२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> " जानेवारी १९९४ ते डिसेंबर १९९४ पर्यत १२ महिने पर्यत कन्नडच्या अर्धघाऊक रॉकेल विक्रेता दर महिन्यात किती माल उचला व किती लोकांना माल प्रत्येक महिन्याची यादी देऊन माहिती द्यावी. "

याच बरोबर या अर्जामध्ये पुढे अपीलार्थीने खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " सदरी माहिती १९९४ कन्नड शहरात अर्धघाऊक परवानाधारक किती होते व प्रत्येक महिन्यात किती माल उचला व किती विक्री केला याची सविस्तर माहिती द्यावी. सदरील अर्ध घाऊक विक्रेत्याची परवाना छायांकित प्रत व माहिती द्यावी. "

सदरील माहिती अपीलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अर्जदाराच्या वरील मागणीवरुन अर्जदारास आपल्या माहितीची मागणी स्पष्टपणे मांडता आली नाही असे दिसते तथापि एकूण माहितीचे स्वरुप पाहिले असता जानेवारी ९४ ते डिसेंबर ९४ या १२ महिन्यात कन्नड शहरात एकूण किती रॉकेल आले, अर्धघाऊक परवानाधारक किती होते त्यांनी किती माल उचलला व किती मालाची विक्री केली व याच बरोबर सर्व अर्धघाऊक विक्रेत्याच्या परवान्याच्या छायांकित प्रतीची मागणी अपीलार्थीने केली होती असे अनुमान काढता येते. अपीलार्थीने या म्हणण्यास आज सुनावणीमध्ये दुजोरा दिला आहे.

यावर अपीलार्थीच्या माहिती मागविण्याच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक ०७-०९-२००६ रोजी उत्तर देऊन अपीलार्थी यांनी, त्यांनी मागितलेली माहिती सर्व अर्धघाऊक विक्रेत्याकडून मागविण्यात आली असून माहिती प्राप्त होताच अपीलार्थीस पुरविण्यात येईल अशा अर्थाचे पत्र दिले आहे. सदर पत्र अपीलार्थीस दिनांक १९-१०-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे अपीलार्थी आज सुनावणीमध्ये सांगत आहेत. या पत्राचे अवलोकन करता हे पत्र अत्यंत मोघम स्वरुपाचे व त्यामध्ये अर्जदारास माहिती देण्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसादाचा अभाव असल्याचे दिसून येते.

विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थीने दिनांक १३-१०-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसते. सदर अपील जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१०-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रातील नोंदीवरुन दिसून येते. सदर अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १०-११-२००६ रोजी अंतीम केले. त्यांनी ही सुनावणी प्रथमतः दिनांक ०६-११-२००६ रोजी ठेवली होती तथापि अपीलार्थी या सुनावणीस गैरहजर राहिले होते. तदनंतर जन अपीलीय अधिकारी यांनी सदर सुनावणी मध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याची कारवाई करावी व जर अर्धघाऊक रॉकेल विक्रेते माहिती देण्यास टाळाटाळ करत असतील तर त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र जीवनावश्यक वस्तू अधिनियमा अंतर्गत कारवाई करुन, संबंधितास माहिती उपलब्ध करुन देण्याचे सुचित केले होते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कन्नड शहरात अर्धघाऊक परवानाधारक किती होते, त्यांनी जानेवारी ९४ ते डिसेंबर ९४ मध्ये प्रत्येक महिन्यात किती माल उचलला व किती विक्री केला याची माहिती त्यांच्याकडे अथवा त्यांच्या वरिष्ठांकडे

उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीस उपलब्ध करुन देऊ शकतात असे सांगितले. याच बरोबर सदरील अर्धघाऊक परवानाधारकांच्या परवान्याची छायांकीत प्रत अपीलार्थीस देण्याचे त्यांनी कबूल केले आहे. तथापि जानेवारी ९४ ते डिसेंबर ९४ या १२ महिन्याच्या कालावधीत कन्नड शहरात अर्धघाऊक विक्रेत्यांनी दरमहा किती माल उचलला व किती लोकांना त्याची विक्री केली याची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी आज सुनावणीमध्ये सांगत आहेत. याप्रित्यर्थ त्यांनी त्यांचे कडील पुरवठा विभागातील या संदर्भातील सर्व नस्त्या अपीलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले आहे. याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस वेळोवेळी देण्याची तयारी दर्शविली असतांना देखील अपिलार्थी नी सदर माहिती घेण्यास नकार दिल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

अर्धघाऊक विक्रेत्यांनी एकूण किती मालाची उचल केली व दरमहा कोणाकोणाला किती विक्री केली यासंबंधीचा तपशील तहसील कार्यालयास उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्यावरुन सदर अभिलेखे कोणत्या प्रवर्गात मोडतात याची विचारणा केली असता जन माहिती अधिकारी / जन अपीलीय अधिकारी यापैकी कोणीही काही माहिती सांगू शकले नाहीत. वास्तविक ही माहिती तहसील कार्यालयात उपलब्ध असणे अभिप्रेत आहे तथापि ही माहिती तहसील कार्यालयात उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे चुकीचे आहे सबब अपीलार्थी यांनी मागणी केलेली वरील माहिती जन माहिती अधिकारी हे का देऊ शकत नाही व या संदर्भातील अभिलेखे त्यांच्याकडे का उपलब्ध नाहीत याची चौकशी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी करुन या प्रकरणामध्ये जे दोषी अधिकारी असतील त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करुन आयोगास दोन महिन्याच्या आत आपला अहवाल सादर करावा असे आदेशित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांना उपविभागीय अधिकारी सिल्लोड यांनी या संर्दभातील माहिती देण्यासाठी जे विक्रेते टाळाटाळ

करत असतील त्यांच्यावर जीवनावश्यक वस्तू अधिनियमातील  मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी त्यांचे दिनांक १०-११-२००६ चे सुनावणी आदेशामध्ये सुचित केले होते.  त्या प्रमाणे त्यांनी प्रस्तावित केलेल्या कार्यवाहीचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरण म्हणून जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०१-२००७ व ०६-०४-२००७ रोजी सादर केला आहे.  या प्रस्तावाची त्वरीत दखल घेऊन जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी या प्रकरणी हे आदेश निर्गमित झाल्या पासून ३० दिवसाच्या आत आयोगास अहवाल सादर करावा.  याच बरोबर अपीलार्थीस आजमितीला जी माहिती (त्यांचेकडील व त्यांचे वरिष्ठ कार्यालयातील) जन माहिती अधिकारी देऊ शकत आहेत ती माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी असे आदेशित करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील व त्यांच्या वरिष्ठांकडील, उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसाचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस जी माहिती उपलब्ध करुन देऊ शकत नाही त्याची कारणे, सदर माहिती / अभिलेखे तहसीलदार कार्यालयात कोणत्या परिस्थितीत उपलब्ध नाहीत इ. बाबतची जबाबदारी जिल्हाधिकारी यांनी संबंधितावर निश्चित करुन त्यांचेवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन ३० दिवसाचे आत आयोगास अनुपालन अहवाल सादर करावा.

४. जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद यांनी तहसीलदार कन्नड यांचे कडून त्यांचे कार्यालयात संबंधित पुरवठादाराविरुध्द कार्यवाही करण्याच्या दिनांक ०८-०१-२००७

व ०६-०४-२००७ च्या प्रस्तावावर ३० दिवसाचे आत कार्यवाही करुन अनुपालन अहवाल आयोगास तात्काळ सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सय्यद इसाक सय्यद गुलाम, रा. कन्नड तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कन्नड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सिल्लोड यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६६/२००७

निर्णय दिनांक २३-०५-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. मनोहर माधवराव थोरात,<br>घर नं. २-२-१२४, देगावचाळ, पोस्ट<br>वजिराबाद, नांदेड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील<br>कार्यालय उमरी तालुका उमरी जिल्हा नांदेड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार उमरी तालुका उमरी जिल्हा<br>नांदेड | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. मनोहर माधवराव थोरात हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय उमरी तालुका उमरी जिल्हा नांदेड श्री. एस. डी. गीरी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार उमरी तालुका उमरी जिल्हा नांदेड श्री. भाऊराव संभाजी मुपडे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०९-२००६ रोजी खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " उमरी तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते मोहन दिगंबर उत्तरवार परवाना क्रमांक ३६/९८ यांना शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेलची महिनेवारी तपशील तसेच त्यांनी रॉकेल वितरण केलेल्या वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती तसेच त्यांना संलग्न असलेले रॉकेल किरकोळ परवाने हॉकर्स यांना वितरण केलेल्या रॉकेलच्या वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती तसेच किरकोळ हॉकर्सना दिल्या गेलेल्या बिलांची सत्यप्रती मिळणेबाबत. "

सदर माहिती अपीलार्थीने एप्रिल २००४ ते ऑगस्ट २००६ पर्यतची अपेक्षिली असून त्यांनी त्याच्या या अर्जात ही माहिती साधारण टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा काही भाग जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे तर काही भाग, त्रयस्त पक्ष श्री. उत्तरवार यांचेकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे.

अपीलार्थी यांच्या वरील अर्जातील माहिती गोळा करण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-१०-२००६ रोजी संबंधीत अर्धघाऊक विक्रेते श्री. मोहन दिगंबर उत्तरवार यांचेकडे त्यांनी केलेल्या रॉकेलच्या वितरणाच्या स्टॉक रजिस्टरची सत्यप्रत जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात सादर करण्याविषयी सूचित केले व त्याच पत्राची प्रत अपीलार्थी यांना सादर करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती मिळण्यासंदर्भात फीचा भरणा करण्यास सूचित केले. यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी

अपीलार्थीस त्यांच्या कार्यालया कडून देय असलेली माहिती किती पृष्ठे आहे व अपीलार्थीने निश्चित किती रक्कमेचा भरणा शासकीय कोषागारात करावा या संदर्भात काही उल्लेख केलेला नाही याची येथे प्रकर्षाने नोंद घेणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थी ने दिनांक ०९-११-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करुन आपली मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

संबंधित अपीलावर जन अपीलीय अधिका-याने कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्या चे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन अपीलीय अधिकारी यांची प्रथम अपीलावर सुनावणी न घेण्याची ही कृती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींना निश्चितपणे छेद देणारी व या अधिनियमाप्रती त्यांच्या मनात असलेला अनादर व बेपर्वाई स्पष्ट करते व याची दखल जिल्हाधिकारी नांदेड यांनी यथायोग्य रित्या घ्यावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करुनही हाती कोणतीही माहिती न लागल्याने व्यथित होऊन अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपीलावर जरी दिनांक १५-०१-२००७ अशी तारीख दाखविली असली तरी प्रत्यक्षात हे अपील राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयास दिनांक १५-०२-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे दिसून आले की अपीलार्थीने आपल्या मूळ अर्जात जी मागणी केली आहे तिचे ढोबळमानाने दोन भागत पाडता येतील. यापैकी एक भाग म्हणजे श्री. उत्तरवार यांना शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेलचा महिनेवार तपशील व दुसरा भाग म्हणजे श्री. उत्तरवार यांच्याकडे त्यांनी त्यांचेकडे ठेवलेल्या स्टॉक रजिस्टरच्या प्रती हा होय. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी

यांनी अपीलार्थीच्या माहितीच्या अर्जाची दखल जरी वेळेत घेतली असली तरी त्यांनी अपीलार्थीस त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती देण्याची तयारी दर्शविल्याचे व त्याच बरोबर ही माहिती देण्यासाठी निश्चितपणे अंदाजे किती रक्कमेचा भरणा करावा ही माहिती दिल्याचे आढळून येत नाही. तव्दतच आयोगाकडे अपील दाखल होण्याच्या दिनांकापर्यत त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस देण्याच्या दृष्टीने काही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी श्री. उत्तरवार यांच्याकडून दिनांक ०६-१०-२००६ रोजी अपीलार्थीने मागविलेल्या माहितीच्या प्रती मागविल्याचे दिसून येत आहे. याच पत्राची प्रत त्यांनी अपीलार्थीस देऊन त्यांना आवश्यक ती फी भरण्याची सूचना केली आहे तथापि नेमकी किती रक्कम भरावी याचा उल्लेख या पत्रात नाही. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०६-१०-२००६ च्या पत्रास अनुसरुन श्री. उत्तरवार यांनी जन माहिती अधिका-यास दिनांक ०९-१०-२००६ रोजी सदर अभिलेखे ऑडिटसाठी दिले गेले असल्याने सदर अभिलेख्याच्या सत्यप्रती देता येत नाही असे कळविले आहे. या प्रतीमध्ये संबंधित कर सल्लागाराचे सदर माहिती त्यांच्या ताब्यात आहे अशा अर्थाचे दिनांक ०४-१०-२००६ चे एक प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिले आहे. यावरुन सदर स्टॉक रजिस्टर, ज्यामध्ये अपीलार्थीस हवी असलेली माहिती आहे ते ऑडिटकडे असल्याचे स्पष्ट होते. याच बरोबर संबंधित ऑडिटरकडे जाऊन जन माहिती अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रती ऑडिटरकडून प्राप्त करुन घेऊन त्या जन माहिती अधिका-यास देणे श्री. उत्तरवार यांना सहज शक्य होते तथापि उत्तरवार यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही, त्याच बरोबर उत्तरवार यांना तसे करण्यास जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे भाग पाडल्याचेही दिसून येत नाही.

अपीलार्थी यांनी माहिती आयोगाकडे अपील सादर केल्यानंतर दुस-या दिवशी म्हणजे दिनांक १६-०१-२००७ रोजी अपीलार्थीने केलेले शपथपत्र आज जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केल्याचे दिसून येत आहे. अपीलार्थीचे माहिती मिळाल्याचे शपथपत्र दिनांक १६-०१-२००७ असे दर्शवित आहे तथापि सदर शपथपत्र अपीलार्थी आयोगाकडे पोस्टाने पाठवू शकले असते अथवा प्रत्यक्षपणे दाखल करु शकले असते दिनांक १६-०१-२००७ चे शपथपत्र सादर करण्यास अपीलार्थीस दिनांक २३-०५-२००७ पर्यत का वाट पहावी लागली याची कारणे अपीलार्थी आज गैरहजर असल्यामुळे स्पष्ट झाली नाहीत.

या प्रकरणी एकूणच, अपीलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. वास्तविक त्यांनी श्री. उत्तरवार यांना त्यांच्या कार्यालयात बोलावून घेऊन त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती प्राप्त करुन घेणे त्यांना सहज शक्य होते तथापि त्यांनी याबाबत कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही. एवढेच नव्हे तर आज दिनांक २३-०५-२००७ रोजी सुनावणीच्या दिवशी अपीलार्थी यांच्या कडून दिनांक १६-०१-२००७ चे शपथपत्र त्यांनी दाखल करण्याची त्यांची कृती सर्वस्वी गैर आहे असे राज्य आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेली माहिती कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसाच्या आत देणे हे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ अन्वये अनिवार्य आहे तथापि त्यांनी या प्रकरणी माहिती देण्या संदर्भात दाखविलेली उदासिन वृत्ती त्यांच्या कार्यपध्दती मध्ये कर्तव्य परायणतेचा अभाव असल्याचे स्पष्ट केले करते. सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) अन्वये जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या उदासिनतेबाबत व कर्तव्य परायणतेच्या अभावा बाबत आयुक्त औरंगाबाद यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील प्रचलीत तरतुदीप्रमाणे कार्यवाही करुन आयोगास आपला अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करावा असे त्यांना सुचित करण्यात येत आहे. त्याच

बरोबर अपीलार्थीस आता आवश्यक असलेली सर्व माहिती विनामूल्य मिळाली असल्यामुळे व अपिलार्थीने या प्रकरणी आपली कोणतीही तक्रार राहीली नसल्याचे आयोगास, जन माहिती अधिकारी यांचे मार्फत कळविल्यावरुन खालील प्रमाणे निर्णय पारित करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावा संदर्भात त्यांच्यावर महसूल आयुक्त औरंगाबाद अथवा इतर सक्षम प्रशासकीय प्राधिकरणाने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास आपला अहवाल हे आदेश निर्गमित झाल्या पासून ६० दिवसाचे आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनोहर माधवराव थोरात, घर नं. २-२-१२४, देगावचाळ, पोस्ट वजिराबाद, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय उमरी तालुका उमरी जिल्हा नांदेड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार उमरी तालुका उमरी जिल्हा नांदेड यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी नांदेड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २१७/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २३ मे, २००७.

| | | |
|---|---|---|
| १. श्री.गजानन बी.पाटील<br>एल ७५/३, शिवाजी नगर,<br>हडको,एन-९, स्वामीसमर्थ,<br>औरंगाबाद. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १. जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद. | .. | प्रतिवादी |
| २. जनअपिलिय अधिकारी तथा पोलीस आयुक्त, औरंगाबाद. | .. | |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २३ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.गजानन बी.पाटील (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, श्री.एम.बी.तांबाडे ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलिय अधिकारी तथा पोलीस आयुक्त,औरंगाबाद ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री.के.जी.पाटील, पोलीस उपआयुक्त परिमंडळ,औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचे कडील दिनांक- ०४-१०-२००६ रोजीच्या अर्जा अन्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“ अ) केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (ख) अन्वये केंद्र शासन/ राज्य शासन निर्णयानुसार उपकलम १ ते १७ ची मुद्यानिहाय माहिती द्यावी.

(एक) आपल्या संस्थेची रचना कार्य आणि कर्तव्ये याचा तपशिल

(दोन) आपले संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यांचा अधिकार व कर्तव्याचा तपशिल. (नमूना अ ते ड, अधिकार आर्थिक/ प्रशासकीय व इतर कर्तव्ये.)

(तीन) आपले निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरणात येणारी कार्यपध्दती तसेच पर्यवेक्षण तथा उतरदायित्व प्रणाली.

(चार) आपली कार्ये पार पाडण्यासाठी ठरविण्यात आलेले माणके

(पाच) आपणाकडे असलेले किंवा आपल्या नियंत्रणात असलेले किंवा आपले कार्ये पार पाडण्यासाठी आपल्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सुचना नियम पुस्तिका आणि अभिलेख (नमूना अ ते इ प्रमाणे, काशि संबंधित नियम/ अधिनियम, शासन निर्णय, परिपत्रके, कार्यालयीन आदेश/ धोरणात्मक परिपत्रके, दस्तऐवजाची यादी व इतर)

(सहा) आपणाकडे असलेल्या किंवा आपल्या नियंत्रणात असलेल्या दस्त ऐवजाच्या प्रवर्गाचे वितरण.

(सात) आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचारविनियम करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केले जाण्यासाठी अस्थित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशिल.

(आठ) आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तिचा मिळून बनलेला मंडळाचे, परिषदाचे, समित्याचे आणि अन्य निकायाच्या बैठककी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे या बाबत निवेदन किंवा अशा बैठकीचे कार्यवृत्ते जनतेला पहावयाला मिळण्याजोगे आहेत किंवा कसे या बाबतचे विवरण (नमुना अ ते ड प्रमाणे सविस्तर तपशिल)

(नऊ) आपल्या अधिका-याची आणि कर्मचा-याची निर्देशिका.

(दहा) आपल्या प्रत्येक अधिका-याला व कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन तसेच प्राधिकरणाच्या विनियामध्ये तरतुद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याच्या पध्दती.

(अकरा)सर्व योजनेचा तपशिल,प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमुन दिलेल्या अर्थ संकल्प आणि संवितरीत केलेल्या रक्कमाचा अहवाल.

(बारा) अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रित तसेच वाटप केलेल्या रक्कमा आणि अशा कार्यक्रमाच्या लाभार्थीचा तपशिल.

(तेरा) ज्या व्यक्तिंना सवलती, परवाने किंवा प्राधिकार पत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तिचा तपशिल.

(चौदा) इलेक्टानिक स्वरुपात उपलब्ध असलेल्या किंवा त्यांच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशिल.

(पंधरा) माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधेचा तपशिल.

(सोळा) जनमाहिती अधिका-याचे नांवे, पदनामे आणि इतर तपशिल.

(सतरा) विहित करण्यातील अशी इतर माहिती, प्रसिध्द करील आणि प्रकाशने अधावयाचा तपशिल

(अे) माअका-२००५ लागु झाल्यापासुन आपल्या कार्यालयाकडे किती माहिती अधिकाराचे अर्ज आले आहेत त्याची संख्या देण्यात यावी व माहिती अधिकारी यांच्या नाराजीने मा.पोलीस आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपीले दाखल झाली (दिनांक- १/१/२००६ ते ५/१०/२००६) संबंधीत अपील दाखल करणा-या व्यक्तीचे नाव, अपील दाखल दिनांक, अपील निर्णय दिनांक, अपील सुनावणी दिनांक यांची मुद्यानिहाय माहीती द्यावी, ही नम्र विनंती.

बी) माझे (गजानन बी.पाटील) मा. पोलीस आयुक्त साहेब यांच्याकडे अपीले (२)( माअका- २००५) किती दिवसापासून प्रलंबीत आहे १ कोणत्या कारणासाठी प्रलंबीत आहे १ जर संबंधीत अपील प्रकरणी निर्णय लागला असल्यास संबंधीत निर्णयाची सांक्षाकीत प्रत द्यावी.

सी) माझे अपील क्रमांक-१,२ अपील आपल्या कार्याल्यास केंव्हा मिळाले यांची दिनांक, अपील प्रकरणी सुनावणीसाठी नोटीस बजावल्याचा दिनांक व पत्र जावक क्रमांक, सुनावणीची दिनांक, मा.माहिती

अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी माहिती न दिल्या बद्दल किंवा इतर प्रकरकणी या प्रकरणात दाखल केलेल्या म्हणण्याच्या सांक्षाकीत सत्यप्रती देण्यात याव्यात.

डी) पोलीस आयुक्त कार्यालय औरंगाबाद अंतर्गत असलेल्या पोलीस स्टेशनचे अधिकारी किंवा ठाणे अंमलदार हे आपल्या कार्यालयाने लागु केलेल्या तुरंत चोवीस (अर्ज चौकशी) यामुळे अनेक पोलीस स्टेशनचे जबाबदार अधिकार हे काही जिवे मारण्याची धमकी, मारहाण या काही प्रकरणात गांर्भीय असतांना सुध्दा आपलावरील जबाबदारी टाळण्यासाठी संबंधित प्रकरणी पुढे काही तपास न करता ( अदखल पात्र गुन्हा, कलम १५५ फौजदार दंड संहिता)(एनसी) ची नोंद करतात. अर्जदाराची सही घेऊन संबंधीतास कोर्टात जाण्याची समज दिली म्हणून स्वाक्षरी घेतात. बहुतांशी अर्जदार यास एन.सी प्रत देत नाही ९९ टक्के नागरीकांना त्याचा अर्थ सांगितला जात नाही. सर्वसामान्य नागरीकाच्या न्याय हक्काच्या दृष्टीने गंभीर बाब नाही का१

सर्वसामान्य नागरीकांना विचारणा केली तर तुम्ही कोर्टात जा म्हणून सांगातात. जन एन.सी.नंतर काही गंभीर घटना, दुःखापत झाली तर आम्ही नोंद घेऊ असे सांगातात. संबंधीत घटनेचा तपास करण्यास नकार देतात हि प्रशासकियदृष्टया गंभीर बाब नाही का१ या प्रकरणी लवकरात लवकर कारवाई करण्यासाठी कोणाकडे तक्रार द्यावी. संबंधीत अधिका-याचे पदनाम व पत्ता याची माहिती द्यावी, ही नम्रविनंती.

ई) आपल्या पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद च्या हद्दीत असलेल्या पोलीस स्टेशनच्या दिनांक- ०१-०१-२००६ ते ०२-१०-२००६ पर्यंत दाखल झालेल्या पोलीस स्टेशन निहाय दाखल केलेल्या (एन.सी) अदखलपात्र गुन्हयाची संख्या (फक्त) द्यावी. संबंधी एकुण (एन.सी.) अदखलपाल गुन्हयामध्ये एकुण संध्यामध्ये तपास केलेल्या एकूण एन.सी.ची पोलीस स्टेशननिहाय संख्या. तक्रारीनंतर किती दिवसात एन.सी प्रकरणी कारवाई झाली. त्याचा मुद्दा निहाय तपशील द्यावा, हि विनंती.

अपिलार्थीने अशा प्रकारे एकूण पाच मुद्यावर जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक- इ यामध्ये अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अभिप्राय उपस्थित केले आहेत. तो त्यांना देणे माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये जनमाहिती अधिकारी यांना बंधनकारक नाही.

अपिलार्थी यांच्याकडून सदर माहितीचा अर्ज प्राप्त झाल्या नंतर जनमाहिती अधिकारी यांनी या संदर्भात विहीत मुदतीत कोणतीच कार्यवाही केली नाही. त्यामूळे अपिलार्थी यांनी जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०४-१२-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले. या अपिलामध्ये अपिलार्थी यांनी पोलीस आयुक्त कार्यालयाचे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व माहिती तयार करण्यास हेतुपुरस्सर अडथळा निर्माण केला आहे, असे कारण दर्शवून जनमाहिती अधिकारी यांना प्रतिदिनी २५०/- रुपये याप्रमाणे शास्ती लावण्याची जनअपिलिय अधिकारी यांना विनंती केली आहे व

तसेच अपिलार्थीनी केलेली मूळ माहितीची मागणी अपिलार्थीने कायम ठेवली आहे. तथापि यावर जनअपिलिय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी विहीत मुदतीत घेतल्याचे त्यांचेकडील संचिकेतील कागदपत्रावरुन आढळून येत नाही. तथापि जनअपिलिय अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक- ६६७३, दिनांक- ०५-०५-२००७ अन्वये अपिलार्थीस दिनांक- ०९-०५-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणीसाठी हजर राहण्याचे सूचीत केले. तथापि त्यांनी कोणताही निर्णय पारीत केला नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. या सुनावणीमध्ये जनअपिलिय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना काही माहिती दिली. सदर माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जा प्रमाणे पूर्ण असल्याचे आयुक्तालयाचे म्हणणे आहे. ही माहिती अपूर्ण असल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. आता निश्चीत काही मुद्यावर अपिलार्थीस माहिती अपूर्ण आहे असे वाटत असल्यामूळे त्या मुद्यावर अपिलार्थी यांनी पोलीस आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांच्या कडून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

पुढील सुनावणीची तारीख १५-०६-२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २३ मे,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.गजानन बी.पाटील,घर नंबर- एल ७५/३, शिवाजीनगर, हडको, एन-९, स्वामीसमर्थ मंदीराजवळ, औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा, पोलीस आयुक्त औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१७/२००७

निर्णय दिनांक २३-०५-२००७

श्री. गजानन विठ्ठल पाटील, : अपीलार्थी

'सोनहिरा' मोंढा रोड, गंगापूर तालुका गंगापूर

जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र राज्य

विद्युत वितरण कंपनी (मं) गंगापूर जिल्हा

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता (ग्रामीण) महाराष्ट्र

राज्य विद्युत वितरण कंपनी (मं.)औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. गजानन विठ्ठल पाटील (यापुढे त्यांना

अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (मं) गंगापूर जिल्हा औरंगाबाद श्री. सुरेंद्र नारायण शेवतेकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ग्रामीण) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (मं.)औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम दिनांक २५-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> "१) २००५-२००६ सालामध्ये शेतीसाठी वीज घेण्या-यांची सिनॉरिटी नुसार यादी. २) वीज पुरवठा झालेल्या शेतक-यांची नांवे ३) नवीन मिटर जुने मिटर नादुरुस्त झाल्यानंतर मागणी करणा-या गंगापूर शहरातील ग्राहकांची यादी, डिपॉझिट जमा करणा-या ग्राहकांची यादी सिनॉरिटीनुसार ३) ज्यांना मिटर बदलून दिले आहे त्यांची यादी ४) उपलब्ध मिटरची संख्या आणि वाटप केलेल्यांची संख्या."

सदर माहिती अपीलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपीलार्थी यांनी वरील प्रमाणे केलेल्या दिनांक २५-०९-२००६ च्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कारवाई केली नाही. कारवाई न करण्याचे कारण विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीचा सदर अर्ज प्राप्त झाला नसल्याचे आज सुनावणी मध्ये सांगितले व त्याप्रमाणे शपथपत्रावर लिहून दिले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१२-२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. सदर अपीलाची सुनावणी दिनांक ०२-०१-

२००७ रोजी जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात घेतली तथापि जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय दिल्याचे दिसून येत नाही व हे अपील, एखाद्या बैठकीचे इतिवृत्त असल्यासारखे त्यांनी आयोगास सादर केलेल्या निवेदनावरुन दिसून येत आहे. जन अपीलीय अधिकारी यांचे वरील अपील अपीलार्थीने पाहिल्याचे दिसून येते तथापि या अपीलाची प्रत अपीलार्थी यांना मिळाली नसल्याचे ते आज सुनावणीमध्ये सांगत आहेत. प्रथम अपीलीय अधिका-याच्या सुनावणीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार व्दितीय अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीच्या माहितीच्या अर्जावर का कारवाई केली नाही हे विचारले असता अपीलार्थी यांचा मूळ माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी सांगितले. तथापि अपीलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी होती हे जन अपीलीय अधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणीच्या दिवशी म्हणजे दिनांक ०२-०१-२००७ रोजी जन माहिती अधिका-यास माहित होते. सुनावणी झाल्या नंतर अपीलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दोनदा जाऊन त्यांनी ही माहिती मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे ते आज सुनावणीमध्ये सांगत आहेत. या दोन भेटीपैकी जन माहिती अधिकारी त्यांना एकदा भेटले व एकदा भेटले नाहीत. तदनंतर अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक ०९-०३-२००७ च्या पत्रान्वये त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्यासाठी तारीख व वेळ मागितली त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांचेकडील पत्र दिनांक १५-०३-२००७ च्या पत्रान्वये, अपीलार्थीने मागणी केलेली मूळ माहिती दिनांक ०२-०४-२००७ रोजी घेऊन जाण्यासाठी अपीलार्थीस सुचित केले. तथापि हे पत्र अपीलार्थीस मिळाले नसल्याचे

अपीलार्थी आज सुनावणीमध्ये सांगत आहेत. त्याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज जन माहिती अधिकारी यांचेकडे तयार असून ती ताबडतोब अपिलार्थीस विनामूल्य देण्याची जन माहिती अधिकारी यांनी तयारी दर्शविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राची छाननी करता अपीलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त न होणे व याच बरोबर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून निर्गमित झालेली पत्रे अपीलार्थीस न मिळणे व सुनावणीच्या वेळी अपीलार्थीस नेमके कोणती माहिती हवी आहे हे स्पष्ट झाल्या नंतर देखील अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती २ महिन्यांनी उपलब्ध करुन देण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविणे ही जन माहिती अधिकारी यांची कृती त्यांचे मनातील माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रती असलेला अनादर स्पष्टपणे सिध्द करते.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) मधील तरतुदी अन्वये जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी केलेल्या ५९ दिवसाच्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांना प्रतिदिन २५० रुपये प्रमाणे एकूण १४७५० रुपयाची शास्ती लावण्यात येत आहे.

त्याच बरोबर अपीलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत देण्याची कर्तव्य परायणता जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात दर्शविली नसल्याचे सिध्द होत असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मुंबई यांनी घेऊन जन माहिती यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कारवाई करुन आयोगास आपला अनुपालन अहवाल ६० दिवसाच्या आत सादर करावा तव्दतच अपीलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये मागितलेली संपूर्ण माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे आदेशित करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) मधील तरतुदी अन्वये जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी केलेल्या ५९ दिवसाच्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांना प्रतिदिन २५० रुपये प्रमाणे एकूण १४७५० रुपयाची शास्ती लावण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन विठ्ठल पाटील, 'सोनहिरा' मोंढा रोड, गंगापूर तालुका गंगापूर जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (मं) गंगापूर जिल्हा औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ग्रामीण) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (मं.) औरंगाबाद यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. प्रकाशगड, जी - ९, बांद्रा (पुर्व) मुंबई — ४०० ०५१ यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २३७/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २३ मे, २००७.

| | | |
|---|---|---|
| १. सौ.गौरी सुधीर डावखरे<br>व्दारा/- प्रतिम मोहनराव निराळे,<br>उत्कर्ष गजानन कॉलनी सहयोगनगर,<br>बीड. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १. जनमाहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद. | .. | प्रतिवादी |
| २. जनअपिलिय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद. | .. | |

## <u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २३ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी सौ.गौरी सुधीर डावखले (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक, औरंगाबाद, श्री. एस.आर.चव्हाण ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत तर जनअपिलिय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद हे गैरहजर आहेत. त्यांच्या गैरहजेरीची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम दिनांक- १०-०२-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सन २००२-२००४ अखेर खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, अंबाजोगाई येथील शिक्षण सेवकाच्या नियुक्तीस मान्यता प्रदान केलेल्या विषया संदर्भात माहिती मागविली होती. ती खालील प्रमाणे आहे.

> ''खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालय अंबाजोगाई जिल्हा बीड येथील १) श्री.एस.डी.खडके, या शिक्षण सेवकाच्या नियुक्तीस दिनांक- १६-११-२००२ पासून व (२) श्री.पी.एल.खेत्री या शिक्षण सेवकाच्या नियुक्तीस दिनांक-१२-०७-२००४ पासुन मान्यता आपल्या कार्यालयाने पत्र क्रमांक- जा.क्र. कमवि-१/२००४-०५/३९६-९८, दिनांक- ०७-०४-२००५ अन्वये सुधारीत संच मान्यता दिलेली आहे. याबाबत खालील मुद्यावर आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती सह माहिती देण्यात यावी.

१) सदर शिक्षण सेवकाची पदे भरण्यासाठी शिक्षण संस्थने कोणत्या वर्तमानपत्रात व किती तारखेस जाहिरात दिली होती ?

२) सदर शिक्षण संस्थेने वरील दोन्ही शिक्षण सेवकांच्या नियुक्तीने पदे भरण्यापूर्वी आपल्या कार्यालयाकडून पुर्व परवानगी घेतली होती काय? असल्यास आपल्या कार्यालयाने पुर्व परवानगी दिलेल्या पत्राचा क्रमांक व दिनांक.

३) आपल्या कार्यालयाने दिनांक- ०७-०४-०५ च्या पत्राव्दारे शिक्षण सेवकांच्या नियुक्तीस " सुधारीत संच मान्यता'' दिलेली आहे. तर या

सुधारीत संच मान्यतेपूर्वी जी मान्यता (असुधारीत संच मान्यता) दिली होती त्या पत्राचा क्रमांक व दिनांक.

४) श्री.एस.डी.खडके यांच्या शिक्षण सेवकाच्या नियुक्तीस दिनांक- १६-११-२००२ पासुन मान्यता दिलेली आहे. या मान्यतेसाठी संस्थेने सादर केलेल्या पत्राचा क्रमांक व दिनांक."

सदरील माहिती अपिलार्थीने नोंदीकृत्त टपालाव्दारे अपेक्षीली आहे.

अपिलार्थीच्या या माहितीच्या मागणी अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक- कमवि-१/२००४-०६/ ४६९१, दिनांक- १०-०३-२००६ या पत्रा-अन्वये अपिलार्थीस त्यांनी विचारलेली माहिती संबंधित खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, अंबाजोगाई जिल्हा बीड या महाविद्यालयाचे प्राचार्य हे देण्यास सक्षम असल्यामूळे अपिलार्थी यांनी खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, अंबाजोगाई जिल्हा बीड यांच्याकडे माहितीच्या अधिकारा अन्वये अर्ज करुन आपणास आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे सूचीत करुन अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला.

अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी माहिती अधिकारी अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतुदीनूसार जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०१-०४-२००६ रोजी आपल्या माहितीच्या अर्जातील मूळ मागणी कायम ठेवून प्रथम अपिल दाखल केले.

या अपिलावर जनअपिलिय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे अपिलार्थीची सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांचेकडील पत्र क्रमांक जा.क्र. कमवि-१/२००६-०७/ ६९५, दिनांक-०५-०४-२००६ रोजीचे त्यांचे कार्यालयातून डाकनोंदीने दिनांक- १० एप्रिल, २००६ रोजी अपिलार्थीस उशिराने पाठविलेले असून त्या पत्रामध्ये असा उल्लेख केला की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांनी प्राचार्य, खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, अंबाजोगाई जिल्हा- बीड यांच्याकडून प्राप्त करुन घेण्या विषयी सूचीत केले व अपिलार्थीचे अपिल निकाली काढल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यांत आले.

माहिती आयोगास आता पर्यंत असे आढळून आले आहे की, शिक्षण विभागातील जनअपिलिय अधिकारी हे बहूतेक सर्व प्रकरणात विहीत पध्दतीने अपिलाची सुनावणी घेत नाही व अपिलार्थीस एका पत्रा व्दारे त्यांचा निर्णय कळवितात. जनअपिलिय अधिकारी यांची ही कृती बरोबर नाही. जनअपिलिय अधिकारी यांनी कोणत्याही प्रथम अपिलावर निर्णय घेण्यापूर्वी, सुनावणीची तारीख निश्चीत करुन दोन्हीही बाजूच्या पक्षकारांना बोलावून घेवून त्यावर विचार करुन आपला निर्णय घ्यावयाचा असतो. तथापि या पैकी कोणतीही कृती जनअपिलिय अधिकारी यांनी केली नाही. असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. त्यांच्याकडून वारंवार होणा-या या अनियमितते बाबत माहिती आयोगाच्या वेळोवेळीच्या निकालामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. तथापि त्यांच्या कार्यपध्दतीमध्ये अद्यापही सुधारणा दिसून येत नाही, याची नोंद सचिव (शिक्षण) यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी या दोघांकडून ही माहिती मिळविण्यासाठीचे प्रयत्न असफल झाल्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०२-०५-२००६ रोजी व्दितीय अपिल दाखल केले आहे. अपिलार्थीचे हे व्दितीय अपिल राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ११-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये व आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील पत्राच्या छायाप्रतीची मागणी त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाव्दारे मागणी केली होती. तथापि सदर अर्ज प्राप्त झाल्या नंतर तीस दिवसाने अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस सरळपणे न देता प्राचार्य, खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, अंबाजोगाई जिल्हा बीड यांच्या कार्यालयातून उपलब्ध करुन घेण्याचे सूचीत केले. अपिलार्थीने जनअपिलिय अधिकारी यांचेकडे माहिती मिळविण्याच्या संदर्भात प्रथम अपिल केल्या नंतर, देखील शिक्षण उपसंचालकानी आपल्या मूळ भूमिकेत बदल न करता अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राचार्य, खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, अंबाजोगाई जिल्हा-बीड यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचीत केले.

शिक्षण उपसंचालकांचे कार्यालयात सहज उपलब्ध होत असलेली माहिती अपिलार्थीस त्यांच्या विनंती प्रमाणे योग्य ते शूल्क आकारुन, पोष्टाने पाठविण्यास जन माहिती अधिकारी यांना सूचीत करण्यात शिक्षण उपसंचालक

औरंगाबाद यांना कोणताच प्रत्यव्याय  नव्हता. तथापि त्यांनी तसे न करता प्रत्येक वेळी अपिलार्थीस संबंधित संस्थेच्या प्राचार्या कडून अपिलार्थीने माहिती उपलब्ध करुन घेण्या विषयी सूचीत केले आहे.

अपिलार्थीने सरळ माहितीची मागणी  केली असता  त्यांना ती सरळपणे न देता प्राचार्य, खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्याकडून प्राप्त करुन घेण्या विषयी  अपिलार्थीस सूचना देण्या मागची शिक्षण विभागाची ही भूमीका कोणत्याही प्रकारे जरी विचार केला तरी तर्क शास्त्राच्या कोणत्याही निकषावर समर्थनिय ठरु शकत नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात सदर माहिती, नोंदणीकृत्त टपालाव्दारे अपेक्षिली असतांनाही त्यांनी ही माहिती अपिलार्थीस बीड येथील खोलेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, अंबाजोगाई हया संस्थेकडून हस्तगत करणे बाबत अपिलार्थीस सूचना देणे या प्रकरणातील विसंगती स्पष्ट करते.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांचे कार्यालयात जनमाहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होत आहे. अंतिमतः अपिलार्थीस ही  माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- १९-०५-२००७ रोजी पुरविल्याचे आज जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये सांगितले. जर ही माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होती तर त्यांनी ती माहिती विहीत मुदतीत अपिलार्थीस देणे माहिती अधिकार कायदा २००५ चे कलम ७ अन्वये अनिवार्य आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेला विलंब कोणत्याही निकषावर

समर्थनीय ठरु शकत नाही. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे दिनांक- ०९-०३-२००६ ते १९-०५-२००७ एकूण एक वर्षे एक महिना व दहा दिवस इतका असमर्थनीय विलंब लावला आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी अपिलार्थीने वेगवेगळया वेळी केलेले अर्ज व प्रथम अपिल केल्यावर शिक्षण खात्याची भूमिका लक्षात घेता अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लागणारा विलंब खचितच समर्थनिय ठरु शकत नाही, या निर्णयाप्रत मी आलो आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणात दाखविलेल्या असमर्थनिय विलंब पहाता माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २० (१) मधील तरतुदी नुसार प्रतिदिन २५०/- रुपये प्रमाणे एकूण रुपये २५,०००/- इतकी शास्ती त्यांना लावण्यात येत असून सदर शास्तीची रक्कम हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत शासकीय कोषागारात एका हप्त्यात जनमाहिती अधिकारी यांनी भरावी. तव्दतच या पुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त होणा-या माहितीच्या अर्जावर विहीत मुदतीत यथायोग्य कार्यवाही करावी, अशा सूचना त्यांना देण्यात येत आहेत. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी लावलेल्या असमर्थनिय विलंबा बाबत जनमाहिती अधिकारी यांना २५०/- रुपये प्रतिदिन

या प्रमाणे एकूण २५,०००/- रुपये इतकी शास्ती लावण्यात येत असून त्यांनी सदर शास्तीची रक्कम योग्य त्या शिर्षाखाली जिल्हाकोषागारात तीस दिवसाच्या आत एका हप्त्यात जमा करावी.

औरंगाबाद
दिनांक २३ मे,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ सौ.गौरी सुधीर डावखरे व्दारा/- प्रतिम मोहनराव निराळे, उत्कर्ष गजानन कॉलनी सहयोगनगर, बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक,शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव (शिक्षण) मंत्रालय, मुंबई-३२ यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई — ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५२/२००७

निर्णय दिनांक २४-०५-२००७

श्री. विजयकुमार नारायणराव गोरे, : अपीलार्थी
मुख्य संपादक सा. देवमन समाचार
गोरे निवास शिवाजीनगर दाद-याजवळ, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील
कार्यालय अर्धापूर तालुका अर्धापूर जिल्हा
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार अर्धापूर तालुका अर्धापूर
जिल्हा नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. विजयकुमार नारायणराव गोरे व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय अर्धापूर तालुका

अर्धापूर जिल्हा नांदेड हे दोघेही गैरहजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार अर्धापूर तालुका अर्धापूर जिल्हा नांदेड श्री. पी. व्ही. धोत्रे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक १३-०४-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“ अर्धापूर तालुक्यातील एकूण स्वस्त धान्य दुकानदारांच्या नांवे व पत्त्यासहीत यादी मिळणे तसेच त्यांना शासनाकडून दारिद्र्य रेषेखाली व रोहयो योजने अंतर्गत दिल्या गेलेल्या गहू व तांदुळाचा एकूण स्टॉक व वितरण रजिस्टरची सत्यप्रती मिळणेबाबत.”

अपीलार्थीने वरील माहिती सर्वसाधारण टपालाव्दारे मागविली होती. तद्वतच अपीलार्थी ने या अर्जामध्ये मागणीचा कालावधी निर्देशित केला नाही याची प्रकर्षाने नोंद घेण्यात येत आहे.

अपीलार्थी यांच्याकडून सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीस, त्यांना निश्चित कोणत्या कालावधीची माहिती हवी आहे याचा बोध होत नसल्याचे स्पष्ट करुन त्यांनी माहिती च्या कालावधीच्या तपशीलासह अर्ज सादर करण्याच्या त्यांच्या दिनांक १३-०५-२००६ च्या पत्राव्दारे सूचना दिल्या आहेत व त्यांचा अर्ज निकाली काढला आहे.

तहसीलदार कार्यालयातील सर्व पत्रव्यवहार तहसीलदार यांच्या मार्फत होत असल्यामुळे अपीलार्थीस वरील सूचना जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही असे सुनावणीत आज उपस्थित असलेले जन अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. अपीलार्थीस सदर पत्र जन माहिती अधिकारी यांच्या वतीने तहसीलदार यांनी पाठविले आहे असे त्यांनी पुढे सुनावणीत कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर

अपिल जन अपिलीय अधिका-यास दिनांक १४-०६-२००६ रोजी प्राप्त झाले. या अपीलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या कार्यालयातील दिनांक २८-०७-२००६ च्या पत्रान्वये अपीलार्थीने मागणी केलेल्या मूळ अर्जामध्ये व तसेच अपीलामध्ये त्यांना निश्चित कोणत्या कालावधीची माहिती हवी आहे याचा बोध होत नसल्याने त्यांचे अपील निकाली काढून अपीलार्थीस नक्की कोणत्या कालावधीची माहिती हवी आहे याचा त्यांनी स्पष्ट उल्लेख करुन परत अर्ज करण्यास सूचना दिली आहे. अपीलीय अधिका-यांची सुनावणी घेण्या संदर्भातील कृती अयोग्य आहे. जन अपीलीय अधिका-याने दोन्ही बाजुच्या पक्षकारांना बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले असते तर हा कालावधीचा मुद्दा जन अपीलीय अधिकारी यांचे स्तरावर निकाली निघून याच टप्प्यावर अपीलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली असती.

यावर अपीलार्थीने कोणतीही कारवाई न करता राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये देखील अपीलार्थीस त्यांना निश्चितपणे कोणत्या कालावधीची माहिती हवी आहे त्याचा उल्लेख केलेला नाही याची नोंद घेणे आवश्यक ठरते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये तहसीलदार अर्धापूर यांनी असा मुद्दा उपस्थित केला की या प्रकरणी अपीलार्थीने त्यांना निश्चितपणे कोणत्या कालावधीची माहिती हवी आहे याचा उल्लेख केलेला नाही. अपीलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप दरवर्षी व कालानुरुप बदलत असते त्यामुळे अपीलार्थीने निश्चित कालावधीचा उल्लेख करणे त्यांना माहिती मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक ठरते. तहसीलदार अर्धापूर यांनी मांडलेल्या या मुद्याशी राज्य माहिती आयोग सहमत आहे. **अपीलार्थीने एखादी माहिती मागवितांना केलेल्या अर्जामध्ये अपीलार्थीस निश्चितपणे कोणत्या कालावधीची माहिती हवी आहे याचा उल्लेख करणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अनिवार्य आहे. त्याशिवाय अपीलार्थीस**

**त्यास अपेक्षित असलेली निश्चित माहिती देणे कोणत्याही जन माहिती अधिका-यास शक्य नाही.** या प्रकरणी अपीलार्थीने त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जामध्ये तसेच जन अपीलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे अपीलामध्ये देखील, कालावधीचा उल्लेख केला नसल्यामुळे अपीलार्थीचे त्याने आयोगाकडे केलेले दिनांक २१-०७-२००६ रोजीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

प्रसंगावशात महसूल आयुक्त औरंगाबाद यांना असे सुचित करण्यात येते की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अर्जदारास त्यांच्या सहीने (माहिती अधिका-याच्या) पूर्ण माहिती देण्या संदर्भात त्यांनी योग्य ते परिपत्रक जारी करावे.

**निर्णय**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विजयकुमार नारायणराव गोरे, मुख्य संपादक सा. देवमन समाचार गोरे निवास शिवाजीनगर दाद-याजवळ, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय अर्धापूर तालुका अर्धापूर जिल्हा नांदेड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार अर्धापूर तालुका अर्धापूर जिल्हा नांदेड यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना निकालपत्रातील अभिप्राया संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५२

निर्णय दिनांक २४-०५-२००७

कलमसिंह राधाकिशनसिंग बैस, : अपीलार्थी

घर नं. ४-४-२६०, हनुमान मंदिर जवळ,

गाडीपुरा नांदेड तालुका जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा नगर रचनाकार नांदेड वाघाळा

महानगरपालिका नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सहाय्यक संचालक नगर रचना नांदेड

वाघाळा महानगरपालिका नांदेड

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. कमलसिंग राधाकिसनसिंग बैस (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड श्री. एस. पी. कांबळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी

असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड श्री. बी. एन. बनकर (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणून श्री. दिलीप गुट्टे उपायुक्त महा नगरपालिका नांदेड हे हजर आहेत.

२. या प्रकरणी प्रथमतः अपीलार्थी यांनी दिनांक १३-१२-२००५ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> ‘‘ श्री. राजराम संगप्पा गुंडेवार रा. विनकर कॉलनी, चौफाळा, नांदेड यांच्या घराच्या बांधकामाची परवानगी देण्यात आलेल्या संचिकेची सत्यप्रत मिळणे बाबत. ’’

३. सदर माहिती अपीलार्थीने व्यक्तिशः अथवा नोंदणीकृत अथवा स्पीड पोस्ट टपालव्दारे अपेक्षिली होती. अपेक्षित माहितीचा कालावधी अपीलार्थीने इ. स. २००५ असा नमूद केला आहे.

४. जन माहिती अधिका-याकडून अपीलार्थीच्या या अर्जाच्या संदर्भात दिनांक ०७-०१-२००६ रोजी प्रथम उत्तर पाठविले गेले. सदर संचिका जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे व या संचिकेचा शोध घेणे चालू असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळवून जन माहिती अधिका-यांस ही माहिती देण्यासाठी किमान २० दिवस वेळ देण्याची विनंती केली. यानंतर कार्यालयामध्ये पुरेपुर शोध घेऊनही संदर्भीय नस्ती न सापडल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातर्फे जारी केलेल्या दिनांक २०-०२-२००६ चे परिपत्रकान्वये सदर नस्ती गहाळ झाल्याचे सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे दिसते. या परिपत्रकामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या विभागातील सर्व कर्मचा-यांना त्यांच्याकडील कपाटातील कागदपत्राची काळजीपूर्वक पाहणी करुन विषयाधीन संचिका शोधावी सदर संचिका त्यांच्याकडे उपलब्ध असल्यास ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करण्याविषयी सूचित केल्याचे दिसून येते. एवढे करुनही सदर

संचिका जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सापडली नाही व त्यामुळे ते ही माहिती विहित मुदतीत अपीलार्थीस देऊ शकले नाहीत असे त्यांनी आयोगास आज सांगितले.

५. अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीने जन अपीलीय अधिका-यास दिनांक ३१-०१-२००६ रोजी प्रथम अपील करुन आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

६. अपीलार्थीच्या प्रथम अपील संदर्भात जन अपीलीय अधिकारी यांनी प्रथम सुनावणी दिनांक १७-०८-२००६ रोजी ठेवली तथापि त्यांनी ती त्यांच्या प्रस्तावित दौ-यामुळे पुढे ढकलली व दिनांक २९-०८-२००६ रोजी ही सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी घेतली. दिनांक २९-०८-२००६ रोजी घेतलेली सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०९-२००६ रोजी अंतीम केली. या सुनावणीमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस सदर संचिका सापडत नसल्याने माहिती देता येत नाही हे कारण योग्य नाही असे ठरवून अपीलार्थी यांना १५ दिवसाचे आत मागणी केलेल्या संचिकातील सत्यप्रती पुरवाव्या अशी सूचना देऊन अपील निकाली काढले आहे.

७. एवढे होऊन गेल्यानंतरही अपीलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने दिनांक ११-०७-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. सदर व्दितीय अपील राज्य शासनाने ठरवून दिलेल्या नमुन्यात न करता त्यांनी एका साध्या कागदावर वीस रुपयाचे तिकिट चिकटवून केले आहे. या अपीलावर त्यांनी दोषी अधिका-यावरती कारवाई करुन त्यांना शास्ती लावण्याविषयी आयोगास विनंती केली आहे.

८. आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की अपीलार्थीने ज्या संचिकेची सत्यप्रत मागितली होती ती संचिका त्यांच्या कार्यालयातून गहाळ झाली आहे व त्याकरिता त्यांनी हरत-हेचे प्रयत्न करुन देखील त्यांना ही

संचिका आजतागायत उपलब्ध होऊ शकली नाही त्याचबरोबर ही संचिका ज्याच्या ताब्यात होती ते कर्मचारी श्री. आर. डी. गायकवाड अनुरेखक यांच्यावर विभागीय चौकशीची कारवाई महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) मधील कलम ८ अन्वये चौकशी चालू केली असल्याचे सांगितले आहे. त्याच बरोबर अपीलार्थी यांना त्यांनी मूळ माहितीच्या अर्जा मध्ये जी माहिती मुख्यत्वेकरुन अपेक्षिली होती त्या माहितीच्या व्दितीय प्रती परत तयार करुन अपीलार्थीस दिनांक २०-१०-२००६ रोजी पुरविल्या आहेत. अपीलार्थीस पुरविलेल्या माहिती मध्ये श्री. गुंडेवार राजराम संगप्पा यांच्या घराच्या बांधकाम संदर्भात सर्व महत्वाच्या कागदपत्रां च्या प्रती व नकाशांचा समावेश आहे.

९. अपीलार्थी यांनी या प्रकरणा संदर्भात आयोगास असे सांगितले की गुंडेवार हे नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे कर्मचारी असून त्यांनी ही नस्ती हेतुपुरस्सर सहाय्यक संचालक महा नगरपालिका यांचे कार्यालयातून गहाळ केली असून प्रश्नाधीन बांधकाम हे त्यांच्या घराचे आहे व त्यांना मनपाने मंजुरी दिलेल्या बांधकाम क्षेत्रापेक्षा / त्यांना अनुज्ञेय असलेल्या बांधकाम क्षेत्रापेक्षा सुमारे चार पट अधिक बांधकाम केले आहे हे बांधकाम अनाधिकृत आहे. यावर श्री. गुंडेवार यांनी अनाधिकृत बांधकाम केले प्रकरणी त्यांच्या विरुध्द नांदेड वाघाळा महा नगरपालिकेने एम.आर.टी. ॲक्ट मधील कलम ५३ व ५४ अन्वये इतवारा पोलीस स्टेशन नांदेड येथे अनाधिकृत बांधकामाबाबत तक्रार दाखल केली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

१०. वरील सर्व घटनाक्रम पाहता व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रां ची तपासणी करता महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी स्वतःच महानगरपालिकेने केलेल्या नियमाचे बेकायदेशीरपणे उल्लंघन करणे व तदनंतर त्यांच्या घराच्या तत्कालीन बांधकाम परवानगी देण्या संदर्भातील संचिका गहाळ होणे हा घटनाक्रम पाहता हे प्रकरण एकूण आयुक्त नांदेड वाघाळा महा नगरपालिका यांच्या बेशिस्त प्रशासनाचे द्योतक आहे असे म्हटल्यास वावगे

होणार नाही. यास्तव महानगरपालिका आयुक्त यांनी श्री. गुंडेवार यांनी केलेल्या अनाधिकृत बांधकामाबाबत एका महिन्याच्या आत तातडीने अंतिम निर्णय घ्यावा असे त्यांना सुचित करण्यात येत आहे. तद्वतच ज्या कर्मचा-याने सदर संचिका गहाळ केली आहे त्याच्यावर विभागीय चौकशीची कारवाई चालू असल्याचे मनपाचे उप आयुक्त श्री. दिलीप गुट्टे यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. ही विभागीय चौकशी महानगरपालिकेने ६० दिवसाच्या आत पूर्ण करुन त्यावर आपला यथायोग्य निर्णय घ्यावा. जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातून बांधकाम परवानगी संदर्भातील महत्वाची फाईल गहाळ होणे ही निश्चितच गंभीर बाब मानली पाहिजे. आपल्या कार्यालयातील संचिका अशा प्रकारे गहाळ होणे हे कार्यालयीन प्रमुखास निश्चितच भुषणावह नाही. त्यांच्या या ढिसाळ प्रशासनाची यथायोग्य नोंद मनपा आयुक्तांनी घ्यावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे. आता सदर संचिका सापडत नाही व सदर संचिकेच्या मुख्य कागदाच्या प्रती अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-१०-२००६ रोजी दिल्या असल्यामुळे अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे व महानगरपालिका आयुक्तांना अशा प्रकारच्या प्रकरणाची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत योग्य त्या उपाययोजना त्यांनी कराव्यात असे सूचित करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. महानगरपालिका आयुक्तांना अशा प्रकारच्या प्रकरणाची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत योग्य त्या उपाययोजना त्यांनी कराव्यात असे सूचित करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४ मे २००७ — राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ कलमसिंह राधाकिशनसिंग बैस, घर नं. ४-४-२६०, हनुमान मंदिर जवळ, गाडीपुरा नांदेड तालुका जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड यांना निकालपत्रातील अभिप्राया संदर्भात पुढील कार्यवाही साठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना नांदेड वाघाळा महा नगरपालिका नांदेड यांना निकालपत्रातील अभिप्राया संदर्भात पुढील कार्यवाही साठी.

४ आयुक्त नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड यांना निकालपत्रातील अभिप्राया संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५८/२००७

निर्णय दिनांक २५-०५-२००७

श्री. विलास त्रिंबकराव भालेराव, : अपीलार्थी
मु. पो. नृसिंह कॉलनी, गंगापूर तालुका
गंगापूर जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता (विशेष प्रकल्प)
उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग
गंगापूर जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम
(प.) विभाग, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. विलास त्रिंबकराव भालेराव रा. गंगापूर (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता

(विशेष प्रकल्प) उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग गंगापूर जिल्हा औरंगाबाद श्री. एन. एम. काजी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (प.) विभाग, औरंगाबाद श्री. व्ही. जी. बोडखे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

संबंधित अपीलार्थी हे दारिद्र्य रेषेखालील असून त्यांचा कार्ड क्रमांक १४८/०२ असा आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक १०-०१-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> "१) श्री. दिलीप बापुराव धाट यांचे कडील झुणका भाकर केंद्र आपले ताब्यात दिलेबाबतचा दिनांक ०२-०१-२००६ ची ताबा पावती / अर्ज नक्कल प्रत, २) मे. तहसीलदार गंगापूर यांनी श्री. दिलीप धाट यांचे ताब्यातून घेऊन आपल्या ताब्यात दिल्याबाबतच्या अहवालाची प्रत व आपल्या ताब्यात घेतल्याच्या पत्राची प्रत व नक्कल मिळणेबाबत."

सदर माहिती संदर्भात कालावधी म्हणून दिनांक १५ डिसेंबर २००५ ते ०४ जानेवारी २००६ अशा कालावधीचा उल्लेख अपीलार्थीने आपल्या अर्जात केला आहे.

सदर माहिती त्यांना व्यक्तीशः हवी किंवा रजिस्टर्ड पोस्टाने हवी या संदर्भात त्यांच्या या अर्जामध्ये कोणताही उल्लेख नाही.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-०१-२००६ रोजी सदर झुणका भाकर केंद्राची इमारत या कार्यालयाच्या अधिकारात नाही असे त्यांचेकडील दिनांक ३०-०१-२००६ च्या पत्रान्वये कळविले.

अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. दिलीप बापुराव धाट यांच्या दिनांक ०२-०१-२००६ च्या अर्जाची प्रत मागविली होती तथापि या अर्जाची प्रत जन माहिती

अधिकारी यांनी अपीलार्थीस दिली नाही. तदनंतर दिनांक ०६-०२-२००६ रोजी सदर झुणका भाकर केंद्र जन माहिती अधिकारी यांचेकडे तहसीलदार गंगापूर यांच्याकडून ताब्यात दिले गेल्यानंतर अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक १३-०२-२००६ चे पत्रान्वये अपीलार्थीने मागणी केल्याप्रमाणे झुणका भाकर केंद्राच्या ताबा पावतीची फोटो प्रत अपीलार्थीस दिनांक १३-०२-२००६ चे पत्रान्वये पुरविली. सदर दिनांक १३-०२-२००६ चे पत्राची पोहोच अपीलार्थीस दिनांक २२-०३-२००६ रोजी देण्यात आली. सदर माहिती दिनांक २२-०३-२००६ रोजी अपीलार्थीस मिळाल्या प्रित्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या पत्रावर सही करुन पोहोच दिली आहे. सदर पत्र १ महिना ९ दिवस इतक्या विलंबाने दिले गेल्याची कारणे विचारली असता जन माहिती अधिकारी यांनी काहीही उत्तर दिले नाही.

तथापि यापुर्वीच म्हणजे दिनांक १०-०३-२००६ रोजी अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांचेकडे या प्रकरणी प्रथम अपील केले होते. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लादण्याची मागणी केली होती. या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०३-२००६ रोजी सुनावणी घेतली. अपीलार्थीने या सुनावणीपोटी अपीलीय अधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणी ची प्रत आयोगास सादर केली आहे. त्याची पाहणी करता ही सुनावणी म्हणजे सुनावणी कशी असू नये याचा उत्तम नमुना असे म्हणावयास हरकत नाही. सदर सुनावणी आदेश हा सुनावणी आदेश नसून ब-याच प्रकरणा संदर्भातील कार्यवाही संदर्भातील एका बैठकीचे इतिवृत्त असल्याचे दिसून येते. या कथित सुनावणी तपशीलामध्ये व निकालपत्रामध्ये कोणत्याही प्रकारचे ठोस आदेश नाहीत हे विशेष. याच बरोबर संबंधित अपीलार्थी यांना या सुनावणीसाठी बोलाविल्याचे देखील उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील वेगवेगळ्या तरतुदींची अंमलबजावणी कशा प्रकारे करावी

याचे फारसे ज्ञान संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागातील अपीलीय अधिका-यांना अद्यापही प्राप्त झाले असल्याचे दिसून येत नाही. यास्तव सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांना आदेशित करण्यात येते की त्यांनी त्यांच्या विभागा तील सर्व क्षेत्रीय अधिका-याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा / शिबीरे आयोजित करावी. आयोगा समोर आलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वेगवेगळ्या विभागाच्या सुनावणीच्या पध्दती पाहिल्या असता सर्व संबंधितांना हे प्रशिक्षण वेळोवेळी देणे अनिवार्य आहे असे आयोगाचे मत आहे. अपीलाच्या निर्णयावर जन माहिती अधिकारी यांनी स्वतः स्वाक्षरी करणे अभिप्रेत आहे तथापि या प्रकरणी संदर्भिय सुनावणी आदेशावर उप कार्यकारी अभियंता यांची सही आहे. त्यामुळे व तसेच वरील उध्दृत केलेल्या कारणांमुळे ही सुनावणी अवैध ठरते.

अपीलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपीलार्थी ने दिनांक १२-०७-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये असे आढळून आले आहे की, अपीलार्थी यांना श्री. दिलीप बापुराव धाट यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक ०२-०१-२००६ च्या अर्जाची प्रत व तहसीलदार यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास प्राप्त झालेल्या झुणका भाकर केंद्राच्या ताबा पावतीची प्रत आवश्यक होती.

यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की अपीलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जात ताबा पावती / अर्ज असा उल्लेख केला असल्यामुळे त्यांचा गैरसमज झाला व त्यांनी अपीलार्थीस फक्त ताबा पावतीची सत्यप्रत पुरविली. आता जन माहिती अधिकारी यांनी श्री. दिलीप बापुराव धाट यांच्या दिनांक ०२-०१-२००६ च्या पत्राची स्वाक्षांकित प्रत अपीलार्थीस दिली आहे व अपीलार्थीस आता त्यांना आवश्यक असणारी संपूर्ण माहिती मिळाली असल्याचे ते सांगत आहेत व अपिलार्थी त्याप्रमाणे कबूल करीत आहेत.

अपीलार्थीस आज जरी संपूर्ण माहिती मिळाली असली तरी या साध्या प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांनी दाखविलेला निष्काळजीपणा, बेपर्वाई, नजरे आड करणे आयोगास शक्य नाही. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात प्रथमपासून दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेचा अभावाबाबत त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे याची नोंद सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यथायोग्य रित्या घ्यावी. याच बरोबर या प्रकरणी जन अपीलीय अधिकारी यांनी अपील ठरविण्याच्या पध्दतीमध्ये ज्या ढिसाळपणाचे व अज्ञानाचे प्रदर्शन केले आहे त्याचीही नोंद मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद व सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेचा अभावा बाबत त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे याची नोंद सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यथायोग्य रित्या घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विलास त्रिंबकराव भालेराव, मु. पो. नृसिंह कॉलनी, गंगापूर तालुका गंगापूर जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (विशिष्ट प्रकल्प) उप विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग गंगापूर जिल्हा औरंगाबाद यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (प.) विभाग, औरंगाबाद यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद

५ सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९१/२००७

निर्णय दिनांक २८-०५-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. मुदखेडकर महमद एकबाल पिता महमद युसूफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅड रोड, नांदेड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, देगलूर जिल्हा नांदेड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार देगलूर जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थीच्या वतीने श्री. महमद वसीम नांदेड (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, देगलूर जिल्हा नांदेड श्री. जी. व्ही. नरवडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार

देगलूर जिल्हा नांदेड श्री. आर. एम. कांबळे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०३-२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> " देगलूर तालुक्यातील एकूण पाच अर्धघाऊक रॉकेल विक्रेते १) बंडाप्पा शंकर आप्पा गंदीगुडे २) मे. बालाजी ट्रेडिंग कंपनी ३) व्यंकटेश ट्रेडिंग कंपनी ४) विजय धोंडीबा दाशेटवार ५) मे. दायमा गंगय्या चिद्रावार यांना शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेलचे नियतन तसेच त्यांना सलग्न असलेले किरकोळ रॉकेल परवाने धारक यांना वितरण केलेल्या रॉकेलच्या वितरण व स्टॉक रजिस्टरची सत्यप्रत मिळणेबाबत."

सदर माहिती अपीलार्थीने साधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती. संबंधित कालावधी २००४-५ ते मार्च २००६ अशा दोन वर्षाचा दर्शविला आहे.

यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांचेकडील पत्र क्रमांक २००६, दिनांक २४-०४-२००६ रोजीचे माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क म्हणून रुपये १००० जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात भरण्याची सूचना केली. तथापि हे पत्र अपीलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपीलार्थी यांनी आज सुनावणीच्या वेळी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक ०८-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले होते. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

सदर अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०५-२००६ रोजी ठेवल्याचे अपीलार्थी यांना त्यांचे कार्यालयातील पत्र क्रमांक ३४, दिनांक २४-०५-२००६ रोजी कळविले.

सदर अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०६-२००६ रोजी अंतीम केली व अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर अपीलार्थीस माहिती पुरवावी असे आदेश दिले.

यावर अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की ते दिनांक ३१-०५-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीसाठी गेले होते परंतु जन अपीलीय अधिकारी हे त्या दिवशी दौ-यावर असल्यामुळे याची सुनावणी होऊ शकली नाही. अपीलार्थी यांनी जन अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात हजर असल्या प्रित्यर्थ त्यांनी तहसील कार्यालयास सादर केलेल्या पत्राची प्रत, ज्यावर तहसील कार्यालयाच्या दिनांकासहीत असलेल्या शिक्क्यासह सादर केली आहे. यावरुन अपीलार्थी अथवा त्यांचे प्रतिनिधी दिनांक ३१-०५-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात हजर होते हे पुरेशा प्रमाणात सिध्द होते. तथापि जन अपीलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केलेली कागदपत्रे पाहता सदर सुनावणी दिनांक ३१-०५-२००६ रोजी नक्की झाली किंवा कसे तसेच याच्या सुनावणीस अपीलार्थी हजर होते किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. व्दितीय अपील सादर करण्याचे कारण म्हणून त्यांनी मुदत संपल्या नंतर ही माहिती देण्यात विलंब व टाळाटाळ होत असणे असे दिले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागणी केलेली सर्व माहिती त्यांच्याकडे तयार आहे असे सांगितले. तर अपीलार्थीने जन माहिती अधिकारी

यांच्याकडे वारंवार जाऊन व पत्राव्दारे विनंती करुनही माहिती दिली नसल्याचे आयोगाचे निदर्शनास आणून दिले आहे. या प्रकरणातील संपूर्ण घटनाक्रम पाहिला असता अपीलार्थीस आवश्यक ते शुल्क भरण्या संदर्भातील जन माहिती अधिकारी यांचे पत्र न मिळणे व जन अपीलीय अधिकारी दौ-यावर असतांना देखील त्या दिवशी सुनावणी ठेवणे व सुनावणी झाल्याचे दर्शविणे व त्याप्रमाणे आदेश पारीत करणे या सर्व घटनाक्रमामध्ये परस्पर विसंगती दिसून येत आहे. यास्तव जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की अपीलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी. त्याच बरोबर त्यांना अशीही समज देण्यात येत आहे की, त्यांच्या कार्यालयाकडे माहिती अधिकार संदर्भातील होणारा पत्रव्यवहार त्यांनी येथून पुढे काळजीपूर्वक करावा व या संदर्भातील आपले अभिलेखे व्यवस्थित ठेवावे जेणेकरुन त्यांना आपल्या भुमिकेतील, अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये अधिक पारदर्शकता सहजपणे दर्शविता येईल.

**निर्णय**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महमद एकबाल पिता महमद युसूफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅड रोड, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, देगलूर जिल्हा नांदेड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार देगलूर जिल्हा नांदेड यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/१९८/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक २८ मे, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर तालूका-तुळजापूर, जिल्हा-उस्मानाबाद. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, तुळजापूर. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २८ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.किरण माणिकराव यादव(येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत, तर जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, डॉ.किरण पराग ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, श्री.भारत ज.सासणे (येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक- १०-०३-२००६ रोजीच्या अर्जा अन्वये खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१) दिपक नगर येथील एकुण घरकुल योजना लाभधारकांची संपुर्ण पत्तासहीत यादी.
२) ग्रामपंचायतने यासंबंधात घेतलेला ठरावाची नक्कल.
३) या संदर्भात काही तक्रारी आपणाकडे आल्या असतील तर त्याची एक प्रत देण्यात यावी.
४) या तक्रार वरती आपणाकडून काय कार्यवाही करण्यात आली. त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी."

अपिलार्थी यांच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक- ६७८५/२००६, दिनांक- २२-०३-२००६ अन्वये अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क रुपये १०५/- शासकीय तिजोरीत भरण्या विषयी सुचविले. तथापि अपिलार्थीने हे शुल्क न भरता दिनांक- ०३-०५-२००६ रोजी याच माहिती करिता जनअपिलिय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल केले. या प्रथम अपिलाची सुनावणी जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- २७-०६-२००६, २५-०७-२००६, ०३-०८-२००६ रोजी घेतली. तीन टप्प्यात सुनावणी घेण्याचे कारण जन अपिलिय अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी सांगितले की, अपिलार्थी हे दोन्हीही वेळेस गैरहजर राहिल्यामूळे त्यांना सुनावणीच्या पुढील तारखा देण्यात आल्या आहेत. या सुनावणीचा निर्णय जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- ०३-०८-३००६ रोजी दिला व त्या दिवशी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याचे आदेशीत केले व त्याप्रमाणे

जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०३-०८-२००६ रोजी ही माहिती तयार करुन ठेवली. तथापि अपिलार्थीने दिनांक- १०-०८-२००६ रोजी सदर माहिती व्यक्तीशः प्राप्त करुन घेतली.

मध्यंतरीच्या काळात दिनांक- २१-०६-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल केले. त्यामध्ये अपिलार्थीने त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर हे आता नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त झाल्याचे आयोगास सांगण्यात आले व त्याच बरोबर अपिलार्थीस आवश्यक असणारी माहिती अपिलार्थीस मिळाली असल्याचे त्यांचे दिनांक- १५-०५-२००७ रोजीचे पत्र आयोगाकडे सादर करण्यात आले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी त्यांना संपूर्ण माहिती मिळाल्याचे कबुल केले आहे व आता त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार राहिलेली नसल्याचे म्हटले आहे.

आजच्या सुनावणीस अपिलार्थीची अनुपस्थिती व तसेच अपिलार्थीने आयोगास सादर केलेले पत्र, अपिलार्थीस देण्यात आलेली माहिती पहाता अपिलार्थीचे सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २८ मे,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर, तालूका-तुळजापूर जिल्हा-उस्मानाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, उस्मानाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर /१५१

निर्णय दिनांक २९-०५-२००७

| | | |
|---|---|---|
| सौ. नुझहत पिता महेबुब खान, घर क्र. ६८७,<br>विद्यानगर, परभणी | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद<br>परभणी | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद, परभणी | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी सौ. नुझहत पिता महेबुब खान, परभणी (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद परभणी श्री. म्हातारदेव किसन खांदवे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हे कार्यबाहुल्यामुळे येऊ शकले नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. जन अपीलीय अधिकारी यांच्या या वर्तनाची आयोगाने दखल

घेतली असून त्यांना इतर वेळी आयोगाचे बोलावणे येईल त्यावेळी हजर राहण्याची सूचना महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग यांनी संबंधितांना द्याव्यात असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक २२-०२-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन सरहद्द गांधी प्राथमिक शाळा परभणी यांच्याकडून एकूण १५ मुद्दयावर माहिती मागविली होती. सदर माहिती टपालाव्दारे मागविली होती. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचा कालावधी जुलै १९९५ ते जानेवारी २००६ असा सुमारे ११ वर्षाचा आहे.

अपीलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये सदर शिक्षण संस्थेच्या शाळा समितीच्या ठरावाच्या प्रती, शिक्षकांच्या नेमणुकीचे आदेशाच्या प्रती, शिक्षक मान्यतेच्या आदेशाच्या प्रती, सदर शाळाकडून अनुदानासाठी केलेल्या अर्जाच्या व त्यांच्याकडील ठरावाच्या प्रती, शाळेतील शिक्षकांच्या पगार पत्रकाच्या प्रती, शाळा समितीसाठी परिशिष्ट १ वरील अध्यक्ष श्री. मुनवरखान यांनी परिशिष्ट १ वरील उपाध्यक्ष अब्दुल कदीर श. मीरा यांना नॉमिनेट केलेल्या पत्राच्या प्रती, शाळेतील ४ शिक्षिकांना दिलेल्या शिफारस पत्राच्या प्रती, सदर शाळेच्या संच मान्यतेबाबत शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी शिक्षण उपसंचालकाकडे केलेल्या शिफारस पत्राच्या प्रती, व शाळेबद्दल तक्रारी अर्ज दिनांक ०१-०६-२००५, ०८-०८-२००५, २५-०८-२००५, ०५-१२-२००६ यावर झालेला निर्णय याच्या प्रती तसेच त्याच बरोबर शिक्षणा धिकारी यांनी या शिक्षण संस्थेच्या शाळेची चौकशी करुन प्रकरण निकाली काढण्यात येणार असलेल्या लिहिलेल्या प्रकरणाच्या पत्राच्या प्रती व या संदर्भातील शिक्षणाधिकारी यांनी शिक्षण उपसंचालकाशी केलेल्या ०८-०५-२००६ च्या पत्राची प्रत इत्यादीच्या मागणीचा समावेश आहे.

सदर अर्ज अपीलार्थीने शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २२-०२-२००६ रोजी दिल्यानंतर शिक्षणाधिकारी यांच्याकडे मात्र हा अर्ज दिनांक २१-०३-२००६ रोजी प्राप्त

झाल्याचे शिक्षणाधिकारी आज सुनावणीमध्ये सांगत आहेत. संबंधित लिपीकास शिक्षणाधिकारी यांच्याकडे अर्ज येण्यासाठी झालेला विलंब, हा टाळता येण्याजोगा विलंब असल्याने विलंबास जबाबदार असलेले लिपीक श्री. डहाळे यांच्याविरुध्द विभागीय चौकशी चालू असून सध्या त्यांची सेवा अन्य एका प्रकरणा संदर्भात निलंबीत ठेवण्यात आलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. त्याच बरोबर श्री. डहाळे यांच्यावर विभागीय चौकशीची कारवाई देखील चालू झाली असल्याचे त्यांनी आयोगापुढे स्पष्ट केले.

विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) नुसार दिनांक २८-०३-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले.

या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०४-२००६ रोजी सुनावणी ठेवली व त्यांनी आपली सुनावणी त्याच दिवशी अंतीम करुन अपीलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती शिक्षण विभागाशी संबंधित आहे ती माहिती अपीलार्थीस तात्काळ देण्याचे सुचित केले. तदनंतर अपीलार्थी यांनी उपस्थित केलेल्या काही मुद्यावरील अर्धवट माहिती दिनांक २२-०४-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचे मार्फत देण्यात आली. सदर माहितीवर समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपीलार्थी यांनी दिनांक १९-०७-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये या प्रकरणाची पार्श्वभूमी अपीलार्थी यांच्याकडून समजावून घेतली असता अपीलार्थीचे म्हणणे असे आढळले की सदर शाळेचे (सरहद्द गांधी प्राथमिक शाळा परभणी) व्यवस्थापन अधिकृत समिती मार्फत केले जात नसून दुस-या एकदा बनावट समितीमार्फत केले जात आहे. शिक्षण खात्याच्या आदेशाप्रमाणे प्रत्येक शाळेचे व्यवस्थापन हे एका शाळा समिती मार्फत करावयाचे असते आणि शाळा समितीचे अध्यक्ष हे सदर शैक्षणिक संस्थेचे पदसिध्द अध्यक्ष असतात. याच बरोबर शाळेतील ३ कर्मचारी व इतर

४ स्वीकृत सदस्य अशा एकूण ७ जणांची ही समिती शिक्षण खात्याच्या आदेशान्वये गठीत केलेली असून शाळेच्या सर्व व्यवहाराचे व्यवस्थापन, शाळेस आवश्यक अनुदान प्राप्त करुन घेणे, शिक्षकांच्या नेमणूका करणे इत्यादी सर्व प्रकरणे या शाळा समिती मार्फत हाताळली जातात तथापि शाळेची जी कथित शाळा समिती स्थापन केली गेली आहे त्याचे अध्यक्ष म्हणून दुसरीच व्यक्ती कार्यरत असून इतर सदस्य देखील दुस-याच व्यक्ती आहेत. सदर कथित शाळा समिती बेकायदेशीर असून त्या बेकायदेशीर शाळा समिती मार्फत शिक्षकांच्या नेमणुका, शाळांचे व्यवस्थापन, वार्षिक अनुदान प्राप्त करुन घेणे आणि व त्यास शिक्षण विभागाची वेळोवेळी मंजूरी प्राप्त करुन करुन घेणे इ. व्यवहार या संस्थेत चालू आहेत. या सर्व प्रकारास शिक्षण विभागाच्या परभणी येथील अधिका-यांचा व त्यांचे कार्यालयाचा वरदहस्त असून शिक्षण विभागास या बेकायदेशीर शाळा समिती संदर्भात काही आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आणून दिल्यानंतरही शिक्षण विभागाने त्याची दखल न घेता अद्यापही तसाच कारभार या बेकायदेशीर संस्थेमार्फत चालू ठेवला आहे.

अपीलार्थीने उपस्थित केलेल्या या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना स्पष्टीकरण विचारले असता त्यांनी अद्यापही सदर शाळा पाहिली नसल्याचे व अपीलार्थीने केलेल्या आरोपा संदर्भात त्यांना काही माहिती नसल्याचे सांगितले. अपीलार्थीने केलेल्या आरोपातील गांभीर्य लक्षात घेता सचिव शिक्षण मुंबई यांना असे सुचित करण्यात येते की त्यांनी या संस्थेचे आर्थिक वर्ष २००७-०८ चे अनुदान मुक्त करण्यापुर्वी अपीलार्थीने केलेल्या आरोपाची एका जबाबदार अधिका-यामार्फत चौकशी करुन तदनंतर या संदर्भात निर्णय घ्यावा तसेच या प्रकरणाच्या चौकशीत जे दोषी ठरतील त्यांच्यावर पुढील योग्य ती कारवाई करण्याची व्यवस्था करावी.

या प्रकरणी अपीलार्थीने एकूण १५ मुद्यावर माहिती मागविली होती त्याचा आज सुनावणीमध्ये परामार्श घेतला असता अपीलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जातील ४ मुद्यावर (मुद्दा

क्रमांक १, १२, १३ व १४) अद्यापही माहिती मिळाल्याचे दिसत नाही. सदर माहिती संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध असून अपिलार्थी ही माहिती शाळेच्या मख्याध्यापकाकडून अपेक्षित करावी असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांची बाजू मांडतांना सांगितले व या पृष्ठ्यर्थ त्यांना शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयीन आदेश दाखविले. त्यांनी दाखविलेले आदेश जरी आज प्रचलीत असले तरी अपिलार्थी व सदर शाळेचे मुख्याध्यापक यांच्यातील संबंध लक्षात घेता अपिलार्थी त्यास आवश्यक माहिती मिळेल याची खात्री नसल्याने ही माहिती शिक्षणाधिकारी यांनी संबंधिता कडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस देणे न्याय्य होईल असे आयोगाचे मत आहे. सदर मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज तयार असल्याचे ते आज सुनावणी मध्ये पुढे सांगत आहे तेव्हा असे आदेशित करण्यात येते की जन माहिती अधिकारी यांनी या ४ मुद्यावर संपूर्ण माहिती स्वाक्षांकित करुन अपीलार्थी यांना ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. प्रसंगावशात अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की शिक्षणाधिकारी परभणी यांच्या कार्यालयातील व्यवस्थापन अत्यंत ढिसाळ असून संबंधित लिपीक, अधीक्षक हे कधीही कार्यालयात उपस्थित राहत नाही तसेच त्यांच्याकडे कामासाठी भेटावयास गेल्यानंतर उडवाउडवीची उत्तरे देतात व प्रत्यक्षात कोणतीही माहिती देण्यासाठी नेहमी टाळाटाळ करतात. माहिती अधिकाराची अंमलबजावणी योग्य रितीने व्हावयाची असल्यास तसेच आपला कारभार संपूर्णपणे पारदर्शक ठेवण्याच्या दृष्टीने शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांची ही वर्तणूक निश्चितच आक्षेपार्ह आहे असे म्हणता येईल. यास्तव मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्या कार्यालयातील कर्मचा-याच्या वर्तणुकीची व एकूण कार्यालयीन कामकाजाची यथायोग्य रितीने चौकशी करुन किमान सामान्य नागरिकास त्यांच्या

कार्यालयात चांगली वागणूक मिळून त्यांना आवश्यक असलेली जी माहिती कायद्याने विहित केलेल्या मुदतीत प्राप्त होऊ शकेल अशी व्यवस्था करावी.

या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी या अर्जाची मूळात दखलच दिनांक ३१-०३-२००६ रोजी घेतल्याचे आढळून आले. या विलंबाच्या कारण विचारले असता संबंधित लिपीकाने हा अर्ज विना कारवाई त्याच्याकडे ठेवून दिला होता व जन माहिती अधिकारी यांना तो दिनांक २१-०३-२००६ रोजी प्रथमतः दाखविण्यात आला असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यांचे हे म्हणणे त्यांच्या कार्यालयातील प्रशासन कोणत्या दिशेने चालू आहे व कसे चालू आहे हे तर स्पष्ट करतेच परंतु अपिलार्थीने या कार्यालयाचा कारभार ढिसाळपणे चालू आहे या त्यांच्या म्हणण्यास पुष्टी देते. तेव्हा त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधियिम २००५ च्या तरतुदीव्दारे प्राप्त होणारे अशा प्रकारचे अर्ज तात्काळ हाताळून, संबंधितास विहित मुदतीत आवश्यक असलेली माहिती द्यावी अशा सूचना त्यांना देण्यात येत आहे. त्यांनी या प्रकरणी दाखविलेल्या बेपर्वाईबाबत त्यांना आयोगाकडून ताकीद देण्यात येत आहे. या ताकिदीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी यांनी यथायोग्यरित्या घ्यावी. शिक्षण विभागातील संबंधित लिपीक यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी यांनी योग्य ती प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल ३ महिन्याच्या आत आयोगास पाठवावा असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक २९ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ सौ. नुझहत पिता महेबुब खान, घर क्र. ६८७, विद्यानगर, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद परभणी यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, परभणी यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव शिक्षण मंत्रालय मुंबई यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

८ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७५

निर्णय दिनांक २९-०५-२००७

| | | |
|---|---|---|
| डॉ. आश्रुबा आण्णासाहेब मजमुले,<br>बालाघाट कॉलनी, कॅनॉल रोड, बीड तालुका<br>जिल्हा बीड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा प्रशासकीय अधिकारी जिल्हा रुग्णालय,<br>बीड तालुका जिल्हा बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा<br>रुग्णालय बीड | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी डॉ. आश्रुबा आण्णासाहेब मजमुले गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी जिल्हा रुग्णालय, बीड तालुका जिल्हा बीड डॉ. वशिष्ठ लक्ष्मण जाधव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय बीड डॉ. बी. डी. पवार (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक १८-०५-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

‘‘१. मा. जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय बीड यांनी जा. क्र. जिरुबी/अंनिका/१०१२०-२५ दिनांक २७-०७-२००४ च्या अहवालाची प्रत

२. जा. क्र. संआसे/कक्ष-६३/विलेप/अंनि.बी/२००४ बीड कॅम्प सह संचालक आरोग्य सेवा पुणे यांच्या पथकाच्या दिनांक ०४-११-२००४ च्या पत्राची प्रत.

३. विशेष लेखा परिक्षण पथक पुणे यांनी तपासणी केलेल्या १ ते १७ अर्धसमास पत्राची प्रत व चौकशी अहवालाची प्रत.

४. डॉ. ए. ए. मजमुले यांचे विभागीय चौकशीची सद्यस्थितीची माहिती.

५. डॉ. ए. ए. मजमुले यांचेवर गुन्हा नं. २८१/०४ दिनांक १६-०९-२००४ पोलीस स्टेशन बीड शहर येथे करण्यात आलेल्या कार्यवाही व तपास अहवालाची प्रत व तपासाची सद्यस्थितीची माहिती.’’

अपीलार्थीने जरी अर्जावर दिनांक १८-०५-२००६ अशी तारीख दाखविली असली तरी सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २२-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येतो. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक ०१-०६-२००६ रोजी त्यांच्या पत्रान्वये सदर माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये ४८ शासकीय तिजोरीत भरण्याविषयी सुचित केले व त्याच बरोबर पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन गेवराई यांना अपीलार्थीने मागणी केलेल्या फौजदारी कारवाई

संदर्भातील माहिती अपीलार्थीस देण्याचे सुचित केले व उप संचालक आरोग्य सेवा यांच्याकडे अपीलार्थी यांच्या विभागीय चौकशीच्या सद्यस्थिती विषयक विचारणा केली होती.

तदनंतर अपीलार्थीने दिनांक ०५-०६-२००६ रोजी आवश्यक ते शुल्क रुपये ४८ इतके जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे पावती क्रमांक ८०१०८६० व्दारे रोजी भरले.

तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १६-०६-२००७ रोजी पुरविली. तथापि जन माहिती अधिका-याच्या या कारवाईवर अपीलार्थीचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ०४-०७-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार प्रथम अपील करुन त्यामध्ये जन माहिती अधिका-यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची विनंती केली होती.

अपीलार्थीच्या या प्रथम अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०७-२००६ रोजी सुनावणी घेतली असल्याचे त्यांनी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. सदर सुनावणीस अपीलार्थीस बोलाविले होते किंवा नाही यासंबंधी काहीही माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. सदर सुनावणी तपशीलामध्ये त्यांनी कोणत्याही प्रकारचा ठोस निर्णय दिला नाही तथापि अपीलार्थीने त्यांच्याकडे अपीलामध्ये केलेल्या माहितीवर त्यांचे अभिप्राय नमूद केले आहेत.

जन अपीलीय अधिकारी यांनी अपील ज्या पध्दतीने अंतीम केले ती पध्दत सदोष असल्याचे आयोगास आढळून आले. अपील सुनावणीसाठी दोन्ही पक्षकारांस बोलावणे अनिवार्य आहे. दोन्ही पक्षकार बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर, अपिलीय

अधिका-याने निर्णय देणे अभिप्रेत आहे तथापि जन अपीलीय अधिकारी यांनी तसे केल्याचे आढळून येत नाही.

जन अपीलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर समाधान न झाल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये अपीलार्थीने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये या प्रकरणाची पार्श्वभुमी समजावून घेतली असता असे आढळून आले की अपीलार्थी मजमुले हे डॉक्टर असून ते जिल्हा रुग्णालय बीड येथे (वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ या पदावर) दिनांक ०७-०७-२००० ते ०३-१२-२००३ या काळात कार्यरत होते. ते जिल्हा बीड येथे शासकीय रुग्णालयामध्ये जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (जिल्हा अंधत्व निवारण समिती) या पदावर कार्यरत होते. जिल्हा अंधत्व समितीचे पदसिध्द अध्यक्ष जिल्हाधिकारी बीड असून अपीलार्थीने आपले कर्तव्य पार पाडतांना कर्तव्यात कसूर केल्याचे आढळल्या वरुन अध्यक्ष जिल्हा अंधत्व निवारण समिती यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांना अपिलार्थीवर कारवाई करण्यास सुचविले होते. तथापि मध्यंतरीच्या काळात अपीलार्थीची बदली गेवराई उप जिल्हा रुग्णालय येथे झाली. अपिलार्थी गेवराई येथे रुजू झाल्यानंतर वैद्यकीय अधीक्षक गेवराई यांनी जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांच्या सुचनेवरुन अपीलार्थी यांच्याविरुध्द ते बीड येथे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक या पदावर कार्यरत असतांना त्यांचे हातून घडलेल्या प्रमादासंदर्भात पोलीसात फिर्याद दाखल केली. याच बरोबर जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांनी अपीलार्थी वर विभागीय चौकशीची कारवाई करण्याचे उप संचालक आरोग्य सेवा यांचेकडे त्यांच्याकडील दिनांक १८-०६-२००६ अन्वये प्रस्तावित केले.

यानंतर शासनाने अपीलार्थीस शासन आदेश क्रमांक विभाचौ-१२०४/प्र.क्र.८८/सेवा-०४ सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक ०२ सप्टेंबर २००४ अन्वये सेवेतून निलंबीत केले असून अद्यापही त्यांची पुर्नस्थापना झालेली नाही. त्यांची पुर्नस्थापना होण्याप्रित्यर्थ त्यांना काही माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे व हे सर्व प्रकरण त्यासंदर्भातील आहे.

अपीलार्थीने मागितलेल्या ५ मुद्यावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ व ३ वरील माहिती अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०६-२००६ रोजी पुरविल्याचे त्यांनी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपीलार्थीने विचारलेला मुद्दा क्रमांक २ ची माहिती जन माहिती अधिकारी अपीलार्थीस देऊ शकले नाहीत कारण अपीलार्थीने संदर्भीय केलेल्या पत्राच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत असे त्यांनी सांगितले. उर्वरीत २ मुद्दे म्हणजे अपीलार्थीच्या विभागीय चौकशीची सद्यस्थिती व अपीलार्थी यांच्यावर दाखल झालेला गुन्हा क्रमांक २८१/२००४ दिनांक १६-०९-२००४ पोलीस स्टेशन बीड संदर्भात पोलीस निरिक्षकातर्फे करण्यात आलेली कारवाई व तपास अहवालाची प्रत हे होत. या २ मुद्यासंदर्भातील माहिती अपीलार्थी यांना दिनांक २९-०८-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः हस्तांतरीत करण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

अपीलार्थीस मिळालेल्या माहितीचे अवलोकन करता अपीलार्थीने केलेल्या मुद्दा क्रमांक ३ चे परिक्षण पथक यांच्या चौकशी अहवालाची प्रत अद्यापही अपीलार्थीस मिळणे बाकी असल्याचे दिसून येते. सदर चौकशी अहवाल आरोग्य सह संचालक यांच्याकडून अद्यापही अप्राप्त असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर सुनावणीमध्ये स्पष्ट केले. आरोग्य सह संचालक यांच्या पथकाने नोव्हेंबर २००४ रोजी अपिलार्थी यांचेकडील अर्थ विषयक व्यवहाराची व तत्संबंधी हिशोबाची पाहणी करुन अहवाल तयार केला तथापि त्यातील निष्कर्ष काय काढले याची उत्तरे अद्यापी अप्राप्त आहेत. या प्रकारास आज आडीच

वर्षे होऊनही त्यास विलंब का लागला त्याची कारणे माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही सांगू शकत नाहीत. तेव्हा या प्रकरणी सचिव (आरोग्य) यांनी वैयक्तीक लक्ष घालून या प्रकरणातील अंतीम कारवाई २ महिन्यात करणे उचित ठरेल असे आयोगाचे मत आहे. त्याप्रमाणे त्यांनी कारवाई करुन आपला अहवाल आयोगास सादर करावा.

अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिनांक १६-०६-२००६, १३-०७-२००६ या २ दिवशी पुरविण्यात आलेली आहे व जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही ती माहिती ते देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडे उपलब्ध असलेली माहिती विहित कालावधीत अपीलार्थीस पुरविली आहे त्याच बरोबर जी माहिती उप संचालक आरोग्य सेवा व पोलीस स्टेशन यांच्याकडे उपलब्ध आहे ती त्यांनी प्राप्त करुन अपीलार्थीस पुरविली आहे ही माहिती वेगवेगळ्या प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घ्यावयाची असल्यामुळे ती प्राप्त करुन घेण्यासाठी व नंतर अपीलार्थीस देण्यासाठी जो विलंब लागला तो क्षम्य आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणत्याही असद्‌हेतुने ही माहिती देण्यासाठी विलंब लावल्याचे त्यांनी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रा वरुन दिसून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) नुसार कारवाई करण्या संदर्भात काहीही आदेश नाही. सबब अपीलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळून लावण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९ मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ डॉ. आश्रुबा आण्णासाहेब मजमुले, बालाघाट कॉलनी, कॅनॉल रोड, बीड तालुका जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी जिल्हा रुग्णालय, बीड तालुका जिल्हा बीड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय बीड यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव आरोग्य सेवा मंत्रालय मुंबई यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १७८/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक २९ मे, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बलराज भागाजी जाधव<br>मुख्य संपादक, जालना रोड,<br>हॉटेल अमरप्रितच्या मागे,<br>औरंगाबाद. ४३१ ००१. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग फुलंब्री, ता.फुलंब्री जिल्हा- औरंगाबाद. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद. | .. | |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २९ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.बलराज भागाजी जाधव (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) , जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग फुलंब्री, श्री.ओ.जी.चिंचोलीकर (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी

अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.पी.के.पाटील ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम दिनांक- १३-०२-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे रोहयो अंतर्गत रस्त्याच्या कामावरील मजुरांचे हजेरी पुस्तक व अंदाजपत्रकाच्या छायांकित प्रतीची मागणी केली होती. संबंधीत माहितीचा कालावधी जुलै, २००५ हा महिना असून अपिलार्थीनी माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती. अपिलार्थीना या रस्त्यांच्या कामा संदर्भात मस्टरच्या प्रती व अंदाजपत्रकांच्या प्रती मागविल्या होत्या. त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| “चित्तेपिंपळगाव | .. | चित्तेपिंपळगाव ते बेबडयाची वाडी |
| खोडेगाव | .. | खोडेगाव ते कायगाव |
| | | तोलानाईक तांडा ते कुट्टी तांडा भाग-२ |
| | | लिंगदरी तांडा नं.५ |
| पिंपरी | | दरकवाडी ते टाकळी |
| कोळघर | | कोळघर ते एकतूनी |
| | | लाडकवाडी ते जोडवाडी भाग-१” |

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस विहीत मुदतीत न मिळाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक २१-०३-२००६ रोजी प्रथम अपिल केले.

या अपिलाची सुनावणी जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- १७-०४-२००६ रोजी घेतली . या सुनावणीमध्ये जनअपिलिय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना या रस्त्याच्या कामांची माहिती देण्याचे सूचित केले. जनअपिलिय अधिकारी यांनी ज्या पध्दतीने सुनावणी घेतल्याची कागदपत्रे आयोगास सादर केली आहेत. ती पहाता, सुनावणी कशी असू नये, याचा हा उत्तम नमूना आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहीत कलमांच्या तरतुदीच्या अंमलबजावणी बाबत सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिका-यांना किमान आवश्यक ज्ञान सुध्दा अद्यापही प्राप्त झाले नसल्याचे यावरुन दिसून येते. याची सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी गांर्भीयाने नोंद घेवून त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अधिकारी यांच्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीच्या संदर्भात कार्यशाळा/ प्रशिक्षण शिबीरे आयोजित करावीत, असे त्यांना सूचीत करण्यात येत आहे. यापूर्वीही सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई  यांना अशा प्रकारच्या सूचना वेळोवेळी देवूनही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या क्षेत्रीय अधिका-यांना या संदर्भात कोणतीही जाणीव नसल्याचे आढळून आले आहे. ही बाब निश्चीतच गंभीरस्वरुपाची आहे.

जनअपिलिय अधिकारी यांच्या निर्णवर माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांचा दिनांक- १०-०७-२००६ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. या अर्जामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) अन्वये कार्यवाही करण्याचे सूचित केले आहे. या अर्जावर वीस रुपयाचे कोर्टफी स्टॅम्प चिटकविलेले नाही. तसेच सदर अर्ज विहीत नमुन्यात नाही. शासनाने  आरटीआय-२००५/ सीआर.३१५/०५/५, दिनांक- ११-१०-२००५ च्या अधिसूचनेव्दारे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम १९ (३) अन्वये दाखल करण्यासाठी पध्दत व प्रपत्र निश्चीत केले आहे व त्यावर २० रुपये किंमतीचे कोर्ट तिकिट जोडणे अनिवार्य केले आहे हे पाहता या अपिलाची सुनावणी कलम १९ (३)खाली घेण्यात अर्थ नाही. अपिलार्थीने या प्राथमिक प्रक्रिया देखिल पूर्ण केल्या नसल्याने अपिलार्थीचे हे अपिल फेटाळण्यात येत आहे. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने हा अर्ज आता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) खाली दाखल करुन घेण्यात येत आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने १)चित्तेपिंपळगाव ते बेबडयाची वाडी २) खोडेगाव ते कायगाव या कामांची हजेरीपुस्तके व सात कामांची अंदाजपत्रके मिळाली नसल्याचे म्हटले आहे व त्याच बरोबर अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) अन्वये कार्यवाही करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सदर माहिती अपिलार्थीस मिळाल्याप्रित्यर्थ अपिलार्थी यांची पोंच असलेली दिनांक- ०५-०५-२००६ चे एक पत्र दाखविले. सदर पत्र अपिलार्थी यांना मिळाले असल्याचे अपिलार्थी आज झालेल्या सुनावणीमध्ये कबुल करीत आहेत.

अपिलार्थीने ज्या दोन रस्त्यांच्या कामांच्या संदर्भात माहिती मिळविण्यासाठी, राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केली आहे, ते रस्ते मंजूर नाहीत. असे

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे स्पष्ट केले व तशा आशयाचे शपथपत्र आयोगाकडे सुनावणीच्या वेळी सादर केले.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असेहि दिसून आले की, अपिलार्थीस इतर रस्त्यांच्या कामांच्या अंदाजपत्रकांच्या छायांकितप्रती अद्यापही देण्यात आलेल्या नाहीत. दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकला असता, जनमाहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या सर्व रस्त्यांच्या कामांच्या उपलब्ध अंदाजपत्रकांच्या छायांकितप्रती अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत पुरवाव्यात. सबब खालीलप्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपिल फेटाळण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या सर्व रस्त्यांच्या कामांच्या अंदाजपत्रकांच्या छायांकितप्रती त्यांना तीन दिवसाच्या आत पुरवाव्यात.

३. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई यांनी सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व क्षेत्रीय अधिका-यांची माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी प्रशिक्षण कार्यशाळा/ शिबीरे आयोजित करावीत.

औरंगाबाद<br>
दिनांक २९ मे,२००७

**(वि. बा. बोरगे)**<br>
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.बलराज भागाजी जाधव, मुख्य संपादक, जालना रोड,हॉटेल अमरप्रितच्या मागे, औरंगाबाद. ४३१ ००१.

२ जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फुलंब्री यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी वरील अभिप्रायाची नोंद घेवून अनुपालन अहवाल शक्य तितक्या लवकर आयोगास सादर करावा.

५ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १७९/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २९ मे, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.चंद्रकांत माणिकराव सोनटक्के<br>ए-२०२, तुलशी आर्केड कनॉट प्लेस<br>टाऊन सेंटर सिडको, औरंगाबाद. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग (परिवहन) मंत्रालय, मुंबई-३२. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा उपसचिव, गृह विभाग (परिवहन) मंत्रालय, मुंबई-३२ | .. | |

## <u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २९ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.चंद्रकात माणिकराव सोनटक्के (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) , जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग (परिवहन) मंत्रालय, मुंबई ,श्री. दत्तात्रय बोदाडे (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा उपसचिव, गृह विभाग (परिवहन)मंत्रालय, मुंबई ,श्री.रवी शिंदे, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

सुनावणीच्या सुरवातीसच अपिलार्थी यांनी त्यांचे दिनांक- ०४-०३-२००६ रोजी केलेल्या माहितीच्या अर्जातील माहिती त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने या बाबत माझे पूर्ण समाधान झाले आहे व मी आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मागे घेत आहे, असे वीस रुपये कोर्ट फि स्टॅम्प चिटकविलेल्या शपथपत्रावर लिहून दिले आहे. या शपथपत्रामध्ये अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मागे घेण्याची परवानगी मागितलेली असून अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्यामूळे अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपिल मागे घेण्याची परवानगी देण्यात येत आहे. तव्दतच जरी अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मागे घेतले असले तरी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक- १४-०७-२००६ रोजी पुरविण्यात आली. अपिलार्थीने ही माहिती पुरविण्यापोटी २४/- रुपये इतके शुल्क शासकीय कोषागारात जमा केले आहे. तथापि हे शुल्क जमा केल्याचे जनमाहिती अधिकारी यांना दिनांक- १२-०६-२००६ रोजी कळविण्यात आले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वास्तविकतः त्यांना ११-०७-२००६ अगर तत्पूर्वी देणे भाग होते. तथापि सदर माहिती तीन दिवसाच्या विलंबाने अपिलार्थीस दिली गेली असल्याने अपिलार्थीने शासकिय तिजोरीत ही माहिती देण्यापोटी येणारा खर्च म्हणून जमा केलेली रक्कम रुपये २४/- तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस परत देण्यात यावी, असे आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीचे मूळ अपिल त्यांची विनंती लक्षात घेता खारीज करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपिल खारीज करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याने, सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी शासकिय तिजोरीत जमा केलेली एकूण रक्कम रुपये २४/- तीस दिवसाच्या आत परत करावी व आयोगास अहवाल सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २९ मे,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.चंद्रकांत माणिकराव सोनटक्के, ए-२०२, तुलशी आर्केड कनॉट प्लेस टाऊन सेंटर सिडको, औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग (परिवहन) मंत्रालय, मुंबई-३२, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा उपसचिव, गृह विभाग (परिवहन) मंत्रालय, मुंबई-३२, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १४९/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक ३० मे, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सारुक आश्रूबा भाऊराव<br>प्रयाग निवास, एस.टी. बस आगार शेजारी, परळी रोड, अंबाजोगाई, जिल्हा-बीड. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, बीड, जि.बीड. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, बीड. | .. | |

## <u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ३० मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.सारुक आश्रूबा भाऊराव (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) गैरहजर आहेत, तर जनमाहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, बीड, श्री.मोहन बालचंद कट्टे (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड, श्री. भगवान नारायण गुट्टे ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- १७-०२-२००६ रोजी एकूण नऊ मुद्यावरती काही माहिती मागविली होती.

या नऊ मुद्या पैकी एकूण पाच मुद्दे क्रमांक- १,३,६,७ व ९ हे मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपाचे असून उर्वरित ४ मुद्याव्दारे त्यांनी काही कागदपत्रांच्या प्राप्तीची मागणी केली आहे. अपिलार्थीने ही माहिती पोष्टाव्दारे अपेक्षिली असून त्यांच्या माहितीच्या अर्जावर अपिलार्थीस कोणत्या कालावधीतील माहिती हवी आहे, याचा स्पष्ट उल्लेख केल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थीच्या या माहितीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्या वतीने अपिलार्थीस त्यांचेकडील पत्र दिनंक- १९-०२-२००६ रोजी उत्तर दिले आहे. या उत्तरामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, "आपण नायब तहसीलदार या पदावर कार्यरत असून या कार्यालयाच्या अधिनस्त कर्मचारी आहात. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ नूसार कर्मचारी संपूर्ण काळासाठी खात्याचा नोकर आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये शासकिय कर्मचा-यास आपल्या वरिष्ठ अधिकारी यांचेकडून माहिती मागविण्याचा अधिकार नमूद केला नाही व तसेच प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देणेस नमूद नाही." असे कळविले आहे.

जनमाहिती अधिकारी यांची, अपिलार्थी संपूर्ण काळासाठी खात्याचा नोकर आहे, ही संकल्पना कोणत्या नियमाच्या आधारे विचारात घेतली, असे विचारले असता त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम ३४

आयोगास दाखविला. या सेवानियमातील कलम ३४ हे काळजीपूर्वक पाहिले असता त्यामध्ये शासकिय कर्मचा-याचा संर्पूण वेळ शासनाच्या सेवेसाठी असतो, असे म्हटले आहे. **यामध्ये कुठेहि शासकिय कर्मचारी हे शासनाच्या संपूर्ण काळासाठी नोकर असल्याचे म्हटले नाही.** याच बरोबर माहितीचा अधिकार अधिनियमा अन्वये माहिती मागविण्यासाठी, हा अधिनियम कोणत्याही भारतीय नागरीकास वापरण्याची स्पष्ट तरतूद माहिती अधिकार कायदा २००५ मधील अधिनियमातील कलम ३ मध्ये करण्यात आलेली असल्यामूळे जनमाहिती अधिकारी यांचे, कोणत्याही शासकिय कर्मचा-यास, त्यांच्या वरिष्ठाकडे माहिती मागविता येत नाही, हे गृहितक चुकीच्या समजूतीवर आधरले आहे, हे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलमाच्या तरतुदीची किमान आवश्यक ती माहिती नाही, असे यातून स्पष्ट होते. सदर पत्र जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित झाले आहे, हे पाहता जिल्हा प्रशासनाच्या या कायद्यातील तरतुदीच्या ज्ञानाची पातळी स्पष्ट होते.

जनमाहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी जनअपिलिय अधिकारी यांचेकडे दिनांक- २८-०३-२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर अपिल करण्याचे कारण जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अप्राप्त असे दर्शविले आहे. या अपिलावर जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- ११-०४-२००६ रोजी सुनावणी घेवून अपिलार्थीचे अपिल मंजूर केले व जनमाहिती अधिका-यास अपिलार्थीने मागितलेली वरील नऊ मुद्यावरील माहिती ही कोणाचेही नुकसान होणार नाही, याची खात्री करुन, अपिलार्थीस विनामुल्य देण्याचे सूचित केले.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती पुरेसा कालावधी व्यतीत होऊनही प्राप्त न झाल्यामूळे व्यथीत होवून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०७-०४-२००६ रोजी व्दितीय अपिल केले आहे.

या अपिलामध्ये " अपिलार्थीचे अपिल मंजूर करुनही त्यांना माहिती मिळाली नाही व मिळणार नाही." अशी अपिलार्थी यांची खात्री असल्याचे कारण त्यांनी दर्शविले आहे.

अपिलार्थीने व्दितीय अपिलामध्ये जरी मागणीची माहिती सरळपणे केली नसली तरी त्यांनी व्दितीय अपिलामध्ये जागोजागी केलेल्या विधानावरुन त्यांनी मूळ अर्जाव्दारे केलेली माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, सदर कर्मचारी हे महसूल विभागामध्ये सध्या नायब तहसीलदार या पदावर कार्यरत असून व सध्या त्यांना सेवतून निलंबीत कण्यात आले आहे. अपिलार्थी हे तहसील केज येथे अव्वलकारकून या पदावर प्रथमतः कार्यरत होते. तद्नंतर अपिलार्थीची पदोन्नतीवर नायब तहसीलदार या पदावर नांदेड येथे नेमणूक करण्यात आली. अपिलार्थी यांनी केज येथील त्यांच्या पदाचा कार्यभार सोडतांना त्यांनी बीड येथील त्यांच्या संबंधित कार्यालयाकडून त्यांच्या मूळ सेवापुस्तिकेची प्रत स्वतःकडे घेतली होती व सदर सेवापुस्तिकेची मूळप्रत अपिलार्थी

यांच्या हातून  नंतर गहाळ झाली आहे. अपिलार्थीची मूळसेवापुस्तिका त्यांचे हातून गहाळ झाल्या संदर्भात  अपिलार्थीने जिल्हाधिकारी, बीड यांचे कार्यालयाकडे दिनांक- ०८-०७-२००२ रोजीच्या पत्रा अन्वये कळविले आहे व तव्दतच त्यांनी अहमदपूर पोलीसस्टेशन येथे त्याप्रमाणे तक्रार देखिल दाखल केली आहे. सदर तक्रार  स्टेशन डायरी नंबर ३४८/०१, दिनांक-  १३-१२-२००१, अशी नोंदविलेली आहे. सदर मूळसेवापुस्तिका हरविल्यामूळे व आता ती कोणत्याच कार्यालयात उपलब्ध नसल्यामूळे अपिलार्थीस वेतननिश्चीती, वेतनवाढ व रजेचा हिशोब ठेवणे, इत्यादी कामे पार पाडता येत नाही व व्दितीय सेवापुस्तिका तयार करण्याकरिता ही सर्व माहिती अपिलार्थी यांना हवी असल्याचे त्यांनी जिल्हाधिकारी,बीड यांना वर उल्लेखिलेल्या पत्रावरुन दिसून येते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या एकूण नऊ मुद्यावरती, जरी अपिलार्थीने मुख्यत्वेकरुन प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असली तरीही  अपिलार्थीचे समाधान होईल, अशा पध्दतीने दिनंक २५-०४-२००७ रोजी दिली आहे. सदर माहितीचे अवलोकन करता, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या पत्रावरुन अपिलार्थीस त्यांची व्दितीय सेवापुस्तिका तयार करण्यास जिल्हाधिकारी कार्यालयाने सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे व त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती दिल्याचे दिसून येते.

या प्रकरणी अपिलार्थी यांच्या प्रती सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवून अपिलार्थीस व्दितीय सेवापुस्तिका ९० दिवसात अद्यावत पूर्णपणे करुन द्यावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. असे जिल्हाधिकारी, बीड यांना सूचीत करण्यात येत आहे.

या प्रकरणा संदर्भात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी दिनांक- १०-०५-२००६ रोजी एक अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्यावर दबाव टाकून दिनांक- ३०-०४-२००७ रोजी जबरदस्तीने अपिल परत घेण्या संदर्भात अर्ज लिहून घेतला आहे, असे आयोगास अपिलार्थी यांनी कळविले आहे. तथापि आजच्या सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी यांना हया संदर्भात पृच्छा केली असता, अशा प्रकारे कोणताही अर्ज अपिलार्थी यांच्यावर दबाव टाकून लिहून घेतला नाही, असे सुनावणीमध्ये स्पष्ट करुन तशा आशयाचे शपथपत्र आयोगस सादर केले आहे. तव्दतच अपिलार्थी यांना माहे जानेवारी, २००७ पासून अपिलार्थीच्या हातून निवडणूक कामासंदर्भात घडलेल्या प्रमादाबद्दल अपिलार्थीस सेवेतून निलंबीत केलेले आहे, अशीहि जनमाहिती अधिकारी यांनी अतिरीक्त माहिती आयोगास दिली आहे.

अपिलार्थीने मागितलेली माहिती वेगवेगळया नस्तीवरुन उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यामूळे व अपिलार्थीचा सेवाविषयक तपशील हा अपिलार्थीनी वेगवेगळया कार्यालयात सेवा केली असल्यामूळे, जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सहज उपलब्ध नसल्यामूळे ही माहिती देण्यास जनमाहिती अधिकारी यांच्या हातून विलंब झालेला आहे. असे जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये सांगितले. आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी हेतुपुरःस्सर उशिर केल्याचे दिसून येत नाही. तथापि ही माहिती अपिलार्थीस विलंबाने देण्यास त्यांच्या कार्यालयातील जे कर्मचारी जबाबदार असतील त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा १९८१ (शिस्त व अपिल) नियमातील

तरतुदी प्रमाणे योग्यती प्रशासकीय कार्यवाही करुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचा अनुपालन अहवाल आयोगास ६० दिवसाच्या आत सादर करावा, असे आता आदेशीत करण्यात येत आहे व वरील विवेंचनासह अपील निकाली काढण्यात येत आहे सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ३० मे,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.सारुक आश्रूबा भाऊराव, प्रयाग निवास, एस.टी. बस आगार शेजारी, परळी रोड, अंबाजोगाई, जिल्हा-बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५०

निर्णय दिनांक ३०-०५-२००७

श्री. सरदार हरजितसिंग तिरतसिंग सहानी, : अपीलार्थी

५-१-५५/१, उस्मानपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तहसीलदार, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. सरदार हरजितसिंग तिरतसिंग सहानी (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद श्रीमती अपर्णा सोमाणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी औरंगाबाद हे या सुनावणीस बोलावुनही अनुपस्थित राहिल्याची सखेद नोंद आयोगाने घेतली असून त्यांना आयोगाच्या सुनावणीचे, ज्यावेळी निमंत्रण येईल त्यावेळी न चुकता हजर राहण्याची सूचना

महसूल आयुक्त यांनी त्यांना द्यावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे. यापुढे माहिती आयोगाने बोलावूनही जर ते हजर राहिले नाहीत तर त्यांना कडक कारवाईस सामोरे जावे लागेल याचीही कल्पना महसूल आयुक्तांनी त्यांना द्यावी.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थीने दिनांक १७-०४-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्व्हे नंबर २२/२ पद्‌मपुरा औरंगाबाद या भुखंडाचे सन १९७० ते १९८३ पर्यतच्या ७/१२ च्या उता-याच्या प्रती मागविल्या आहेत. सदर माहिती त्यांनी व्यक्तीशः अपेक्षिली आहे.

यावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०५-२००६ रोजी अपीलार्थीस काही सर्व्हे नंबरचे त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या ७/१२ चे उतारे अपीलार्थीस पाठवून दिले. तथापि त्यामध्ये सर्व्हे नंबर २२/२ या सर्व्हे नंबरची १९६० पासून ते १९७० पर्यत नोंद आहे असे अपीलार्थीस कळविले आहे म्हणजेच अपीलार्थीस सर्व्हे नंबर २२/२ चे १९६९ ते १९८३ पर्यतचे या कालावधीतील उतारे दिलेले नाहीत.जन माहिती अधिकारी यांच्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थीने दिनांक २२-०५-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक नसलेली माहिती दिली असल्याचे नमूद करुन सर्व्हे नंबर २२/२ पद्‌मपुरा या त्यांच्या मालमत्तेच्या संदर्भातील असलेली माहिती नष्ट केल्याचे आरोप केले असून अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे माहिती न दिल्याचे नमूद करुन त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) नुसार कारवाई करण्या ची विनंती केली आहे.

अपीलार्थीने केलेल्या या प्रथम अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी या अपीलाची दिनांक ३०-०५-२००६ व १२-०६-२००६ या दोन दिवशी सुनावणी घेतली. या सुनावणी मध्ये जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस आवश्यक ती माहिती तात्काळ पुरवून या संबंधीची पोहोच अपिलार्थीकडून घ्यावी अशा सूचना संबंधित जन माहिती अधिकारी यांना दिल्या. जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने देखील आवश्यक ती माहिती मिळाली नाही त्यामुळे अपीलार्थीने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगा कडे दिनांक ०३-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मुळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्या वर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी औरंगाबाद येथील पद्मपुरा सर्व्हे नंबर २२/२ चे ७/१२ चे उतारे त्यांच्याकडे १९६९ सालपर्यतचे उपलब्ध असून १९६९ नंतरचे या सर्व्हे नंबरचे उतारे त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत व त्याबरोबर अभिलेख कक्षात या सर्व्हे नंबर २२/२ च्या उता-या संदर्भात या कालावधीतील कोणतीही नोंद उपलब्ध नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. संबंधित तलाठी कार्यालयाची वार्षिक तपासणी करतांना हा मुद्दा त्यांच्या कसा लक्षात आला नाही हे विचारले असता हे प्रकरण जुने आहे असे त्यांनी सांगून उत्तर देण्याचे टाळले. त्यांनी आयोगापुढे सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की महसूल विभागामध्ये असलेल्या ७/१२ उतारे एकत्रितपणे ठेवण्याची पध्दत आस्तित्वात नसावी. यापुढे जन माहिती अधिकारी यांना असे सुचित करण्यात येते की त्यांनी पद्मपुरा येथील सर्व्हे नंबर २२/२ च्या आज रोजीचा ७/१२ उता-याप्रमाणे नव्याने उतारा तयार करावा

व त्याची तुलना १९६९ च्या उपलब्ध उता-याशी करुन त्यामधील फरकाचा ताळमेळ घालावा. व अपीलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती ३० दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

या प्रकरणाची पार्श्वभुमी लक्षात घेतली असता अपीलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की त्यांची औरंगाबाद येथे बरीच स्थावर मालमत्ता असून या मालमत्तेचे महसूल खात्याच्या काही अधिका-याच्या संगनमताने परस्पर खरेदी विक्रीचे व्यवहार झाले असून या संदर्भात त्यांनी कोर्टात दावा / गुन्हा दाखल केला आहे. औरंगाबाद सारख्या शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या भुखंडाची गेल्या ३७ वर्षे नोंद नसणे हे महसूल खात्यास निश्चितच भुषणावह नाही असे आयोगाचे मत आहे. असेच प्रकार इतर ब-याच सर्व्हे नंबर संदर्भात झाले असल्याचे अपिलार्थी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. या प्रकरणाचे गांर्भीय लक्षात घेता या प्रकरणी सचिव महसूल यांनी वैयक्तीक लक्ष घालून अशा प्रकारची आणखी किती प्रकरणे त्यांच्या अधिपत्याखालील कार्य क्षेत्रात असतील याचा शोध घेणे जरुरीचे आहे असे आयोगाचे मत झाले आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वर्तनाव्दारे, शासकीय कर्तव्ये पार पाडत असतांना कर्तव्यपरायणतेचा अभाव दर्शविला आहे. तेव्हा या प्रकरणात सचिव (महसूल) यांनी स्वतः लक्ष घालून अपीलार्थीस हवी असलेली माहिती उपलब्ध न होण्यास आजपर्यंत जे अधिकारी व कर्मचारी जबाबदार आहेत त्यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कारवाई करुन आयोगास आपला अहवाल ४ महिन्याच्या आत सादर करावा तसेच अपीलार्थीने मागणी केलेली माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यासदंर्भात सकारात्मक कारवाई करावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती ३० दिवसाच्या आत पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३० मे २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सरदार हरजितसिंग तिरतसिंग सहानी, ५-१-५५/१, उस्मानपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी औरंगाबाद यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय महसूल आयुक्त औरंगाबाद यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव महसूल विभाग मंत्रालय मुंबई – ३२ यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

८ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४३

निर्णय दिनांक ३१-०५-२००७

श्री. नहुषकुमार शामराव सेलूकर, : अपीलार्थी
सेलुकर वाडा, देशपांडे गल्ली, अंबाजोगाई
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप प्राचार्य योगेश्वरी महाविद्यालय,
अंबाजोगाई जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्राचार्य योगेश्वरी महाविद्यालय,
अंबाजोगाई जिल्हा बीड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. नहुषकुमार शामराव सेलुकर, अंबाजोगाई (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई जिल्हा बीड सौ. के. जे. देशपांडे (यापुढे त्यांना जन

माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई जिल्हा बीड श्री. डी. एच. थोरात (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी प्रथमतः अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०२-२००६ रोजी सदर संस्थेतील शिक्षक श्री. डी. बी. खेडगीकर यांच्या संदर्भात एकूण ७ मुद्यावर माहिती मागविली होती.

अपीलार्थी यांनी मागविलेल्या माहितीचे स्वरुप पाहता त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे सहज उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या प्रतीची मागणी केल्याचे दिसून येते. या ७ मुद्यापैकी एक मुद्दा हा श्री. डी. बी. खेडगीकर यांच्या सेवापुस्तिकेची प्रत मिळण्या संदर्भातील आहे. सदर माहिती अपीलार्थी यांनी व्यक्तीशः अपेक्षिली आहे.

अपीलार्थी यांच्या वरील माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०३-२००६ रोजी उत्तर दिले. हे उत्तर देत असतांना महाराष्ट्र माहिती अधिकार कायदा २००३ मधील कलम ७ (F) नुसार Information pertaining to service record of a person अपीलार्थीस ही माहिती देता येऊ शकत नसल्याचे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तरावर समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपीलार्थीच्या या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपीलार्थीस दिनांक १५-०५-२००६ रोजी पत्राव्दारे अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (जे) मधील तरतुदीस अनुसरुन देण्याचे नाकारले.

जन अपीलीय अधिकारी यांच्या या उत्तरावर समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगा कडे दिनांक २९-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की त्यांनी आतापर्यत अपीलार्थीस हव्या असलेल्या माहितीच्या ७ मुद्यावरील माहितीपैकी एकूण ६ मुद्दयाची माहिती दिनांक १०-०३-२००६ रोजी पुरविली आहे व फक्त श्री. खेडगीकर यांच्या सेवा पुस्तिकेची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली नाही कारण ही सेवा पुस्तिकेची प्रत ही श्री. खेडगीकर यांची वैयक्तीक बाब असल्याचे व ते दिल्याने त्यांच्या वैयक्तीक स्वातंत्र्य अतिक्रमित होत असल्याचे वाटल्यावरुन जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपीलार्थीस दिली नाही तथापि सेवा पुस्तिकेमध्ये संबंधित व्यक्ती च्या सर्व सेवा तपशीलाचे म्हणजे सुरुवातीची नेमणूक, त्यांना वेळोवेळी असलेला पगार, त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या रजा, त्यांना वेळोवेळी प्राप्त झालेली बक्षिसे, त्यांच्यावर वेळोवेळी करण्यात आलेली कारवाई इत्यादीचा तपशील एकत्रितपणे ठेवलेला असतो. या तपशीलाचे वेळोवेळी आदेश काढत असतांना त्याच्या प्रती इतर संबंधित विविध कार्यालयाकडे / कार्यासनाकडे देखील उपलब्ध असतात व त्याचे फक्त एकत्रिकरण सेवा पुस्तकात केलेले असते. त्यामध्ये कोणत्याही व्यक्तीची स्वतःची अशी कोणतीही खाजगी माहिती असू शकत नाही व यामध्ये

अपिलार्थीचे वैयक्तीक स्वातंत्र्य अतिक्रमित होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. आयोगाकडे वेळोवेळी प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या अपिलांवर, आयोगाने हीच भुमिका कायम ठेऊन संबंधितांच्या सेवा पुस्तिकेच्या प्रती अपीलार्थीस देण्याचे निर्णय दिले गेले आहेत. या पार्श्वभुमीवर जन माहिती यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी श्री. खेडगीकर यांच्या सेवापुस्तिकेच्या सत्यप्रती साक्षांकीत करुन अपीलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

आता अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०३-२००६ रोजी दिलेली माहिती अपूर्ण आहे व दिलेल्या कथित माहितीमध्ये मुद्दा क्रमांक ३ मधील पत्र क्रमांक ३९५ दिनांक २३-०१-२००६ च्या पत्राची प्रत सोबत जोडली असल्याचे जरी म्हटले असले तरी ही प्रत त्या माहितीसोबत नाही. सदर माहिती पूर्ण करण्या -प्रित्यर्थ अपीलार्थी यांनी त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये ज्या कागदपत्राची मागणी केली आहे व अद्यापही जी कथित कागदपत्रे अपीलार्थीस मिळाली नाहीत त्या इतर सर्व कागदपत्रां च्या स्वाक्षांकित प्रती अपीलार्थीस ७ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्याव्यात असेही पुढे आदेशित करुन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलार्थी यांना, अद्याप जी कागदपत्रे मिळाली नाहीत त्या कागदपत्रांच्या स्वाक्षांकित सत्यप्रती, जन माहिती अधिकारी यांनी ७ दिवसाच्या आत विनामूल्य द्याव्यात.

औरंगाबाद

दिनांक ३१ मे २००७

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नहुषकुमार शामराव सेलूकर, सेलुकर वाडा, देशपांडे गल्ली, अंबाजोगाई जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई जिल्हा बीड यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई जिल्हा बीड यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/१४५/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक ३१ मे, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ॲड. अजित एम.देशमुख,<br>व्दारा/- गजानन किराणा स्टोअर्स,<br>कारंजा रोड, बीड-४३११२२.<br>विरुध्द | .. | अपिलार्थी. |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वासनवाडी<br>तालूका व जिल्हा- बीड. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, बीड. | .. | |

## <u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ३१ मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी ॲड. अजित एम.देशमूख (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) गैरहजर आहेत, तर जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक.ग्रामपंचायत,वासनवाडी, ता.जि. बीड, श्रीकांत रावसाहेब पालवे, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा

गटविकास अधिकारी,पंचायत समिती, बीड, श्री. मनोज तात्याराव चौधर ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- १७-०४-२००६ रोजी एकूण सहा मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

१. एन.ए.ले आऊट मंजूर नसतांना एक ते दहा एकर क्षेत्रात प्लॉटिंग होतांना आपण पी.टी.आर. उतारे देता. या मिळकतींच्या उता-यात नावे लावण्यासाठी असलेल्या तरतुदी / शासन आदेश / लागणारी कागदपत्रे इ. ची माहिती द्यावी.
२. इनामी जमीनीत अतिक्रमण करणारांनाही आपण मिळकतीचे ऊतारे (पी.टी.आर.) दिले आहेत. अशा नोंदी घेण्यासाठी असलेल्या तरतुदी / शासन आदेशांची प्रत द्यावी व अशा नोंदी घेता येतात का? याबद्यल सविस्तर माहिती दयावी.
३. ग्रा.पं. हद्यीतील सर्व मिळकतींची संख्या यापैकी एन.ए. मंजूर असलेल्या व नसलेल्या मिळकतींची संख्या द्यावी.
४. दि. १ जानेवारी २००४ ते आजपर्यंत मिळकत रजिष्टरला नोंदविल्या गेलेल्या मिळकतींची संख्या व या मिळकती नोंदवितांना जमा झालेल्या कर रूपी पैशांची महिना किंवा वर्षनिहाय आकडेवारी.
५. या काळांत किती क्षेत्रांत जिल्हाधिकारी व तहसीलदारांनी एन.ए. परवानगी दिली याची वेगवेगळी माहिती.

६. गेल्या दोन आर्थिक वर्षातील ग्रा.पं. च्या लेखा परिक्षण अहवालाची प्रत – या अहवालाची सर्व पाने दयावीत.

अपिलार्थीने वरील सहा मुद्यापैकी मुद्या क्रमांक-५ वगळता उर्वरीत सर्व पाच मुद्दे ग्रामपंचायतशी संबंधीत आहेत. अपिलार्थी यांच्याकडून सदर अर्ज प्राप्त झाल्या नंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ११-०५-२००६ रोजी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिली, असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि जनमाहिती अधिकारी यांनी या प्रित्यर्थ जी कागदपत्रे शासनास सादर केली आहेत. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाचा जावक क्रमांक व दिनांक नाही. यावर जनअपिलिय अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांनी या प्रकरणा संदर्भातील प्रथम अपिलाची सुनावणी घेतांना जो रोजनामा सादर केला आहे त्या रोजनाम्यामध्ये वरील माहिती अपिलार्थीस दिनांक- ११-०५-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी दिली, असा उल्लेख आहे व या रोजनाम्यावर अपिलार्थी यांची स्वाक्षरी आहे. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील पत्रव्यवहारा संबंधात यापुढे सतर्क राहावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलाच्या कागदपत्राची पहाणी करता सदर सुनावणीचे इतिवृत्त एकूण दोन पृष्ठामध्ये विभागले गेले असून अपिलार्थीची स्वाक्षरी फक्त शेवटच्या पृष्ठावर आहे. ज्या पृष्ठावर अपिलार्थीस दिनांक- ११-०५-२००६ रोजी माहिती दिल्याचे उल्लेखीलेले आहे. त्या पृष्ठावर अपिलार्थीची स्वाक्षरी नाही. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांनी खरोखरीच वेळेत माहिती दिली किंवा कशी, या बाबत संशय उत्पन्न होतो, असे आयोगाचे मत आहे.

यावर अपिलार्थीने जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०५-०५-२००६ रोजी प्रथम अपिल दाखल केले. या अपिलामध्ये त्यांनी, ज्या आदेशा विरुध्द अपिल केले, तो आदेश मिळाल्याचा दिनांक म्हणजे अंदाजे दिनांक- १५-०५-२००६ अशी तारीख दर्शविलेली आहे. यावरुन अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित कालावधीत काही प्रमाणात माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येते.

या अपिलामध्ये अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांचेवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) २० (२) प्रमाणे कार्यवाही करण्याची जनअपिलिय अधिकारी यांना विनंती केली आहे.

या अपिलाची सुनावणी जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- १९-०६-२००६ रोजी घेतली. सदर सुनावणीमध्ये जनअपिलिय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या विनंती संदर्भात कोणतेही भाष्य न करता अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या प्रत्येक मुद्यावर चर्चा केल्याचे दिसून येते व अंतिमतः ईनामी जमिनीच्या उता-या बाबत व अकृषीक जमिनीच्या उता-या बाबत अपिलार्थीस दिनांक- ०४ जुलै, २००६ पर्यंत अपिलार्थीस माहिती देण्या विषयी जनमाहिती अधिकारी यांना सूचीत केले.

जनअपिलिय अधिकारी यांच्या या निर्णयावर समाधान न झाल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २६-०६-२००६ रोजी व्दितीय अपिल केले. या अपिलामध्ये त्यांनी आयोगास जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) अन्वये कार्यवाही करण्यासाठी

अपिलार्थीने विनंती केली आहे व त्याच बरोबर जनअपिलिय अधिकारी यांच्या आदेशा प्रमाणे माहिती अधिकारी यांनी अद्यापही  अपिलार्थीस माहिती दिलेली नाही, असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की,अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडून एकूण सहा मुद्यावरती माहिती मागविली असून त्यापैकी एक मुद्दा महसूल विभागाशी संबंधीत आहे व उर्वरित पाच मुद्दे त्यांचेशी संबंधित आहे. वास्तविकतः जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या माहिती अर्जाची प्रत जिल्हाधिकारी, बीड किंवा तहसीलदार बीड यांच्या कार्यालयातील संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्याकडे पाठवून त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेणे जरुरीचे होते. तथापि या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नसून त्यांनी अपिलार्थीस तहसील कार्यालय बीड व जिल्हाधिकारी, बीड यांचे कार्यालयाकडून ही माहिती परस्पर घेण्याचे सूचीत केले आहे. संबंधित जनमाहिती अधिकारी हे जिल्हापरिषदेच्या सेवेत कंत्राटी स्वरुपात " ग्रामसेवक" या पदावर कार्यरत असून त्यांना  एकूण रुपये २४७०/- इतके मासिक वेतन प्राप्त होत असते, असे जनअपिलिय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये सांगितले. ज्या दिवशी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांचेकडे  माहितीचा अर्ज केला, त्याच दिवशी म्हणजे अपिलार्थीस माहिती देण्यांच्या वेळी ते "ग्रामसेवक" या पदावर कंत्राटी पध्दतीने सेवेत रुजू झाले आहेत. असे जनमाहिती व जनअपिलिय अधिकारी यांनी सांगितले. त्यामूळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी संदर्भात त्यांना काही

कल्पना नव्हती व त्यांना योग्य वाटली अशी माहिती त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस साधारणपणे, अपिलार्थीचे समाधान होईल इतपत माहिती त्यांनी प्रथम दिनांक-११-०५-२००६ रोजी पुरविली व तद्नंतर दिनांक-०१-०७-२००६ रोजी जनअपिलिय अधिकारी यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणे अपिलार्थीस ईनामी जमिनी संबंधी माहिती पुरविली असल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थीस मुख्यत्वे करुन ईनामी जमिनीवर पीटीआर (प्रॉपट्री टॅक्स रजिष्टर) वर स्वामीत्वाची नोंद कशाच्या आधारे केली व ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये मालमत्ताकर रजिष्टरवर मिळकत अकृषीक नसतांनाही कशी रजिष्ट्री केली जाते, याची माहिती हवी होती, असे दिसून येते.

यावर जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांनी ग्रामपंचायतच्या मालमत्ता रजिष्टरवर ग्रामपंचायतिच्या ठरावाने नांवे नोंदविली जातात असे प्रतिपादीत करुन ग्रामपंचायत कायद्यानुसार ग्रामपंचायतीला तसे अधिकार असल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. याचवेळी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या मूळ अर्जातील पहिल्या दोन मुद्यावरील कार्यवाही ग्रामपंचायत ॲक्ट मधील तरतुदीं प्रमाणे केली जाते व त्याकरिता कार्यपध्दती दर्शविणारा कोणताही विशिष्ट असा शासकीय आदेश अस्तित्वात नसल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. ईनामी जमिनीवर मालमत्ता रजिष्टरमध्ये नोंद कशी घेतली, हे विचारले असता ग्रामपंचायतच्या संबंधीत ठरावा नुसार ही नोंद घेतली जाते, असे त्यांनी सांगितले व त्याच बरोबर अपिलार्थीने प्रथम अपिलिय अधिकारी यांचेकडे सुनावणीचे वेळी मालमत्ता कर रजिस्टरच्या

स्वाक्षांकित सत्यप्रती न दाखविता फक्त छायाकित प्रती ( Zerox copy ) सादर केल्या होत्या. असे आयोगास सांगितले. अपिलार्थीने सादर केलेली ही कागदपत्रे स्वाक्षांकित नसल्याने कागदपत्र विश्वासार्ह वाटत नाहीत. असा मुद्दा अपिलार्थीने मांडला असून अपिलार्थीने मांडलेल्या या मुद्यावर आयोगास तथ्य दिसून आले आहे.

या प्रकरणातील कागदपत्रे व सर्व घटनाक्रमांचा तपशीलवार तपासणी करता असे आढळून आले की, जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही विशीष्ट हेतूने अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले आहे, असे दिसून येत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस वेळेत पुरविली आहे. हे पाहता, जनमाहिती अधिकारी यांचेवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) अन्वये कार्यवाही करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. तसेच जनअपिलिय अधिकारी यांनी आदेशीत केलेली माहिती अपिलार्थीस आता मिळालेली असल्यामूळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २६-०६-२००६ रोजी दाखल केलेले व्दितीय अपिल वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपील फेटाळण्यात येत आहे सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक ३१ मे,२००७

**(वि. बा. बोरगे)**<br>
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ ॲड.अजित मुरलीधरराव देशमुख, व्दारा/- गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड- ४३११२२.

२ जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वासनवाडी, ता.जि.बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १७१/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक ०३ मे, २००७.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.सरदार हरजितसिंग निरतसिंग सहानी, ५-१-५५/१, उस्मानपूरा, औरंगाबाद. .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा तलाठी सातारा परिसर, तालूका जि.औरंगाबाद .. | प्रतिवादी |
| २. | जन अपिलिय अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद. .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-०३मे,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.सरदार हरजितसिंग निरतसिंग सहानी (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) व जनमाहिती अधिकारी तथा तलाठी सातारा परिसर, तालूका जिल्हा- औरंगाबाद,श्री.एम.ए.जाधव, ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद, श्रीमती अर्पणा सोमाणी, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थी यांनी दिनांक- ०४-०४-२००६ रोजी गट नंबर १२३,१३९ व १४० या सातारा परिसरातील जमिनी सबंधात खालील प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती.

"१) गट नं. १२३,१३९ व १४० सातारा परिसर ता.जि. औरंगाबाद या गटातील खोदकाम केलेली विहीरीची संख्या ची माहिती हवी.

२) ७/१२ वर ज्या फेरफार आधारे खोदलेले विहीरीची नोंद करण्यात आले त्याची तपशील कागदपत्र (फेरफारची प्रत ) सह द्यावे व ( TOPOSHEET च्या छायांकित प्रतिसह मिळावी. )"

सदर माहिती अपिलार्थीने १९७० ते अर्ज केलेल्या दिनांकापर्यत म्हणजेच सुमारे ३६ वर्षाची माहिती मागविली आहे.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षीली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ०३-०५-२००६ रोजीच्या पत्राव्दारे माहिती दिली. या माहिती मध्ये गट नंबर १२३ मध्ये सिडकोच्या हद्दीत जमिन आहे. गट नंबर १३९ मध्ये ७/१२ रेकॉर्ड नूसार विहीरीची नोंद नाही. परंतू प्रत्यक्षात गट नंबर १३९ मध्ये दोन विहीरी आहेत. संबंधीत मालकाने त्याची नोंद ७/१२ रेकॉर्ड मध्ये केली नाही. गट नंबर १४० मध्ये प्रत्यक्षात व ७//१२ मध्ये ही फेरफार क्रमांक ११९ च्या आधारे झालेला आहे. सदरील नोंद गट एकत्रीकरणा-पूर्वी सर्वे नंबरला झालेली आहे. सन १९७९ नंतरचे गटाचे रेकॉर्ड उपलब्ध आहे. त्यामूळे फेरफार क्रमांक- ११९ ची

नोंद सर्वे नंबर रेकॉर्डमध्ये झालेली आहे, असे उत्तर दिले. या माहिती बरोबर अपिलार्थीने मागितलेली फेरफार प्रत व टोपाशिट जन माहिती अधिका-याने दिल्याचे, आयोगापुढे उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधन न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०८-०५-२००६ रोजी प्रथम अपिल केले. त्यामध्ये अपिलार्थीने मागितलेल्या सातबा-यावर ज्या फेरफाराच्या आधारे विहीरीची नोंद घेण्यात आलेली आहे. त्या फेरफाराच्या प्रतिची अपिलार्थीने मागणी केली आहे व त्याच बरोबर जनमाहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची मागणी अपिलार्थी यांनी पुढे केली आहे.

अपिलार्थीच्या या अपिलावर जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- ०६-०६-२००६ रोजी प्रथम सुनावणी घेवून अपिलार्थीने मौजे सातारा गट क्रमांक- १२३,१३९,१४० वरील फेरफार हा १९७९ पूर्वीचा असल्याने सदरील फेरफाराची प्रत अपिलार्थी यांनी तहसील कार्यालय, औरंगाबाद च्या अभिलेख कक्षातून हस्तगत करावी. तसेच नकाशाची छायाकिंत प्रत तलाठी कार्यालय, सातारा अथवा तहसील कार्यालय, औरंगाबाद येथील अभिलेख कक्षातून नियमानूसार हस्तगत कराव्यात, असे आदेश देवून अपिलार्थीचे अपिल निकाली काढले.

वरील निर्णयावर समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १३-०६-२००६ रोजी माहिती अधिकार कायदा २००५ च्या कलम १९ (३) वरील तरतुदी नूसार व्दितीय अपिल केले आहे. त्या व्दितीय अपिलामध्ये अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती असे कारण दर्शविले आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी असे आहे की, या तीनीही सर्वे नंबरचे मूळ मालक सरदार हरनामसिंग बिद्रा हे होते, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. तथापि आज या तीनही जमिनीच्या सातबा-यावर या मूळ मालकाची वारसाची नावे  नसून वेगळया व्यक्तींची नावे या गट नंबरवर फेरफाराच्या आधारावर लावलेली आहेत. मूळ मालकाच्या जागी इतर व्यक्तींची नावे  कोणत्या फेरफाराच्या आधारे लावली  त्या फेरफाराची प्रत अपिलार्थी यांना हवी आहे. कारण अपिलार्थी हे मूळ जमिनीच्या मालकीचे वारसदार आहेत. या जमिनीच्या मालकी हक्का संदर्भात संबंधीत अपिलार्थी यांनी दिवाणी व फौजदारी न्यायालय, औरंगाबाद येथे दावे दाखल केले आहेत.  या न्यायालयात त्यांच्या मुद्यांचे समर्थनार्थ  अपिलार्थी यांना वरील कागदपत्राची आवश्यकता आहे. असे आज झालेल्या सुनावणी मध्ये अपिलार्थी यांनी सांगितले.

आज झालेल्या सुनावणीमध्ये तहसीलदार, औरंगाबाद यांनी गट क्रमांक- १२३,१३९, १४० मधील फेरफाराची प्रत त्यांचे कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये उपलब्ध असल्याचे सांगितले. त्याच बरोबर सदर गावाच्या नकाशाची छायांकित प्रत तलाठी कार्यालय, सातारा यांच्याकडे उपलब्ध असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले. अपिलार्थीस आवश्यक असलेली सर्व माहिती आठ  दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांनी मान्य केले. दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकला असता असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी आठ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) च्या तरतुदी नुसार विनामुल्य पुरवावी. त्याच बरोबर अपिलार्थीने मूळ माहितीच्या अर्जात मागणी केलेल्या फेरफाराच्या प्रती व टोपोशिट (गावनकाशा) प्रत अपिलार्थीस न दिल्याबद्दल त्यांचेवर महसूल विभागाच्या योग्य त्या प्रशासकीय प्राधिकरणाने महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये २ महिन्यात कार्यवाही करुन अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हा निर्णय मिळाल्यापासून आठ दिवसाच्या आत अपिलार्थीने प्रथम अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती विनामुल्य पुरवावी.

३ अपिलार्थीने मूळ माहितीच्या अर्जात मागणी केलेल्या फेरफाराच्या प्रती व टोपोशिट (गावनकाशा) प्रत अपिलार्थीस न दिल्याबद्दल त्यांचेवर महसूल विभागाच्या योग्य त्या प्रशासकीय प्राधिकरणाने महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये २ महिन्यात कार्यवाही करुन अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ३ मे,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.सरदार हरजितसिंग तिरतसिंग सहानी, ५-१-५५/१, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, सातारा परिसर तालूका जिल्हा औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी वरील अभिप्राया संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यासंदर्भात.

५ उपविभागीय अधिकारी औरंगाबाद यांनी वरील अभिप्राया संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यासंदर्भात.

६ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती.